म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२५४६

# ांतक

ासिक काव्य )

कवि

**‘ महाराष्ट्रभाट ’**

REFBK-0020246

किंमत ४ रुपये

का/०८१
२२५६

का।ग्रं। २२५६

# गोमांतक

( ऐतिहासिक काव्य )

मराठी ... ग्रंथालय, ठाणे.
नोंद क्र. ग्रं.सा.
२२५६
विभाग डिलर
क्र. २४२
दि. २०-२-५६

कवि

‘ [illegible] ’

का/०२
२१.
REFBK-0020246
REFBK-0020246

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी

गिरगांव रोड, मुंबई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०२८६

१९२४

किंमत ४ रुपये

मुद्रक व प्रकाशक :–**गणेश महादेव वीरकर**

मुद्रणालय :–

**'साहित्यसेवक छापखाना'** ९५–९७ गिरगांव बँकरोड, मुंबई

प्रकाशनालय :–

**गणेश महादेव आणि कंपनी,** ६२१ गिरगांवरोड, मुंबई

## गणेश महादेव आणि कंपनीचीं

# आजकालचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | स्वराज्याचा श्रीगणेशा. | २-४-० |
| २ | स्वराज्याची घटना. | २-४-० |
| ३ | स्वराज्याची स्थापना. | २-४-० |
| ४ | स्वराज्याचा कारभार. | २-४-० |
| ५ | स्वराज्यावरील संकट. | २-४-० |
| ६ | मराठी रियासत, मध्य वि. ३ | २-४-० |
| ७ | ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध. | ३-८-० |
| ८ | श्रीएकनाथ चरित्र. | ०-१२-० |
| ९ | भक्तिमणिमाला. | १-८-० |
| १० | अजिंक्य तारा. | १-८-० |
| ११ | निकोलाय लेनिन. | ०-१२-० |
| १२ | ग्रेट ब्रिटनची शासनपद्धति. | ०-१०-० |
| १३ | नवजीवन ( नाटक ) | ०-१०-० |
| १४ | जोसेफ मॅझिनी. | २-०-० |
| १५ | महात्मा गांधी. | २-४-० |
| १६ | मानवी कर्तव्यें. | १-०-० |
| १७ | माधवानुज ( कविता ) | २-०-० |
| १८ | वीर वैरागी | १-०-० |
| १९ | गोमांतक ( ऐ. काव्य. ) | २-०-० |
| २० | श्री. चापेकरांचे निवडक लेख | २-८-० |

## छापत आहे

| | | |
|---|---|---|
| २१ | सैतानी-संक्रांत. | १-०-० |

For buying or selling

**Govt. Securities**

*apply to*

**BHIDE SONS & Co.**

*57, Apollo Street, Fort, BOMBAY.*

| | | |
|---|---|---|
| *Office Tel.* | *Telegrams:* | *Residence Tel.* |
| 24636 | "INVEST," Bombay. | 25564 |

# प्रस्तावना

पुर्तुगीजांच्या वेळेपासून तों पेशवाईतील पूर्ण भरभराटीच्या दिवसां-पर्यंत कोंकणच्या राजकारणी घडामोडींतील मर्म विशद करण्याचा या काव्यांत प्रयत्न केला आहे. यांतील महत्वाच्या ऐतिहासिक घटना व उल्लेख आपल्या व पुर्तुगीजांच्या इतिहासांतील आधारांस धरूनच केलेले आहेत. यद्यपि हें काव्यच आहे तथापि म्हणून तें इतिहास नाहीं असें नाहीं. इति-हासाच्या पृष्ठभूमीवर कल्पनेची कुंचली घेऊन कवितेनें चित्रिलेलें तें एक चित्र आहे.

या काव्यांतील पूर्वार्ध आपल्या प्राचीन व परिचित अशा अनुष्टुप छंदांतच ग्रथिलेला आहे. परंतु उत्तरार्धाचें वृत्त मात्र महाराष्ट्रास अपरि-चित वाटेल हें उघड आहे. ह्या वृत्तांत इतर वृत्तापेक्षां कथाप्रवाह अधिक वेगानें व डौलानें वाहत जातो व म्हणून वीररसात्मक व गंभीर प्रवचना-त्मक विचारांस इतर लहान लहान वृत्तांत तुटक तुटक स्वरूप मिळाल्यानें जो एक त्यांतील आवेगाचा व वेगाचा खंड पडतो तो पडत नसल्यानें ह्या वृत्तांत गद्यांतील वाग्गतिवैचित्र्यास काव्यांतील तालबद्धतेच्या मंजुलतेची जोड मिळते. परंतु आमच्या ह्या रुचीला जोपर्यंत महाराष्ट्राच्या रुचीची सहानुभूति मिळाली नाहीं तोंपर्यंत ही आमची रुचि प्रकृत आहे कीं विकृत आहे हें आमचें आम्हांसच निश्चिततेनें कळत नसल्यानें तें वृत्त वाचकांपुढें ठेविलें आहे. इंग्लिशमध्यें ब्लँक व्हर्स (Blank verse) वा त्याच थाटावर बंगालमध्यें प्रचलित असलेले मधुसूदन दत्तांचें "अमित्रा-क्षरछंद" जसें वाचतात तसें हेंहि वृत्त वाचलें जावें. ह्याला श्लोकाची साकीची वा कसलीहि चाल वा गळा न लावतां केवळ र्‍हस्व–दीर्घ नीट उच्चारीत सरळपणें वाचीत चलावें. भावनानुरूप स्वरविकास आपणच होत जाईल. प्रत्येक ओळीचे शेवटीं किंचिन्मात्र थांबून पूर्णविरामाचें तेथें

विराम घेत जावा : मग तो पूर्णविराम कोठेंहि पडो तेथपर्यंत सारखें वाचावें. विराम चिन्हानुसार थांबत व ऱ्हस्वदीर्घानुसार उच्चारित वाचलें असतां ह्या वृत्तांतील भावगौरव वा श्रुतिसौख्य, जर मुळांतच कांहीं असेल तर, आपण होऊनच प्रकट होईल.

महाराष्ट्रास हें वृत्त आवडून जर कधीं या काव्याची पुनरावृत्ति काढण्याचा प्रसंग आला तर त्यांत या वृत्ताची शास्त्रशुद्ध चर्चा करूं व तेव्हां त्या चर्चेनुसार स्थिर नामकरणही करतां येईल. तोंवर यास चालचलाऊ "वैनायक" वृत्त हें नांव दिलें आहे. कारण इतर सुंदर पण चिमुकल्या वृत्तांच्या सुंदर पण चिमुकल्या पक्षांप्रमाणें भासणाऱ्या चालींहून या वृत्ताच्या चालीची झेंप विनायका ( गरुडा ) प्रमाणें भरारीची व विस्ताराची आहे हें दर्शविण्यासाठीं "वैनायक" हें चालचलाऊ नांवच, त्याची रसज्ञांकडूनच परीक्षा होईतों, योजिलें आहे.

'महाराष्ट्रभाट'

स्वस्त भावानें **मायर्स पंप्स्** मिळण्याचें ठिकाण

हमाम स्ट्रीट, **मुंबई** { **धि लिमये ब्रदर्स लिमिटेड,** } पोलाक स्ट्रीट, **कलकत्ता**

# गोमांतक

## पूर्वार्ध

( सन १७३८ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक 23498
विभाग गीत
नो. दि. 20-2-5?
20289

# गोमांतक

## ( पूर्वार्ध )

होती एक नदी नामें दारका ता[illegible]
प्रतिपच्चंद्रलेखेव तन्वंगी धवलोदका. १
हराचा हरण्यासाठीं तो हलाहलताप गा
दंग स्वर्गांत आणी जी पापक्षालनिं आपगा, २
भगीरथसमा सम्राट् कुलांच्या वसुधांतलीं,
भागीरथी महत्कार्यीं ऐशा संतत गुंतली; ३
एतदर्थचि जें ऐसें महान नसलें जरी
पुण्य होयचि दीनांचे तृष्णासांत्वन कीं तरी; ४
असें जाणुनि, जीं गावें तान्हेलीं बहु त्यांजला
नदी चिमुकलीशी ही जाई पाजित सज्जला. ५
सिंव्हीण शावकासी ती सिंव्हाच्या वितरी पया
पानवे हरिणीही ही हरिणा पय द्यावया. ६

शोभवी दारकेसी हा तटग्राम लहानसा
फुलांचा झुबका कोण्या रानमोगारिला जसा, ७
हिरवी चार चौभोंती शेती दूरवरी फुले
सिंधूंत बेट कीं तैसें गांव तींत मधें खुलें. ८
शेतींचें गीत ' ये बैला ! ' अशा उंच दृढस्वरीं
पहाटेस उठे फुल्लां गंधांच्या सह अंबरीं. ९
मोटांतूनि पडे धों धों पाणी पाणथळामधीं
स्निग्धगंभीर नादानें मोर नाचति त्या तधीं. १०

दया जरी निसर्गाची पूर्वींपाहुनिया जशी
गांवावरी तया होती होती आजहि कीं तशी; ११
तरी सुरूपही जैसा दिसावा दुखणेकरी,
जाळिला ज्या विजेनें तो जीवे वृक्ष कसातरी, १२
परचक्रार्ते हें तैसें गांव भार्गव कीं धरी
म्लानता वर्तमानाची गतगर्व मुखावरी. १३
द्वाराची भग्नवेशीच्या भिंत एकचि ही नभीं
हृद्भग्ना अर्धशल्याचें कीं शेषार्ध तशी उभी. १४
देवालय महादेवाचें जें सन्निध जीर्णसें
धर्मकेंद्र समाजाचा एक हा उरला असे. १५
येथें प्रदक्षिणा भोंतीं घेतांना युवती, मुलें
त्यांचीं गुंफित बैसावी चाप्यांचीं गळतीं फुलें. १६
वृक्ष जो पारिजाताचा शेजारीच मठांत या
फुलांहीं तों अणी वांके गांव गर्व भरे तया. १७
जी पारिजातकाची या कथा दंतकथा कथी
ती पूर्वीं नारदा सांगे स्वयें अर्जुनसारथी; १८
कीं भामा रुक्मिणी आणी कोणीहि दुसरीचिया
प्रांगणीं पारिजातासी सहूं न शकली तया, १९
दोघींच्याहि तईं ईर्ष्यें हराया सहसा हरी
वाहूनि पारिजाता दे भृगूंच्या चरणांवरी; २०
तैं निजाश्रमिं ज्या देई ऋषि रोपुनि वृक्ष कीं
तोचि हा मठ, हा तोची पारिजातक आणखी !! २१

दहा पांच दुकानें जीं मध्यवस्तित लागलीं,
रंगवूनि खडूनें जीं गेरूनेंचि चितारिलीं, २२

" मुखपेठ ' असें मानी स्थला नांव मिळे तया
येती रंगेल येथेंची सायंकाळिं फिरावया. २३

जातां शेतां सकाळीं कीं दुकानीं दिवलें, तया
नळयांत भरुनी तेलें सांजे नेति इथें स्त्रिया. २४

कवड्याचलनी नाणें घेत देत जिरेंमिरें
वाणी दुप्पट दामा घे—हिशोब चुकुनी बरें ! २५

तशांत मोठ्या पोटाचे ज्यांत शोभति शेटजी
दुकाना लाधली एका पेढी ही पदवी अजी; २६

मुलें भिकार तेथें जैं भीक दाटुनि मागती
पायाची आग शेटींच्या पोटा थेटचि जात ती; २७

दंडूं त्या जों स्वदेहासी शेट नीट उभारिती
मुलें तों शकतीं जाऊं अर्धा धांवुनि गांव तीं. २८

सोडूं गाई सकाळीं जो उशीर बहुधा करी
घेऊं मुलें गुराख्याची सूड त्या भटजीवरी, २९

जातां जातां कुठें त्याचीं वस्त्रें वाळत सोवळीं
दिसतांचि शिवोनी त्या काढिती पळ तत्पलीं. ३०

गांवांत जोड ना ज्यासी निवतां नव मल्ल तो
यात्रे शेजारच्या गांवीं जननीपद वंदितो; ३१

' संभाळि बरें ! ' आई कथितां, हंसुनी पुढें
निघे नीट जिथें यात्रा मल्लरंगण तें पडें; ३२

आणि कुस्तींत पाडोनी गडी दुप्पटसा झणीं
परते पटका जेतेपणाचा पटकावुनी; ३३
तैं स्वागता किती वेशीपाशीं ते जन दाटले
'जैजै'कारांत गांवाचें लघु अंबर फाटलें; ३४
संबळें वाजतां चाले छाती काढुनि कीं जसें
मारूनि रावणा साकेतासि रामाचि येतसे. ३५

गांवांतची तरी धाडी माहेरा नच सासरा
म्हणूनि भाऊ बालेचा टपे संप्रत वासरा. ३६
येतां नदीपथें भेटे, भावापासुनिया स्वसा
मेवा किंवा मुका घेई मेव्याहूनि मिठाससा. ३७.
पंचाईत सभा पंचांची जी वाद हरावया,
पाटील धीट गांवाचे रक्षणासि करावया; ३८
नित्यनैमित्तिका सर्वा धर्मासी करवी करी,
ग्रामोपाध्याय गांवाचीं दुरितें पळवी दुरी; ३९.
दैवी भौतिक आपत्ती ऐशा होवुनिया दुरी
निश्चिंत एकनिष्ठेनें शेती शेतकरी करी; ४०
मुकुटासम जैं शेती सोनेरी कणसें धरी
प्राण देहीं डुले तैसें समाधान घरोघरीं, ४१

तदा वर्षभरी जो जो उणीव आपुली पुरी
कोष्टी कुंभार वंजारी सुतारादिक कीं करी, ४२
त्या त्या सहाय्यका साऱ्या निजा शेतकरी मुदें
धान्यभाग यथान्यायें विभागूनि ठरीव दे; ४३.

धान्यसंग्रह वर्षासी अवश्य तितुका जना
पुरुनीहि उरे जो कीं, ज्याचें संप्रति काज ना ४४

समुदाय हितासी तें समाईक निधीमध्यें
पाटील धान्य गांवाच्या पेवांमाजि भरूनि दे; ४५

अवर्षणाचें दुर्दैवें येतां संकट भूतलीं
करील धान्यसंपत्ति लोकपोषण त्यांतली; ४६

ग्रामसंस्था अशी जी कीं प्रतिग्राम करीतसे
लोकसत्ताकची कोणी स्वयंपूर्ण लहानसें, ४७

आसन्नमृत्यु संस्था ती आणि कीं जनताहि ती
परराज्यप्रबंधाच्या रोधें घेत पराकृति. ४८

मद्याचीं मध्यवस्तींत दुकानें बसलीं नवीं
कशी तशी कृषी सोशी करकर्षण दानवी. ४९

परी ह्या ग्रामसंस्थेच्याहुनीहि पहिली तशी
प्राणभूतचि गांवाची संस्था जी दुसरी अशी ५०

ती होय हा युगस्थायी वटवृक्ष महायशा
विस्तारल्या जयाच्या कीं पारंब्या प्रतिवृक्षशा; ५१

आला तो पाहुणा जाऊं शकलाचि न मागुता
पाहिल्याविण या वृक्षा ऐकिल्याविण वा कथा; ५२

कीं पूर्वीं ज्या दिनीं वीरोत्तंसभार्गवमार्गणें
लावी सकंप सिंधूतें हटण्या शतयोजनें, ५३

त्या दिनींच तथा वीरें विजयध्वजची तसा
रोपिला वृक्ष हा आणि गांव स्थापियला असा ! ५४

पार हेमाडपंती हा ! चुन्या वा चिखला विना
मंत्रें बद्ध शिला ! ऐसा या ' आळ्या पृथमींत'ना ! ५५
अखंड जात्या येत्यांचें गप्पापीठचि पार तें
राजकारण गांवाचें तें तें येथचि घाटतें; ५६
संथागार * दिनीं आणी पार रात्रिस होय हा
रंगभू सार्वजनिका या कुणीहि कुणी पहा; ५७
तुणतुणें तंबुऱ्यासी तें ढोलकें तबल्या भिडे
लावण्यांच्या चढाओढीसि न रात्रि पुरी पडे; ५८
ये तिथें फिरता साधू धुणी लावुनिया बसे,
प्रार्थिता बहुतीं सांगे लवदेश कुठें कसे. ५९
वदे चिलमिच्या, शब्दीं शब्दीं, सोडित जो धुरा
विलायत कशी आहे काशीच्याचि पुढें जरा; ६०
अवधूत असोः प्रेमें वधूहि वट वृद्ध तो
उपासितां नव्या वृक्षा किती मत्सर वाटतो ! ६१
तया वंद्य वटाध्यक्षत्वाच्या वत्सल सावली
खालीं जशी प्रजापक्षें छावणी आपुली दिली, ६२
तशीच चावडी ही ही, लुप्तश्रीक अजी तरी
कैं कैं राज्याधिकारांच्या शिबिरध्वज ती धरी, ६३
जसें त्या दिवशीं: कीं जै येताति फिरतीवरी
मामलेदार तैं गांवीं कोण धांदल ती तरी ! ६४
जो तो ह्या त्या निमित्तें त्या पंथें जात विलोकुनी
भीतभीत दुरोनी त्या धूमकेतु जसे कुणी; ६५

संथागार=Townhall

जरी पाटिल बोवांच्या मव्य गालमिशा कधीं
तशीच कुळकर्ण्याची लेखणी लवचीक ती ६६
खूपची वाढवीती तन्महत्व भय अंतरीं
मनीं गांवकऱ्यांच्या कीं त्याचि एक दिनीं तरी ६७
मामलेदार जैं जातां फिरती करुनी घरा
घ्यावया मुजरा त्यांचा मान वांकविती जरा. ६८
तिथेंचि पुर्तुगीजांची शाळा एक नवी भरे
राग कां न तिचा यावा भाऊ पंतुजिनां बरें ! ६९
ओसरी ओस तो यांची परस्थ परधर्मदा
शाळे त्या घोकितां जाती भ्रष्ट शब्द मुलें तदा; ७०
'क्रिस्त,' 'क्रूस,' 'कुलंबीया,' 'अलबुकर्क,' हरे ! हरे !
श्रीगणेशाविनाची ते शिकताति धुळाक्षरें !! ७१
पुर्तुगीज ! अहा आजी नांव हें शतवत्सरें
आलें करीत ह्या गांवीं भयग्रस्त जनांतरें ७२
धरितांची वृकें धेनु झेपें व्याघ्र जरी त्वरें
क्रूरशा वदनांतूनीं धेनु क्रूरतरीं पडे, ७३
तशी गोमांतकीं देतां पुर्तुगीज पदांप्रती
इस्लामाच्या[1] मुखांतूनी इसाच्या[2] पडली क्षिती. ७४
व्याघ्रें संत्रस्त रानींही मरतां मरतां जशीं
हरिणें कळपांतूनीं जगतात कशीं बशीं, ७५
गोमांतकाचिया रानीं हरिणी—कळपांतलें
असा कळप हा होतें एक भार्गव आपलें. ७६

१ इस्लाम=मुसलमानी धर्म २ इसा=खिस्ती धर्म.

साऱ्या गांवांत ह्या साधें प्रिय आणि सुशीलसें
कुटुंब एक विप्राचें सुप्रतिष्ठित हें असें; ७७

श्रीमहामंडलाधीशा कदंब नृपतींचिया
काळांत धर्मवित्त्वाचा होता मान कुलासि या; ७८

पुढें ज्या दुर्दिनीं देशाचें या दैव फुटोनियां
स्वातंत्र्याची अहा गेली तरवार तुटोनियां ७९

त्या दिनीं ह्या कुलाचेही पडले नर झुंजुनी
पूर्वीं सभांगणीं तैसें आतां धर्मरणांगणीं ८०

तुरुष्क अधिकारी तो एकदां सहजी करीं
एका स्त्रिये कुलाच्या या गुलाम म्हणुनि धरी ८१

आणि ऐशा धृता अन्या हिंदूंसह ती प्रती
विकूनि अरबी एका जहाजावरि धाडिती, ८२

ऐकतो कीं मनुष्यांची पुरे वाटुनिया दया
उडी टाकुनि नक्रांच्या घेती सिंधूंत आश्रया. ८३

तुरुष्कीय घणें नाना देवता पळतां दुरी
'श्रीमंगेश' अणी 'शांताभवानीच' टिके घरीं ८४

प्रख्यात तींहि कीं देवस्थानें भंगु पुढें जई
पुर्तुगीज उभारोनी सवाईघण ये तंई ८५

जाज्वल त्याहि दों होती मूर्ति कंपित अंतरीं—
देवही दुबळ्यांचे कीं असणार किती बळी !— ८६

प्राणांसही न पाहोनी भक्त ब्राह्मण जे तदा
मूर्तीस घेउनी झाले गुप्त देखत देखतां ८७

ब्राह्मणांत तया होता एक ह्याहि कुलांतला
अंत्रुजीं स्थापुनीं देवी केलें लज्जित शत्रुला. ८८

दैविका दैशिका ऐशा वादळांतुनि वाचतां
एकची वंशवृक्षा या उरे अंकुर जो अतां ८९

युवा तो निवसे गेहीं त्याचि पूर्वज पूजिता
जातां माता अणी मागोमाग स्वर्गपथें पिता. ९०

प्रिया त्या समची त्याची युवतीच वयें जरी
गृहिणीपद कर्तव्या प्रौढा पूर्ण तशी करी; ९१

गृह निर्मल सैंपाक सुरसाल तिचा सदा
गमे लहानथोरांशीं व्हावीशीच प्रियंवदा; ९२

आग्रहें वडिलां सेवी लहाना शिकवीतसे
वाणीनें वेतनाहूनी सेवका सुख देतसे; ९३

ती सदा ऋणको येतां तिच्या शेतकरी घरीं
भाकरी ऊन दे, जी तात्स्मित स्वादुतरा करी; ९४

आपल्या आंबराईच्या आंब्यांहीं घर जैं भरे
सुरंग, सुरस, स्वादु ते ते वेचुनि ती करें, ९५

सुवासिनीस जातींच्या सर्व बोलवुनी घरीं
अंगणीं आम्रराशीतें तयांच्या लुटवी करीं; ९६

अंबेचा स्तनवा प्यावा अंबा कांचन–गौरवा
स्तनंधयें दों लोभांच्यामध्यें स्तंभित तेधवां, ९७

किंचित् कोपी तरी होता प्रेम कोमल तत्पती
जीव कीं प्राण ते लेखी तिज जेंवि तयास ती; ९८

वेणी घाली तिची हस्तें, प्रेमें न्हाणि तिला स्वयें
लाजतां ती तिशी रागें क्षणमात्र वदूं नये. ९९

रमामाधव ते ऐसे अन्योन्यीं रमतां सुखें
फुले सुख दुजें तेंही कराया पहिलें फिकें, १००

यथाकालिं जई साध्वी रमा ती रमणीयशा
तनया प्रसवे एका वंशाच्या उजळूं यशा १०१

जन्मासी बाल तें येतां, गगनी सुमवर्ष ते
थवे दिव्यविमानांचे दाटले अथवा न ते १०२

प्राचीन पूज्य गोत्रर्षी आशिर्वाद वदूं स्वयें
गंधर्व संघ वा गाऊं तदा ये अथवा न ये १०३

मुलाचें मुख वात्सल्यें चुंबिण्यांतचि गुंतलीं
नभीं तें चुकलीं देखूं तीं मातापितरें जरी: १०४

तथापि सुतजन्माची जी प्रीत्युत्कटता तवीं
होय हर्म्यी अयोध्येच्या दुंदुभींतुनि गाजती १०५

सामान्य मायबापांच्या त्या सामान्यहि कीं घरीं
प्रीत्युत्कटत्व तैसेंची असामान्य, मुकें जरी. १०६

पयाचा पहिला पान्हा ये दाटूनि पयोधरीं
तदग्रा तनयें तीच्या चेपिलें मृदुलाधरीं १०७

मऊ, मंजुल, व्हाव्याशा त्या चेपांत पलोपलीं
तैं रमेच्या हृदीं प्रेमाची जी वीज थरारली, १०८

मोहकत्व तिचें कोसल्यासुखाहुनि कां गुणें
सिंहासनस्थ सम्राज्ञी होय ती म्हणुनी उणें ! १०९

ख्यात पूर्वज जो मेला राष्ट्रसंगरिं त्या कुलीं
स्वप्नांत तो वदे “ मीची ये तुझ्या उदरीं मुली, ” ११०
म्हणूनि तनयातेंची रमा ‘शंकर’ नांव दे
योग्य योग्य तदा सारा गांव भार्गवही वदे. १११
बाल ‘ आई ’ अशी मंजु हांक दे पहिली जईं
तिचा पदर वात्सल्याश्रूंत चिंब भिजे तईं; ११२
मातेच्या स्तनपानीं तो पित्याच्या प्रियचुंबनीं
बाल घे पोषणा, मूल्या लोमहर्षण होऊनी; ११३
कर्णीं सुंदर डोलावे डूल दुड्दुड् चालतां
होई आपणची प्रेमें घांस आइस घालतां; ११४
घोडा खेळावया ताता कामा जाउ मुळीं न दे,
वस्त्रची लपवी, राही दाराच्याचि उभा मधें; ११५
जसा जसा तिचा गेला बाल वाढत सद्गुणी
श्रेय प्रेय तिच्या जाती एक होउनि जीवनीं; ११६
प्रथमप्रसवा पाजी तान्हें चुंबित जै स्तनीं
सहोदर नद्या घेती प्रीतिनीति तिथें जनीं; ११७
भोग्यची योग्य होई कीं अपत्य प्रतिपालची
गतिजीवन गंगे दे, सृष्टिसी नवता तिची; ११८
बालसंगोपनीं नारी जीवनक्रम रम्यसा
तोचि पावनसा होई सुव्रतक्रम कीं तसा. ११९
एक दोन शकुंतांनीं लकेऱ्या दिधल्या कुठें
पहाटेस अशा एका रमा नित्य तशी उठे; १२०

सदा संमार्जना दासी असूनि स्वकरें करी
स्वयें मग शुचिर्भूता स्नाता होउनि सुंदरी १२१
लाविली फुलवाडी जी तिनेंचि परसांमधीं
देवपूजेप्रती तोडूं जाई तींत फुलें तधीं; १२२
सुगंधांत फुलांच्या ती, सुरंगात उषेचिया
रंगुनी क्षण तैं पाहे सृष्टिकौतुक तन्मया, १२३
खुडूं मग फुलें लागे गातां मंजुल गीतिशी
शांततेची प्रभाताच्या वाचा मूर्तिमती तशी; १२४
पतिसी तनया आणी हळूंचि उठवूनि दे
पाहुनी क्षेम त्या यावीं नयनें भरुनी मुदें; १२५
मग जै तुलसीपासीं जपा ती जपण्या बसे
तिचा बाल तिला तैशी पाहुनी कुतुकें हसे; १२६
पूजा ती करितां पाहे शिवायास पलोपलीं
धूरची उदबत्त्यांचा धरायासि बघे करीं; १२७
शुद्धोष्ण तोय देऊनी बालासी मग न्हाववी
एकेक शब्द देऊनी स्तोत्रें पावन गाववी, १२८
येतां येतां खुलोनीया पाकळ्या कमलाचिया
बघे उमलत्या मालाकार श्रीस जसा तया १२९
कौतुकें प्रिय आश्चर्यें तशी ती जननी बघे
फुल्लदूहृदीं तया अर्थज्ञान केंवि विकास घे १३०
नमस्कारवुनी देवा तुलसीस पुढें सती
प्रेमें बसे रमा घालूं जेवाया तनयास ती. १३१

शैशवीं दूध भाताचा घास लावुनि लोणचें
ताटलींतुनि जो देई आई त्यासम कोणचें १३२

मिष्ट पक्वान्न हो लागे आयुष्यांत पुन्हां ? तसें
प्रेम कोण पुन्हां आई निरपेक्ष करीतसे ! ! १३३

" ऐकणें होतसे कां तें तिकडूनि ? " सहास्य ती
मधोंचि पतितें उद्देशूनिया वदली सती, १३४

" पांचवा जेष्ठ ये, लागे वर्ष पंचम शंकरा
बेत वाढदिसा त्याच्या वनभोजनची बरा. " १३५

शंका ! टीका ! मिळे तैं त्या सूचनेप्रति संमती
तीनही वाचनें होतां प्रेमपंचसभेमधीं. १३६

पसंत उभया ऐशा वसंत वनभोजना
रमामाधव सन्मानें पाचारिति सुहृज्जना. १३७

सुग्रणी युवती नाना पक्वान्नें करुनी घरीं
तया शुभदिनीं येतां आणितात बरोबरी; १३८

प्रात:कालींच वाद्यांचे नाद मंगल वाजले
बांधिल्या फुलमालांहीं छकडे बहु साजले; १३९

वाहनें सुटतां एकाएकीं जैं हिसका बसे
भेट नारीनरां होतां सहसा पिकलें हसे; १४०

शेतें शेतांतलीं धान्यें पशूपक्षी फलें फुलें
मार्गीं अक्रम सौंदर्यें वस्तुसंग्रह गुंफले १४१

त्या बाल वस्तु वस्तूंच्या पुसे नामगुणां क्षणीं
टाळि वाजवुनी केव्हां केव्हां अंगुलि दाबुनी. १४२

वाहनें घर्घरा जातां शेता त्यागुनिया जधीं
पक्षी सलील गीतातें गेले गात नभामधीं, १४३
" माणसेंही अशी आई उडूं गे शकतील कां ? "
पुसे बाल तया प्रेमें वदली कुरलालका १४४
" दे बाळ देव पक्ष्यासी पंख तेंवि न मानवा
नवा पंख घडाया ये विमानीय आम्हां नवा " १४५
सचिंत क्षण तो; वेगें जयावेशभरें कथी
" असी कां माणसें युक्ति उडाया करिती न तीं ? १४६
बैलांचे बदली मोठ्या मोठ्या एक असा कुनी
पक्सी घेउनि त्याखालीं वत्त गालिस बांधुनी १४७
दिला उलवुनी त्यासी लगाम घलुनी तलीं
उलतील न कां ते जे वसती तिजभीतलीं ? " १४८

कोकिळांचे दुरोनी तों किलबिलाट वणिक्तती
तसे आम्रवनोत्कर्षा प्रसिध्यर्थ पुकारती: १४९
" या या वाटसरूंनों ! या पानमंदिरिं या तरी
बहार ती वसंताची आवराइंतची खरी १५०
माध्यान्हीं भिल्लिणी ज्यांची उन्हानें तनु तापली
तृषा भागविती आम्रासवें निर्भय यास्थलीं १५१
पाडासी लागले आम्रवृक्ष पक्क सुधारसें
त्यागिती सत्फलें हीं तीं योगयुक्त मुनी तसे; १५२
न्हाया शीतल ही छाया न्हाया निर्झर अच्छ हा
गाया कोकिल मैना या प्याया आम्रफलें अहा १५३

शैशवांत जशी आई विरहांत जशी प्रिया
आनंद आंबराई दे उन्हाळ्यांत तशीच या १५४

स्वागता तों पुढें येती हृष्ट शेतकरी जवें
भेटीस घेउनि भावें फलमूल नवें नवें. १५५

पुसताति अहो आधीं बाई ! सत्वर दाखवा
छोटा कुठें जाहागीरदार तो अमुचा नवा ? १५६

घेउनी शंकरा आणि कडेस कुणि नाचले
विनोदें दुरुनि कोणी मुजरे शतदां दिले; १५७

मग त्या नरनारींचा थवा स्वेच्छ विहारतां
जाहला सहसा आनंदांत तो दिन भासता. १५८

सुगंध पिवळे नामी आंबे हे भरले रसें
प्यावें किंवा पहावेंचि हा न निश्चय होतसे; १५९

काटेरी फणसांमाजी गोड गोड असे गरे
असतील कुणा वाटे पाहिल्याविण ते खरे ! १६०

ज्या जगीं एक हा आंबा अशी लक्ष फलें धरी
अन्नाविना मरे त्याची जगीं माणुस हा तरी ! १६१

रसाळ खा तरी आंबे गोड गोड अणी गरे
मधें मधें मजेचीं तीं ताजीं चाखित जांबळें, १६२

गुंफीत वा गुलाबांच्या माळा, घालित वा गळा
नाच पाहत मोरांचे कुणी वा कवळा मळा, १६३

पंक्ती मांडित खाद्यांसी नाना वाढित आदरें,
करितां कथितां कोट्या चुटके शत हांसरें ! १६४

आनंदानें अशा साध्या आणखी निरुपद्रवी
जन सालस ते नेती दिन सात्विक उत्सवीं १६५

आनंदा दे तया जो त्या देवाची स्मरुनी दया
भाविकांचे तया अंतीं आले नेत्र भरूनिया १६६

सूर्य तो शिबिरीं सायंकालाच्या शिरुनी करी
सृष्टिच्या दिनकर्माचीं बंधनें अवघीं ढिलीं १६७

इतस्ततः चरूं जातां पिऊं वा सुजलाप्रती
दूरावली प्रिया ज्याची स्वच्छंदें लव संप्रती १६८

नीडीं जाऊं निजायासी गाढालिंगनिं भागले
प्रियेसी " चल् ये, चल् ये, " बुल्बुल् बोलवुं लागले १६९

घरासी दुभत्या गाई पांवे ऐकत चालल्या,
लागतां दारका पाणी प्यायासी पल थांबल्या; १७०

वासरीं आपलीं तों त्या जवळील घरांतुनी
दीन हंबरता भेटीसाठीं उत्सुख ऐकुनी १७१

नावरूं शकल्या पान्हा आणि जै गळल्या जलीं
धारा मंदोष्ण दुग्धाच्या दारकाहि तया पलीं १७२

नील श्वेतौघशी गंगायमुनेसम साजली
छोट्या प्रेमप्रयागाची शोभा भार्गवही धरी. १७३

अशी करुण सौंदर्या सायंसृष्टि खुले जधीं
संघ तो नरनारींचा गांवासी परते तधीं १७४

गांवासी येः—परी गांवामाजी पाउल टाकतां
सर्वत्र आढळूनी ये त्या अपूर्व अशांतता ! १७५

डोळे चंचल सर्वांचे गति सत्वर घाबरी
हाकाहाक कुठें कोठें कुजबूज पलोपलीं १७६
अवश्य पाहिजे भीता हरिणी कळपामधें
क्रूर हिंस्त्र पशू कोणी घुसला असला इथें ! १७७
कशी बशी तथापी ती वनभोजनमंडळी
वेशींतुनी वटाच्या त्या पारासन्निध पातली; १७८
अनपेक्षित तों त्यांच्या शस्त्रें रोखुनि आडवीं
दृष्टिसी पुर्तुगीजांचीं पथकें पडलीं नवीं ! १७९
शब्द ही क्रुद्ध कीं ज्याचा कांपवीत तयावरी
शस्त्रची उपसूनी तो पुर्तुगीज जंई धरी १८०
हताश गांव तो तेव्हां त्याच्याचि शरणा रिघे
आधींचि हुकुमाच्याही हात जोडित हाय घे. १८१
कां तरी ? कां तरी ? ऐसे प्रश्न कातर ना पुरे
ऐकतांहि अविंधानें **रमामाधव** घेरिले; १८२
आणि दोघांसही दोघे क्रूर सैनिक तत्क्षणीं
आढेवेढे न घेतांही नेत फरफर ओढुनी १८३
गौरनायक जो पारावरीच खुरचीवरी
त्या पुढें टाकिती मत्स्या सर्पाच्याचि जसें बिळीं १८४
अकस्मात् पडतां वेगे गदा मस्तकि ये जशी
**रमे** न कळतां मूर्च्छा स्पर्शोंचि परक्या तशी १८५
अस्तदु:ख तिचें ऐसें; तिची दुर्गति ज्यास ही
पेटवी त्या प्रकोपींची अस्त **माधव** दुःख हीं; १८६

मूल तें परि कीं जैसें फूल लोंबकळे लते
जाईच्या छाटतां तैसें आईसी धरुनीच तें ! १८७
गौरनायक कोपें तों पुसे ' नाम कथीं तुझें '
वदे **माधव** कोपें ' तूं कोण जो पुसण्या धजे ? ' १८८
गौर तों उठुनी क्रूसा उचलूनि धरी वरी
परी सर्प जसा क्रोधें उपसूनि फणा शिरीं: १८९
' रे मूढ जाण मी आहे एक सेवक नम्रसा
पदाच्या प्रभुच्या गातीं देवदूतहि यद्यशा ! ' १९०
आणि क्रूसावरी त्या जी पवित्र प्रतिमा भली
भगवान् भगवंताच्या पुत्राची प्रिय शोभली १९१
दयाशील तया येशुखिस्ताच्या प्रतिमेप्रती
चुंबुनी तो पुढें बोले भक्ति गद्गद वाक्तती: १९२
' तो मी अंतुनिया त्याची दिक्षित प्रभुचा उभा
कार्यीं वाहुनि सर्वस्वा स्वामींचे चरणीं शुभा १९३
शुभ प्रसरवूं लोकीं वर्तमान पवित्र तें
खंडुनी दंडुनी सारी पाखंडीय मतामतें: १९४
या करी धर्मराजाची **पोपाज्ञा**[1] बघ मी धरी
राजाची पुर्तुगीजांच्या राजाज्ञा आणि या करीं ! १९५
तरी सांग तुवा आजी आज्ञा भंगुनिया अशी
केलीं पाखंडकर्मै हीं सुप्रसिद्धपणें कशीं ? " १९६
वदे **माधव** " धर्माज्ञा राजाज्ञा हि नवा असे
भंगिली मी नवा पाखंडीय कर्म करीतसे. " १९७

१ पोप—Pope=ख्रिस्तांचा जगद्गुरु.

" सब झूट " गडाडोनी वदे अंतुनिया क्षणीं
उद्देशूनि तया तेथें जें गांवांतिल अग्रणी: १९८

" बोलारे पतितानों कीं ऐकलें न कधीं जरी
हिंदूंच्या धर्मकृत्या जो सुप्रसिद्धपणें करी १९९

सह साहाय्यची अग्नीमाजी जात जळूनिया
सद्धर्म शत्रु तो अस्मद्राज्यशत्रु ठरूनिया ? २००

पाप्यांच्या दहनाग्नीचें डोंब या गगनांमधें
प्रत्यहीं उठतांनाही देखिलेचि तुम्ही न ते ? " २०१

वाचाची भीतिनें ज्यांची बसे तो जन जों न दे
उत्तरा होय वा नाहीं तों हा क्रुद्ध पुन्हा वदे: २०२

" बंधु वा भगिनी किंवा सुत वा तुमची सुता
जाळिल्याविण वा कैशी तुम्हां ती कळणें कथा ! " २०३

असें गर्जत ज्या हस्तीं होता क्रूस तयाच तो
हस्ती चाबुक घेवोनी माधवावरि धांवतो २०४

" सांग तूं धर्मकृत्याशीं सुप्रसिद्धपणें अजी
केलेंस वा न ? कीं सोलूं सांतडीच अशीं तुझी ! २०५

सांग ! सांग ! " अशा क्रुद्धीं प्रत्येकीं चढल्या स्वरी
चाबुकाच्या प्रहारांहीं क्रूरतालचि कीं धरी २०६

मुखीं करी शिरीं पायीं रक्त येत फुटोनिया
माधवें उस्स ना केलें तरी धीर सुटोनिया २०७

" कर्तव्यें धर्मकृत्येंची !–तरी वाढ दिनाचिया
उत्सवातें कुणी मानी धर्मकृत्य असें न या ! २०८

कार्यची धर्मकृत्यें तीं ! तथापि सह या जना
पुत्रजन्मोत्सवा केलें कांहीं धार्मिक कृत्य ना " २०९
पुनः पुन्हां: असें जों जों वदे माधव रोकडें
चाबुका चाबुका मागें रक्ताचे उडती सडे ! २१०
तीसची पथकीं कीं त्या पूर्तुगीज सशस्त्र ते
तीनशेंच्या वरी होते भोंतीं गांवकरी तिथें २११
तरी समक्षची साऱ्या क्रूर कृत्य तसें घडे
चाबुका चाबुकामागें रक्ताचे पडती सडे ! २१२
त्यांनीं हळहळे जो तो धीर एकहि ना करी
अनेकही न एकाचा हस्त जाउनियां धरी ! २१३
मुखीं शिरीं पदीं पृष्ठीं पडे घाव चढे तिथें
गौराची क्रूरता तोंही लवना शम पावते. २१४
स्वभक्तें सांडिल्या रक्तें रक्तस्नान घडे तईं
क्रूसस्था त्या दयाशीला येशुच्या प्रतिमेसही ! ! २१५
मग कीं अभिषेकाचें पात्र रिक्त तसेंच तो
चाबुका ठेवुनी खालीं स्नातमूर्तिस पाहतो; २१६
रुमाल घेउनी आणी पुसुनी तिजला पुन्हां
भावें चुंबुनि तो बोले भक्तिगद्गद त्या जना: २१७
" अहो पतित हो ! वर्णा अजुनी जरि सत्य तें
येशुचें यश सोडोनी पाखंडीय असत्य तें २१८
तरि कीं तुमच्या पापा क्षमाया प्रभुसी तसे
पोपाहि आग्रहें प्रार्थू वचनाप्रति देतसे २१९

नातरी प्रभुच्याचीया शपथेवरि सांगतो
जाईल येथुनीया ना जिता एकहि हिंदु तो !" २२०

तमाची कालिमा होती येत झाकित सृष्टिसी
तींत ना दिसतां बोले तो–जिव्हाच तिची जशी २२१

पूर्वभीत तरी जाती क्रमें गांवकरीहि ते
रित्या हळहळींतूनी जित्या चळवळीमधें; २२२

काढूं मात्र पळासींची ! तेव्हां त्या पतिता जना
वेढूनि धरण्या योजी तो गौराधिप तत्क्षणा. २२३

जिथें मूर्च्छितसा रक्तीं पडे माधव माखला
एक स्थापुनि त्या पारावरी सैनिक आपुला, २२४

सैनिका इतरां सर्वांसह ते जन रोखुनी,
एकाप्रती तसें सर्वा पकडूनि धरी झणीं २२५

सर्वां धरी:—अणी सर्वांनाचि ! कीं इकडे अहा
कोण हें धीटसें अंधारांतुनी निसटे पहा: २२६

धीटसे आणखी हे दों–तिघे सत्वर तीरसे
पारावरी घुसोनिया सर्पाच्याचि बिळीं तसे, २२७

एकाएकींच एकाकी सैनिकावरती तया
गरुडासमची कंठा धरिती झडपूनियां ! २२८

निःशब्द त्यास पाडोनी क्षण मूर्च्छित, तत्क्षणीं
माधवा, त्या मुला, स्त्रीतें, गेले पाठिस घालुनी ! ! २२९

जनांतल्या धरूनीया आणखी प्रमुखाप्रती
पारासी, पाजळूनीया दीपा, ये परता जधीं २३०

प्रकाश अंतुनीयातें तों दावित सत्रपा
मूर्च्छिता बदिवानांच्या स्थली मूर्च्छित बंदिपा ! २३१
घात ! घात ! धरा ! धांवा ! गर्जे क्रोधभरें भयें
ये पुढें जो डसूं त्यासी पिसाळूनि तसाच ये. २३२
हा हा म्हणतां वाहे भयबंध तुटोनिया
वाळुच्या धरणीं तैसा जनपूर फुटोनियां २३३
प्रसंगसूज्ञ तो घेई मागें अंतुनिया क्षणीं
डाव ठेवोनची पुच्छाघातें सर्प तसा मनीं. २३४
अग्रणीधृत जे गांवांतिल बांधुनि त्या प्रती
शिरे ससैन्य तो काढूं चावडींतचि रात्रि ती २३५
तीस ते रिपु ! तद्धस्तीं अग्रणीस समर्पुनी
तीनशें तरि ते जाती जन जीव बचावुनी !! २३६
ती घोर रात्रि ! दुर्दैवी धृतांचा छळ घोर तो !
चाबुका मागुनी मारा देत चाबुक मोडतो ! २३७
रक्तें न्हाली विषाव्याली व्यालींसी डसली जना
ती घोर रात्रि ! त्या आगी आर्त ! हिंसक गर्जना !! २३८
दयेसी स्मरुनि गेला तुझ्या तो क्षण ह्या जना
ये घोर रात्रि तों ! तें कां झालें पाप जनार्दना ? २३९

ती सौम्य रात्रि !—छाये या मठाच्या निजली स्वतां
रवंथ करितां कोण्या हरिणीसम शांतता ! २४०
जगीं असा कुणी फासेपारधीच न कीं उरे
पारिजातावरी जातीं तशीं झोंपुनि पांखरें ! २४१

शांत कोमल गीताचा स्त्रोत शीतल पाझरे
ती सोम्य रात्रि सगीतीं, चांदण्यांत तशी विरे. २४२
अर्चितां अर्चितां श्रीमच्चंद्रशेखर तोषले
चंद्रकांता हृदाच्या तैं प्रेमाचे फुटले झरे— २४३
हृदाच्या साधुच्या या ! जो मठांत इथल्या बसे;
" आला कोठुनि ? " तें कोणी पुसतां सहजीं हसे; २४४
" अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत
अव्यक्तनिधनान्येव तत्र ज्ञेया कथं गतिः ! " २४५
" कुठें धाम ? " " तिथें बेटा रामीं जीव जिथें रमे
यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं च मे !" २४६
आला एकदिनीं, येथें आहे आजहि,—यापुढें
ज्याचें हृद्गत अन्या वा त्यालाही न कळे पुरें ! २४७
बोलावी न कुणासी तो तरी शोधित लोक ये
फुलत्या कमला जैसे मोहुनी मधुप स्वयें २४८
भार्गवीं साधुच्या संगें जों मठांतहि ती शिरे
तों घोररात्रिहीं गीतीं, चांदण्यांत तशी, विरे. २४९
अर्चिता चंद्रमौलीतें पुरेसें न गमे मना
केलीची आरती राहे ओवाळीत पुनः पुन्हाः २५०

( चालः—राम स्मरावा राम० )

" निरंजनासी निरंजनाचा देवा दीप तुला । दाविती ॥ देवा० ॥
आकाशाच्या अंगणांत तव
सूर्यसहस्त्रीं जो दीपोत्सव
पाजळिती हे पंथी आपुली त्यास करूं साजरा ॥दाविती॥ देवा० १ ॥

सूर्यसहस्रींही जो उरला
पंथीनेंची जाई स्फुरला
नयनीं ऐसा अंधकारलव आहे तोचि भला ॥ दाविती ॥ देवा० ॥ २ ॥

आईच्याची बागेमधुनी
ताजीं ताजीं वेंचुनि वेंचुनी
मुली गुंफिती आईच्याची वेणींतूनि फुलां ॥ दाविती ॥ देवा० ॥ ३ ॥"

गातां गातां अवाक् अंतीं कर जोडुनची बसे
शंभूचें मूर्तिमान् भोळेपण काय तसा हसे ! २९२
तों हळूंच कुणी तेथें अत्यंतार्त जसा कण्हे
तसा स्वर " महात्माजी ! साधुजी ! " म्हणुनी म्हणे २९३
प्रवेश अशिवासी कां कधीं होय शिवालयीं !
भावें सदा अशा निश्चिंतहि तो दचके तई; २९४
अहाहा ! कोण तूं ? झालें काय हें तुज ? बोल ये !
आर्ता अंकीं असे साधू धरी स्फुंदतची स्वयें. २९५
स्त्री एक तों दिसे लज्जालता कंपितशी पुढें
फूल कोमेजलें तसें मूल घेउनिया कडे २९६
बलिष्ट धीट तत्रापी नम्रवीर अणी तिथे
मागें तिच्याचि तो साधू स्वप्नीं तेवि अवाक् वदे २९७
असह्य स्तब्धता कांहीं क्षण ती सहुनी बळें
अग्रणी वीर तो अंतीं पुढें टाकुनि पावलें २९८
नम्रांतरीं उभा राहे, जोडी हस्त, तसा दिसे
शत्रुदुर्धर्षही किंचिन्नतचाप गुणीं जसे: २९९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
विभाग
क्रमांक

" नमस्कृति विनम्राची " वदे स्पष्ट सेवाक्तर्ता,
" नमस्कृति महात्म्यांच्या नमस्कार्य पदांप्रती २६०
गुह्यवेदोपवेदांचें, तपाचीं सुतप:फलें,
अनुभूति समाधीची, विरक्त रतिचीं बळें, २६१
अज्ञात आश्रमांमाजी द्रष्ट्यांचीं अति सूक्ष्म ती
ज्या मति प्रेक्षिती होई, धृति होय उपार्जिती, २६२
अर्जुनी उपभोगोनी ती अमानुष दिव्यता
सुप्त शक्ति मनुष्यांच्या जयांहीं प्रकटीकृता २६३
अनेकची तयांचे कीं उपकार अम्हांवरी,
आर्यभू त्यांचिया स्पर्शें देवभूमि असे खरी ! ! २६४
तथापि सर्व ती संपत् संपादूनि अमानुषी
मानुषी राखिती माया महेषासम जे ऋशी, २६५
प्राकृता पाणपोयींत स्वर्गीया अमृताप्रती
येती जाती तया प्रेमें चवाठ्यावरि पाजिती, २६६
देतां कळूं न जे सेवा कथिती नचि नामही
अहर्निशीं भवीं शेषासम उद्धरती मही, २६७
जनांच्या सुखदु:खांच्या भाग भोगित आपला
शीतवीति स्वयें अश्रू सिंचुनी जन तापला, २६८
तयांच्या उपकारासी तुलनाचि नसे ! ! जरी
उरे भारतराष्ट्राच्या चेतना तनु–पंजरीं; २६९
[१]आसुरीया, अकंदीमा, मिश्रा, रोमक, मक्षिका,
दानवा, पारसा, हूणा, लुप्ता जाति शकादिका २७०

---

१ ॲसिरिया, ॲकेडिया, मिसर [ इजिप्त ], रोम, मेक्सिको इत्यादि प्राचीन राष्ट्रें.

कालाच्या त्या महोर्मींत, वादळांच्या शतांत ही
सहस्रक्रांतिकंपांत, अहो अद्यापि तात ही— २७१
आर्यभूमि असे माझी जीवनक्षम कीं जरी
तयांच्याचि पदस्पर्शें, तयांच्याचि तपें तरी ! ! २७२
त्यांनींच राहुनी राष्ट्रीं, देहीं प्राण तसें जना
आघातशून्यही होऊ दिलें जीवनशून्य ना ! " २७३
असे वदत तो वंदी वीर साधुपदांप्रती
याचुनी अभया सांगे कथा त्रोटक शीघ्र ती: २७४
कीं कसें हरिणांच्या त्या कळपावरि त्या दिनीं
एकाएकींच वाघाची झेंप हिंसक येउनी २७५
**माधवा** ग्रासिलें होतें: परि या चि तिघे जणीं
ग्रासितांही गिळूं व्याघ्रा दिलें न बल योजुनी २७६
दुःखी दुःखें तयांच्या तैं तदाकारचि सत्वरी
साधु तो विरुनी होई जल जेवि जलांतरीं. २७७
त्यांच्या घायाळ देहा दे सुखसात्विक औषधी
त्यांच्या घायाळ आत्म्या दे सुखतात्विक आर्ष धी. २७८
**माधवा** लव पाहोनी तैं विश्रांत, रमेप्रती
विश्वस्त, आणि निद्रा त्या बालका कुरवाळिती, २७९
अग्रणी वीर जिज्ञासे " झालें येथवरी बरें,
आपल्या अभयें झालें धैर्य कोटिगुणें खरें; २८०
तथापि पुढलें आतां कर्तव्य प्रभुजी कसें ?
झेपेंतुनी ससाण्याच्या कोण राखिल हे ससे ? " २८१

" शंभु ! शंकर ! विश्वासा ठेवा पूर्ण तयावरी
कोण रक्षण कोणाचें त्याविना जगतीं करी ! " २८२
" महात्मन् ! सत्य तें सारें: सत्य हेंहि न कां परी
कोण भक्षण कोणाचें त्याविना जगतीं करी ? " २८३
अतर्क्य प्रभुची माया ! कोण अर्थ तिच्या कथी
ससाण्यासि वदे झेंपे, सश्यासी पळ काढती ! २८४
सूक्ष्मोहि भगवान् धर्मः परोक्षो दुर्विचारणः
अतः प्रत्यक्षमार्गेण व्यवहार-विधिं नयेत् २८५
रात्रींत या जरी कांहीं सदुपाय न योजिला
जिवंत हा उद्यां साधो ! द्विज जाइल जाळला ! २८६
हाय साध्वीसि तों ते या लेंकुरासि सुलक्षणा
जिवंत जाळण्याचीही दया दाखवितील ना ! २८७
रातोरात तरी ह्यांसी स्थला अन्य सुरक्षिता
नेण्याहुनी दुजा येई सदुपाय न मन्मताः २८८
सुरक्षित स्थला आणी कोण हिंदवि[1] दे जना
गाजींत एक बाजीच्या[2] त्या कृपाणकृपेविना ? २८९
तिघेंचि, आणुनी आतां अश्वां शीघ्र तयावरी
तिघांसि घालुनी, आम्हीं तिघेहीजण सत्वरीं, २९०
मांडी न मोडतां वेगें देतो पोंचवुनि बलें,
राष्ट्रशक्ति भवानीचा जेथ तो भगवा डुले ! २९१

---

१ हिंदवी—हिंदु २ बाजी—थोरले बाजीराव ३ सोमनाथ—सोरटी-सोमनाथ, महंमदाने फोडलेली मूर्ति.

निष्क्रिया भक्तिसी पावे देवही न गमे मला
सोमनाथ मला कां त्या अनाथासम कांपला ? ” २९२
“ काय हे वदसी वेड्या ! विश्वासा धरुनी बघे
कालही काय त्या मार्कंडेयाचें तइं सांग घे ! २९३
शंकेनें द्वेषची वाढे विश्वासेंच दया अणी
शत्रु सोड शिलेच्याही भावानें द्रव ये मनीं. २९४
येउं दे अंतुनीयातें उद्यां येथ तयाप्रती
सत्य तें सांगतां सारें ही द्रवेलचि तन्मती. २९५
शस्त्राची बोलतां भाषा द्वेष उत्तर देतसे
सत्याची बोलतां भाषा दया उत्तर देतसे. २९६
“ सत्याचीच न कां भाषा ’? निरुपायबलें मधें:
कंठीं कंपित कीं वंशीतुनि तेवि रमा वदे: २९७
“ सत्याचिं भगवन् आम्हीं न काय वदलों तदा
पुत्रजन्मदिनोत्साहीं काय पाप घडे वदा ! २९८
तेंचि सत्य कथूं जातां, दया दूर अहो परी
गायही न मला नेती हाय ओढिल त्यापरी ! २९९
घेते जीव जरी माझा होतें दुःख न तें मनीं
परी यां,:—अंगुलीनें ती माधवाप्रति दावुनी: ३००
‘—परी यां माझिया मातें जीवाहूनि प्रिया जना
वरी कहर हा ! हा ! हा ! ” हाय घेतचि तत्क्षणा ३०१
धृतिचा जनलज्जेचा बांध फोडित, दाबिला
अद्यापि ने विलापाचा पूर वाहवुनी तिला ३०२

आपल्या आसवांच्याची हाय हा करिता सती
पूरांमधें पडे केळी तशी उन्मळुनी च ती ! ३०३

आणि " प्रिया ! प्रिया !" ऐशी कंठ सोडुनि मोकळा
फोडीत हांक ती बाला प्रियाच्या पडली गळा. ३०४

बाई ! मुली ! अहा कांहीं लेकुरासि बघा तरी
वीर तो तो तिला साधु आवरूनि उगी करी ३०५

शिंपडावी जशी तापें सुकली लतिका जलें
अश्रूंनीं ती स्ववाचेसी सिंचिता वदली बलें: ३०६

" दयेंत अंतुनीयाच्या सर्पाच्याचि बिळीं तसें
छोटूं तरी नका मातें नका क्रूर बनू असे !" ३०७

" मुली ! मुली !' तिला हस्तें कुरवाळित तो ऋषी
वाणी सौम्य स्मितीं सिक्ता अंत्यतार्द्र वदे अशी: ३०८

' सर्व आत्मा ! मुली, आत्मा प्रेम ! प्रेमबळें अहा
किती अंतुनिया ! येती सर्पही स्ववशीं पहा: ' ३०९

असें बोलतची कांहीं दूर टाकुनिया पदें
वासुकी ! वासुकी ! बेटा ! प्रेमें मंजुल हाक दे ! ३१०

तों बिळामधुनी, जैशी उर्णावेंतुनि वासना,
ये तसा साप बाहेरी कोणी डोलविता फणा ! ३११

" ये ! ये ! असलेची भारी भूक ती तुज लागली
अतिथी परि हे येती बघ आणि तुझ्या घरीं ३१२

त्यांच्या सेवेंत मी तूतें पूजा होय तरी नसे
नैवेद्याची दिली वाटी दुधाची ' म्हणुनी हंसे ३१३

तों घेत ये पुढें मागें वळश्यांसि सुळूसुळू
सर्प साधुपदीं प्रेमें शीळ घेत हळूहळू. ३१४
धरी विषधराच्या तैं मुनी दूध मुखापुढें
आणि पाही हंसोनीया विस्मिता अतिथीकडे, ३१५
जिभा सुळुसुळुं काढी वाक घे वरचेवरी
पिई चुळुचुळु चाळे शत सर्व मुर्दे करी, ३१६
पिई सर्प दुधा प्रेमें पिई दुःख जसें सुखा
पिणें रिक्त करी पात्रा जशा संगम कौतुका, ३१७
आणी भुजंग तो पीतां दुग्ध ये जितुकें मना
गुंफुनीया बसे शाळुंकेसी डोलविता फणा, ३१८
" वा ! वा ! ' साधु हसे ' आयुर्दुग्धपात्र रिते करी
मृत्युही छत्र तो मृत्युंजयाच्या धरितो शिरीं ! ३१९
सर्प ना ! गळली खालीं एकधारचि हीं जवें
अशी हलाहलाच्या त्या पेल्यांतुनि पितां भवें ! ३२०

पद ( प्रणती तव चरणा, जयाना ! )

हलाहला प्याला । ज्या तुम्हीं । हलाहला० ॥
प्रभुजि पहा ना बिंदु त्यांतला खालीं हा गळला ! ॥
उपाय तू कोटी । करिसी । उपाय० ॥
सुखदुःखाच्या हलाहलासी शमवायासाठीं ॥
शतसूर्य फुलांचीं सोमफुलें नवनवतीं ।
अमृतार्द्र आणवुनि पिळुनि मस्तकावरती ।
फेंकिशी सदा निर्माल्य तशीं तूं परतीं ।

चंद्रमौलि भोला । परंतू । चंद्रमौलि० ॥
अमृतत्वाचा मात्र बिंदु त्या खालीं ना गळला ॥ १ ॥
देवदेवची तूं । ईश्वरा । देवदेवची० ॥
ह्या दीनांच्या मनीं न तुमच्या स्पर्धेचा हेतू ॥
अमृतवल्लि राहो । तुमची ।
बुटी विवेकाची लव तरि ती अनुपाना द्या हो ॥
जाळी जगताला । कीं पहा ।
सुखदुःखाच्या हलाहलाचा बिंदू जो गळला" ॥२॥ ३२१

जों जों मजुल तालांहीं हसे भक्त " अहा ! अहा !
अहा ! मृत्युंजया ! मृत्युंजया ! शंकरजी अहा !!" ३२२
भावावेशें क्रमें तों तों आत्मशक्ति विकासुनी
घाली सर्वांवरी कांहीं एक अद्भुत मोहनी ! ३२३
भुजंग भुलुनी लागे डोलडोलवुनी फणा
स्तुतीतें भगवंताच्या द्यावया अनुमोदना, ३२४
रमा निर्भयशी झाली माधवा गमलें हृदीं
ओती कुणी जशी घांवावरि शीतल औषधी, ३२५
लेंकरूं तें बघूं लागे स्वप्नें गोड निजेमधें,
जागृतींतहि त्या वीरा भासे स्वप्नचि सर्व तें. ३२६
परी गलबला तोंची दूर तेथुनिया कुठें
संकटाचा कुणा येत्या पदनाद तसा उठे. ३२७
वीर तो तईं होवूनी पुन्हा सावध साधुला
" ऐका ऐका ! ' वदे ' येई शत्रु शोधित ह्यांजला. ३२८

माझीही आपल्या निष्ठा सत्य आत्मबलावरी
परी आत्मबला सीमा असे देहबला परीं. ३२९
सर्प एक वशीं आणी तया आत्मबलाप्रती
सहस्रें नगसर्पांचीं वश होतिल काय ती ? ३३०
होतिल वा असें मानूं; प्रयोगार्थ परी अशा
जीव तीन बळी देणें काय वर्धक सद्यशा ? ३३१
तथापि भार हा सारा शिरीं घ्याल जरी स्वयें
घ्या सुखें साधुजी ! मी तों घेऊं इच्छिन जो भयें !" ३३२
हंसे साधु " अहा बेटा भार तीनचि ना परी
शंभुच्या जीवमात्रांचा शंभुच्याचि असे शिरीं !": ३३३
" भावापुढें जरी साऱ्या व्यर्थ भौतिक औषधी
साधो ! कां ती तरी घावावरी बांधितसा बुटी ?" ३३४
" घावांत ही जशी याच्या पिळी शंकर तेंवि ती
पिळील अंतुनीच्याही प्रेमाची हृदयीं बुटी !" ३३५
तेव्हां वीर वळोनीया माधवासि रमे अणी
वदे " ये आपुल्याही हें साधुभाषणची मनीं ३३६
तरी निरोप घेतो जी ! शुभ हो ! तुमची सदा
निष्ठा सिद्धि तशी सेवो साधूंच्या सदया पदा !!" ३३७
असें बोलतची आहे तों तो दार कडाडुनी
प्रांगणी अंतुनीयाचा गौर सैनिक ये कुणी. ३३८
प्रांगणीं बघतांची त्या गौरा केळ तशी रमा
कांपुनी वदली वीरा ! साधो ! रक्षण व्हा अम्हां ! ३३९

‘ धीर बाले ’ ! वदोनिया परिपाठवशें झणीं
आगता स्वागता द्याया संत ये जइ अंगणीं; २४०
वीर शीघ्र तईं सर्वां कोठीसन्निभ जी दिसे
तींत नेउनी तद्दीपा मालवूनि पुढें घुसे २४१
सैनिका अंतुनीयाची समजूनि मनांमधें
संत त्या “ अंतुनी ! ये तू बेटा ये ” म्हणुनी वदे. २४२
मनीं चपापला गोरा; नाम ह्या कळलें जरी
निश्चयें माधवाचीही वार्ता या श्रुतची तरी २४३
हेंची स्वनामसें दावूं, कथी काय बघूं, मनीं
योजुनी तो वदे शुद्धीं महाराष्ट्रवचीं झणीं; २४४
“ आपल्या साधुजी ! अंतर्ज्ञानाची महती जनें
वर्णिली सत्य ती ! नामें वदा केवल दर्शनें ! ” २४५
“ छे, छे, हें तो मुला अन्यापासुनी कळलें मला
ज्ञाता शंभु, न मी ! ये तूं शंभुदर्शन घे मुला ! २४६
ये आंत शंकराची ही बघ मूर्ति शुभंकरा
प्रेमगद्गद वंदी ये वंदनीय महेश्वरा ” २४७
पिंडिका पाहतांची त्या गौरा कोसळले हंसे
एक मूषक कीं तोंची तच्छिरीं चढुनी बसे: २४८
“ महाराज जया देवा वारूं मूषकही नये
काय त्याची सदा सेवा करूनीहि करासि ये ? ” २४९
“ हा रे वेड्या ! पित्याचें कीं पूज्य चित्रहि कापितां
कापिला कां पिता जाई ? चित्र चित्र पिता पिता ! २५०

आणि वारूं न येतींची सत्य प्रेमल लेकुरें
अंगावरूनि तीं प्रेमें अनिवार्य, न कीं बळें ! ३९१

पद.

महद्ब्रम्हयोनींत महेश्वरवीर्य धरी चंडिका ।
जगाची जननी ही पिंडिका ! !
गर्भवतीचें दिगुदर दाहीं दिशा फुगेल्या पला ।
लागल्या काळाच्याहि कला ॥
ब्रह्मांडाचा पिंड तेधवां प्रसवे हा ती अजा ।
सर्वेही भगवंताची प्रजा ॥
मूर्ति कृमीपासूनी कार्तिकापर्यंताहि ज्या ज्या ।
सर्व त्या भगवंताच्या प्रजा ॥
( चाल ) हा दांड पोरटा मानुष बहु हावरा ।
( पितरांचा ) पितरोंका वारस वदत मीच कीं खरा ।
तरि मूषक जावो अन्यकुणाच्या घरा ।
भोग मूषका स्वेच्छप्रभूच्या प्रेमाची चांद्रिका ।
जगाची जननी ही पिंडिका ! ! ३९२

जीवात्म्यैक्या परी ऐशा जाणुनी न जगीं अहा !
अद्यापि अंतुनी आम्हीं अज्ञानीं पचतो पहा. ३९३
जीव जैसा तुझा तूही जाण जीव दुजा तसा
प्रेमाचा मंत्र हा सोपा ! प्रेमस्वर्ग करी रसा ! ३९४
त्वद्द्वेषा तरीही कीं पडलेंच जरी बळी
दीक्षागृहा तसें त्यातूं विझवीं तरि तत्पलीं. ३९५

अनुताप जलें बाबा; क्षमा तूं कर: तो करी
जगज्जनक मायाळू क्षमा याच तुला पलीं " ३५६
" सत्य तें भगवन् ! गौर ग्रीवा डोलवुनी वदे
देवपुत्र[1] स्वपुत्रांसी सत्संदेश असाचि दे. ३५७
संत त्वत्सम हे संता कुठेंही जरि तो वसे
तरी तो अनुयायी त्या ख्रिस्ताचाच खरा असे. ३५८
म्हणूनीच तुझ्या कीर्तिश्रवणें तुज भेटलों
भेटतांचि तुला आणी भजूंही तुज लागलों. ३५९
अंतर्ज्ञानें तुम्हां माझें नांव ज्या कळलें असे,
अज्ञात राहणें तेथें मम कर्महि वा कसें ! ३६०
कर्माचा त्या मला होई अनुताप गुरो तरी
माधवाची क्षमा याचूं इच्छी हा जन अंतरीं. ३६१
कळेल मज तो कोठें, क्षमा देइल या जना,
होईल मानसीं देवा मी तरीच सुखी पुन्हां ! ! " ३६२
उक्ति ही ऐकतां त्याची संतोषें वदला मुनी
" ही शुभेच्छा तुला होवो कल्याणास्पद अंतुनी ! ३६३
विश्वासा ग्यां तुझ्या ठायीं पूर्वीचि धरिलें जया
विश्वासार्हा दयाशीलत्वें त्वां सार्थविलें तया " ३६४
" त्वत्कृपा करिसी साधो कुपात्राहि सुपात्रसे ! "
कुपात्रची परी देवा मी मनुष्य ! फणी नसे ! " ३६५
" अहा अंतुनिया कां नां फणीच्याही हृदीं दया ?
आणि आम्हां मनुष्यांच्या हृदयीं विष कां न या ? ३६६

---

१ देवपुत्र=जीजस ख्राइस्ट.

आम्ही असें पदाघातें जयासी दुखवूं सदा
देऊं दोष तयासींची त्याचि तो डसतां पदा ! ३६७

एक एवहि भूतात्मा भूते भूते व्यवस्थित:
सर्प होय वश प्रेमा, द्वेषा मानवही अत: ! ३६८

अत्युक्त हें दिसे तूतें ? येथें तों असती सभे
सर्पही भूतनाथाच्या प्रसादार्थ सदा उभे ! ३६९

वासुकी तो सुखस्पर्शें अंगें चेपुनिया वरी
स्वामीच्या भृत्य कीं तैसा छत्र शंभुशिरीं धरी ! " ३७०

हसे गौर " सदा खातां पचनार्थ फणी असे
वृक्षा वा वेढुनि स्तंभा डोलवीत फणा नसे. " ३७१

साधुही हसला " जैशी क्रूर तूं म्हणुनी अजी
वदंता करि ती खोटी अनुतापवचें तुझी ३७२

तसें हृदयशुद्धीनें कळेल तुज अंतत:
एक एवहि भूतात्मा भूते भूते व्यवस्थित: ! ३७३

तया हृदयशुद्धीच्या प्रेममंत्रजपाप्रती
आरंभीं तू अपापांचा छल सोडुनि संप्रति " ३७४

" मान्य साधो ! क्षमा माझ्या क्रौर्याची मजला करा
आणि पाचारुनी आणा माधवा करुनि त्वरा. ३७५

मी त्याच्या वंदुनी पाया, द्रव्यदंडहि भोगुनी
सोडुनी सकला जातों ससैन्य परता झणी " ३७६

आत्मशक्ति कशी व्याघ्रा नमवी हरिणांप्रती
असेल भासली वीरा ती अपूर्व चमत्कृति: ३७७

उत्साहें जो अशा साधू पाही वीरमुखाकडे
तों दिसे मूर्तची चिंतोद्विग्नतेसम तो पुढें ! २७८
ह्या अविश्रांत; ते गेले विश्रांत्यर्थ गृहामधी;—
करूनि वर्तनांचा त्या सरलार्थ असा सुधी; २७९
" **माधवा ! माधवा !** ये तूं ' रसवत्सल ज्यांतुनी
ओथंबुनी गळे ऐशा हांका मंजुल दे मुनी. २८०
स्वयें देउनि हस्तातें साधु आणित **माधवा,**
तया गौर वदे " स्वामिन् ! क्षमस्व मज !" तेधवां. २८१
" मेघ तोयाविना जैसे कोशागार धनाविना
दंडशक्तिविना तैसें क्षमादान विडंबना ! २८२
तथापि आपल्या अंतःकरणीं अनुताप ये
अतःपर तरी माझ्या सुहृदांसि छळूं नये. " २८३
" असां निर्भय ! पाचारा स्वकान्ते तनया तुम्हीं
सांगाल सर्व तो द्याया पापदंडहि सिद्ध मी ! " २८४
वदे **माधव** ना कांहीं कांहीं वीर न वा वदे
तथापि साधु उल्हासें, मुली ये चल ! हांक दे. २८५
" तू तों वधू ! वधू ये त्या शत्रूसी नरही सुधी
देतिना अनुतापाच्याहूनि दंड दुजा कधीं. २८६
तरी उभयतां तुम्हीं करुनी मजसी क्षमा
गेहीं चला स्वयें मीची देतो पोचवुनी तुम्हां. " २८७
गौराचीं हीं वचें कर्णीं येतां मात्र न साहुनी
निजमौन पुढें, बोले वीर साग्रह तैं ह्मणी; २८८

" घडे येथवरी जें जें घडलेंच गुरो ! परी
एकलें या असें रात्रीं जाऊं देइन मी घरीं ! " ३८९.
शब्देंच त्या, तशा आविर्भावेंची, कळलें मनीं
गौरा कीं हाच त्या नेता पळवूनि तया झणीं ! ३९०
अत्याग्रहें पुढें झालें कार्यही बिघडे असें
जाणुनी तो झणीं वीरा अनुमोदन देतसे; ३९१
बहुवार पडे पाया बहुसाल करी स्तुती
पाहुनी पाहिजे तें तें सोडी गौर मठाप्रती. ३९२
एक्या साहाय्यका वीरें दोघांतूनि निजा झणीं
पाठीवरीच गौराच्या पाहण्यास्तव धाडुनी; ३९३
केले सावध साधूतें " अहो हा चर, धूर्त हा
अंतुनी न ! परी त्याचा एक सैनिकची अहा ! ३९४
मिथ्यानामें तयें मिथ्या अधिकारमिषें तुम्हां
वंचिलें ! कसला पश्चात्ताप तो ! कसली दया ! " ३९५.
" संशयी हो न तूं वीरा; दिसे माणुस तो सुधी
मुळ्याचें सैनिकाचेंही नाम एक निघे कधी ! ३९६
वंचुनी एक गोसावी काय तें मिळणें तया
वंचना ना तसें त्यासी सहजा वदवी दया. " ३९७
साधुची मोहनी स्वर्गासमची गमवी रसा
माधवा दावि तो वीरोत्तंस लोक जसा तसा. ३९८
अनिश्चितमना अंतीं वदला द्विज " आपुले
उपकार न ते एक्या मुखें जातिल वर्णिले, ३९९.

वीराग्रणे ! तुम्ही आला कोण कोठुनि वा कसे
अपूर्व दृष्ट ही रक्षा ह्या पूर्वार्जित पुण्यसें ! ४००
तथापि साधुच्या प्रेमप्रभावें वळला जरी
असेल अंतुनी, अस्मत्संशयें न चिडो तरी ! ४०१
एतदर्थ तुम्हीं जावें ग्रामीं शीघ्रः कसें कुठें,
वर्तती, वर्तले, तें तें या जीं शोधुनि मागते. " ४०२
" उत्कृष्ट ! " वीर बोलोनी, साथी राखुनि रक्षणीं
चालला हालचालींसी अरींच्या निरखूं झणी. ४०३
ती घोर रात्रि ! दुर्दैवी धूर्तांचा छल घोर तो
चालला चावडींतूनी ! गांव थरथर कांपतो ! ४०४
असह्य यंत्रणा काढी धूर्तांच्या वदनांतुनी
जें जें नांव भयें वा तें वार्ते तें झणि ऐकुनी ४०५
अंतुनी धाडुनी दे त्या घरीं दूत यथारुची
शोधण्या माधवा किंवा धरण्यासि धन्यासची ! ४०६
मित्र कीं माधवाचा तो म्हणुनी पहिली तदा
पेढीवाल्या तदा येई शेटींच्या वरती गदा ! ४०७
असे माधव येथें कां म्हणूनि घुसती घरीं
नसे माधव येथें कां म्हणोनि कुटिती वरी ! ४०८
दीन तो हंबरे शेटी " कुठें ? ज्ञात न तो मला "
" सांग ! कां पाहणें नग्ना तुझी हे तनया तुला ? " ४०९
असे भुंकुनि तो धांवे गौर त्या अबलेकडे
हिसडूनि तिला पाडी पित्याच्याचि अहो पुढें ! ४१०

तीन सैनिकची तेथें ! रोधूं त्यास न ये परी
भरल्याहि तया गांवांतूनि एकहि त्या घरीं ! ४११
मिटी नेत्र पिता; कन्या प्रेतशी; न धजे पुढें
ती घोर रात्रिही पाहूं कृत्य पाशव जें घडे ! ! ४१२
ओकला विष तो जाई जसा सर्प झणीं बिळा
रिक्तवीर्य तसे जाती दैत्य तेथुनि तत्पला ! ४१३
पिसाळ कुतरे चावे किती कोण गणूं शके !
पेटतां वणवा जाळी रान, वृक्ष न मोजके ! ४१४
पाहतांच असा हा:हा:कार वीर न तों पुढें
टाकितां पदही धावें त्या बद्धाश्वतरूकडे. ४१५
सोडूनी बांधल्या अश्वां, साथीच्या सह त्या झणीं
भरधांव मठा येतां उडी सत्वर टाकुनी, ४१६
माधवा वदला " सारा घात ! अश्व इथें—उठा:
पलही दवडा तों या स्मशान समजा मठा ! " ४१७
संत तो संतची ! हांसे " धीर ! " वीर वदे तदा
" शांतभावचि हा, साधो रिपुक्रौर्य न आपदा ! ४१८
चलाचि चलणें तुम्हां तरी: नातरी चालले;
गांवची न अशा भोळेपणांत सगळा जळो ! ४१९
करिती घेउनी रांडामुली घेउनि दांडगे
लांडगे ते पुराणांना पुसताति ! बसा उगें ! " ४२०
हूं न चूं करितां, कां तें कळतांहि न तें मनीं
रमामाधव पुत्रासी घेउनी उठती झणीं. ४२१

अश्वांवरी तिघां साथी दोघे घालिति जों तयां
वीर तों धरुनी पाया साधूच्या वदला " दया— ४२२
दया करा ! चला साधो तुम्हीहि मज संगतीं
स्वराज्यांत चला तेथें धर्म जागृत संप्रति. " ४२३
" स्वराज्य तेंच जें बाला दिग्कालांत न सांपडे
दिग्बद्ध ते स्वराज्यत्वा भोगी हें न कधीं घडे ! ! ४२४
इथें तिथें प्रयोगा हें क्षेत्रें छत्रपतीस तीं
देवें दिलें उभ्या विश्वा आम्हां पत्रपतीप्रती ! ! ४२५
मोहनींत पुन्हां ना कीं फसो हें मन आपलें
धाकेंचि या न ते वीरें शब्द ऐकुनि नां पुरे; ४२६
साथी राखूनिया तेथें बघूं काय घडे पुढें;
सुटल्यांतुनि त्या एका अश्वाच्यावरती चढे. ४२७
साथी तिजा तिथें राहे तो वेळोनि वदे झणीं
" एक मात्र कृपा आतां व्हावी संकटि हो मुनी. ४२८
हें पहा प्रश्न हा नाहीं द्विज एक, न, एक ना
कुटुंबरक्षणाचाही ! विचारा प्रभुजी मना. ४२९
कार्यीं श्रीराम ज्या, ज्या श्रीरामदास शिरोमणी
तेही वैराग्यवंतांचे अनुरक्त सदा मनीं ४३०
धर्मसंस्थापना त्याची, त्याचि दुष्कृतनाशना
महाराष्ट्र उभा आजी रणा भारततारणा. ४३१
त्या कार्याची तयाची श्रीरामाची तरवार: ती
ये शिवापासुनी आजी बाजीराय करांप्रती. ४३२

गोमांतकीं अविंधानें हिंदुता छळिली कशी
जाहलीं धर्मकर्मेंही दंडनीय अधर्मशीं ! ४३३

अहो परशुरामाचें देवस्थानचि ना, जनीं
पूजा उध्वस्त देवांची देव देव घरांतुनी ! ! ४३४

मौंजीविना मुलें, लग्नाविना ह्या युवती अहा
संस्कारहीन, ही सारी प्रजा पौरुषहीन हा ! ! ४३५

देश गेला ध्वजा गेली गेला धर्महि दुर्यशें
गेलें राज्य तया राष्ट्रीं गेलें काय वदा नसे ! ! ४३६

प्रदेश पुर्तुगीज़ांच्या राज्यीं जो तितुका, जया
गोमांतक अशी संज्ञा, धर्म ना न जिथें दया, ४३७

तत्रस्थ एक होवोनी हिंदुमात्र अनिंद्यशा
यशासी प्रार्थिता झाला बाजीच्याचि महायशा. ४३८

शास्त्री, पंडित, देसाई, देशमुख्य, जनी जनीं,
अविंधोच्छेदना पाचारण जे करिती मुनी, ४३९

तदन्वयें महाराष्ट्रीं—वीरराष्ट्र—विमोचना
मुक्तखड्ग इथें ठायीं ठायीं झुंजति या क्षणा ४४०

सहकार्य करूं त्याशीं, प्रतिरोध विजातिशीं,
उत्तेजना जना द्याया, धृति दावुं, असे कशी. ४४१

चरसैन्य असे नानारूपें प्रेषित ह्या जनीं
लालभाग, हले लागे, दर्शवीत निदर्शुनी ४४२

कारस्थाना उभारी या अंताजीच नितांत कीं
देसाई जो स्वदेशाचा, धर्माचा ध्वज आणखी, ४४३

जो हिंदूच्या स्वपक्षांचा सत्यपक्ष म्हणूनियां
अग्रणी होउनी पाडी पाखंडार्थ हणूनिया, ४४४
हिंदू स्वधर्मकर्मातें निषिध्दूं रिपु जैं निघे,
एक पंत वदे हा मी स्वधर्म करितोचि घे ! ! ४४५
स्वधर्म प्रेम हें हीं तद्वीरताच ठरूनिया
महापराध जैं धावें पुर्तुगीज धरूं तया: ४४६
' यज्ञप्रिया ! तुझी तीची हौस पूर्ण करावया
धर्मशासन[1] यज्ञीं ये जाळितो तुजलाचि या !' ४४७
गृह, वैभव, वंशीया अधिकार पदांप्रती
तदीय लुटुनी नेतां धर्मशासक बोलती: ४४८
मायाबळें महाराष्ट्रीं खड्ग तो उपसूनिया
अंताजी कांपवी आजी अंतकासमची तयां ४४९
त्या तत्सैन्यामधें आम्हीं तिघे गुप्तपणें तरी,
मागती अंतुनीयाच्या सदा टेहळणीवरी. ४५०
कैवार भार्गव क्षेत्राचा जो भार्गवभक्त घे.
ब्रह्मेंद्र कोकणीं ब्राह्मण्याचा पक्ष धरूं निघे ४५१
गोमांतकीं स्वधर्माचें धुरीणत्व तुम्हीं तसे
घ्याल हे हिंदुमात्राची आशा उत्कट विश्वसे ? ४५२
त्या आशेच्या बळें आलों आश्रयार्थ तुम्हांकडे
धर्मकार्याप्रती देणें गति धर्म—धुरंधरें ! ४५३

---

१ धर्मशासनः—Inquisition नांवाची संस्था. युरोपप्रमाणें गोव्यालाही स्थापली होती. जे हिंदु स्वधर्मकृत्यें उघडपणें करतील त्यांना ह्या कोर्टापुढें शिक्षा मिळे व प्रसंगीं जिवंत जाळण्यांत येई.

20845

हे पहा भीति मच्चित्ता वाटे जो न उजाडलें
सैन्य तो अंतुनीयाचें मठा वेढिल सत्वरें, ४९४
आणि पाहुनि ना येथें माधवादि, तुम्हांप्रती
देतील कष्ट ते सांगू वार्ता तद्विषयीं कुधी ४९५
रिपु नेणति जों गेले कोण कोण दिशे कुठें
तोंवरी बहुधा ग्रामीं शोधितील इथें तिथें ४९६
संधींत वीरही त्याची रक्षितस्थल गांठुनी
रक्षूं ससैन्य या ग्रामा शकूं येइल ही झणी " ४९७
" कष्ट काय ! कुणी आले बघायासी मला जरी
तरी शंभुकृपा आहे रक्षणार परोपरी ! ४९८
भय ना शिवणें येथें, असत्य शिवणेंहि ना
सांगणें सत्य, जें तेंची दिसले निजलोचना " ४९९
चपापुनी वदे साथी " गमे मी शकलो नसे
अभिप्राय करूं माझा स्पष्ट जो हृदयीं वसे ४६०
सुरापास सुरा देणें गोदानासहि खाटिका
अर्पिणें न परि आर्ता सत्यें सज्जन हिंसका ! ४६१
आम्हीं तुम्हीं रिपू आतां येतां स्पष्ट तया असें
कर्तव्य सांगणें: जाती कुठें ठाउक तें नसे ! " ४६२
" असत्य बोलणें आणी तें कर्तव्य ! कधीं अहा
समन्वय अशा शब्दप्रयोगीं न घडे पहा ! ४६३
खोटें खोटेंचि तें बेटा ! सत्यार्थं मरणं वरम्
नहि सत्यात्परो धर्मः नानृतात्पातकं परम्" ४६४

" सत्याची पुण्यता शब्दीं मात्र, हेतुंत ना जरी
' बेटा ' मला वदूनीया खोटें कां वदतां तरी ? " ४६५
" क्षमा कर चुकीची ती ! " " ना मुनींद्र चुकी न ती;
दे शुद्धबुद्धिची सत्या सत्वा, ना जड वाक्तती ! " ४६६
" शुद्धबुद्ध अरे तों तें सकळा मम जाणते
आत्महेतोः परार्थे वा ये मृषा न वदन्ति ते ! " ४६७
" सौभाग्य त्या सतीचें, त्या बाळाची करुणाचि ना,
शत पीडित जीवांचें बंधमोचन या क्षणा ४६८
अवलंबुनिया राहे जिव्हाग्रीं तुझिया ! तरी
साधो मौना धरायाची तू निदान कृपा करी ! ! " ४६९
" परी पीडित जीवांच्या मोचनार्थचि मानवा
सत्यं वदेति वेदाज्ञा ! नच मौनं चरेति वा ! !" ४७०
हाच ! हाच ! असे खड्गाग्रानें दावित तों स्वयें
लाविलें न कधीं जें, त्या द्वारीं गर्जत गौर ये ! ४७१
तात्काळ सैनिकांतूनी कांहींनीं धरिला मुनी;
वेढिती अन्य ते शस्त्रीं मठा सत्वर घेउनी. ४७२
" तूं रे कोण ? ' असे साथी पाहतां चवताळुनी
अंतुनी गर्जला ' त्या ही धरा सैनिक हो झणीं ! " ४७३
साथी तों संयमूनीयां मनःक्षोभ वदे " अहा
मी तों एक उतारूची अजाण प्रभुजी पहा ! " ४७४
" कांरे सत्यचि हे साधो ? " " होय अंतु मिठींच ना
आम्ही तुम्ही उतारूंची ! जगीं स्थायिकता कुणा !!" ४७५

“ कुठें माधव ? ” “ नां येथें ” वदतांच असे मुनी
चर गौर पुढें येई पूर्व तो चवताळुनीः ४७६
“ इथें, इथें ! घुसा फोडा खोली ! हा, पकडा, इथें !
झाडुनी पाहतांही त्या मठीं माधव ना कुठें ! ४७७
आशा स्पर्शी फुले साथी पुन्हां, धन्य ! वदे मनीं:
“ कसें वाक्सत्यही साधी घातही न करी मुनी ! ” ४७८
“ सामान्यही जगीं साधू बोलती नचि वांकडें
नंदीबैल तसा तू तों शोभलासि शिवापुढें ! ४७९
सांग सत्य तरी ” “ अंतु सत्यची वदलों असे;
ससीमीं वांकडें, ते त्या निस्सीमीं तगणें कसें ! ” ४८०
“ इथें माधव होता कां” “होय” “ आणिक कोणरे ? ”
“भार्या सपुत्रही त्याची” “आणी कोण तया बरें ? ”४८१
“ तिघेजण !—जयांमाजी हाही एक” असे मुनी
साथीस दावुनी बोले पुसतांहि न अंतुनी ! ४८२
“ ठीक, ठीक ! खराची हा शंभुभक्त ! बरें पुढें
सांग साधो कुठें सारी टोळी ती पळुनी दडे ? ” ४८३
“ तें मात्र ठाउकें नाहीं ” साधूचे वच हे झणीं
फुलवीती सदाशा त्या साथीच्या फिरुनी मनीं ! ४८४
“ खरेंच तें तया कैसे व्हावें ज्ञात ? बरें जईं
सोडुनी मी तुम्हां गेलों ’ चर गौर पुसे तईं: ४८५
‘ तेव्हां कोण कसें बोले, गेले कोण, कसें, कुठें ?
सारसर्वस्व धर्माचें साधो केवल सत्य तें !” ४८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

वृतांतासि तदा झाल्या साधुवर्यें कुणी जसें,
पुस्तका विवृता वाची तसें साग्र कथीतसें: ४८७
वीर काय वदे, गेला ग्रामीं, कैं परता वुसे,
कुठें, किती, कधीं गेले; साथी काय कथी कसें ! ! ४८८
चावतां येत साथीच्या ओष्ठीं रक्त फुटोनिया !
गुप्त हेरचि हा ना कां शंका येत उठूनिया ! ४८९
गौर हेर ! न गोसावी ! साथी ज्याप्रति अंतुनी
त्याची, कर्ता कटाच्या या हिंदुच्या ! समजे मनीं. ४९०
पंत अंताजिचें तोंची नांव साधुकथेंत ये:
आणि वृश्चिकदंशें कीं अंतुनी उसळे भयें ! ४९१
साथीसी क्रुद्ध पाहोनी दटावी " वद सत्वरीं—
आजी अंताजि तो कोठें ? प्रियजीव तुला जरी ? ४९२
" मी उतारूं ! न वा प्यालो भांगही शिवभक्तिची !
नंदीसें सेविलें ना वा शिवा !—ज्ञात मला नची ! ४९३
चर तों तरवारीनें साथीसी झट भोंसकीं
वारी त्या अंतुनी वेगें " हां ! हें योग्य अम्हां नची ! ४९४
धर्मशासनहस्तींची दंड, ना इतरांचिया
क्रोधांतही कलंकूं ना येशूच्या सुयशा तया ! ! " ४९५
सशस्त्र स्वार गौरांचे पाठलाग करूं झणीं
साधुनिर्दिष्ट वीराच्या दिशे प्रेषुनी, अंतुनी ४९६
क्वचित् मठीं कुणा गुप्तागारींही न लपो कुणी
प्राचीना दे मठा वक्त्रीं ज्वालांच्या मग लोटुनि ! ४९७

साधु, रक्ताळ साथीही बांधुनी क्षण त्या पथा
सशस्त्र सैन्य तें थाटे, मशाल करुनी मठा ! ४९८
ज्वालासंत्रस्त तों त्याची मठसर्प पथीं घुसे
क्रोधांत पाय जो त्याच्या पुढें येत तया डसेः ४९९
ये पुढें पाय जो तो त्या साधूचाचि ! ! अहा क्षणीं
मठा गौर तसें देहा आग दे विष लावुनी ५००
हंसे चर " कसें लागे दुधाचें विष ? गोड ना ? "
हसे साधु " न तान्हेंही डसे का जननी स्तना ? " ५०१
विषाच्या लहरी ! ज्वाळा अग्नीच्या ! ! अजि हायरे
पारिजातावरीही तीं जातीं भाजुनि पांखुरें ! ! ! ५०२
सशस्त्र स्वार गौरांचे सूं सूं जे सुटले तदा
हां हां म्हणतांचि ते वीराच्या भिडले पथा. ५०३
घायाळ माधवा आणी अनभ्यस्त रमेप्रती
संभाळणें करी मार्गीं वीराची शिथिला गती. ५०४
त्यांतची शत्रु वेगानें भिडतां समजे मनीं
वीर, दुर्घटची आतां द्विजरक्षण या क्षणीं ! ५०५
एतदर्थीचि आज्ञापी साथी जो सह त्याप्रती
" जा तूं ! पुढेंच जा ! माझी होवो होइल ती गती ! ५०६
आणि जी पहिली टोळी मराठी तुजला दिसे
सांग आज्ञा तया यावें कीं असाल जसे तसेः ५०७
अंतुनीस इथोनीया सोडूं आज नची जिता
जों न त्या साह्य ये भारी तोंचि येईल मारितां ! ५०८

क्षणक्षण विलंबाचा जो जो यावरि घालवाः
हत्या स्त्रीबालवृद्धांची करवाल नवा नवा ! ! ” ५०९
अश्व तों टांच देतांची साथीचा उसळे पुढें
वीर अश्वा दुज्या मार्गीं वळवी झटवाकडें; ५१०
रिपुस्वारहि टापांच्या ध्वनिनें वळती तसें
अंधारीं साधुनी साथी संधि तीच पुढें घुसे. ५११
तीर तो रिपुचा अश्वीं रमेच्या घुसला ! झणीं.
अश्व दे उधळोनीया रमे भूप्रति लोटुनी ५१२
“ दुर्बलांची दशा ऐशी ! स्मशान सगळी मही !
तीर लागे तमींही त्यां ! होती घातक साधुही ! ! ” ५१३
हतवीर्य तसें त्याही वीरासी क्षण वाटलें
शत्रूचे स्वारही भोंतीं तों फोफावत दाटले. ५१४
पाडाव जाहलेंची त्या साश्रु वीर वदे जना
“ धीर सज्जन हो ! साह्या येतोचि बहुधा पुन्हां ! ” ५१५
तों ते आलेचि घेरोनीः वीर मारित मारितां
मार्ग काढुनिया गेलाः—हायरे परि मागुता ५१६
सांपडे द्विज ! आक्रंदे स्त्री ती घेउनि लेंकरूं !
कोण त्या भीषणा दुःखा शके वर्णन हो करूं ! ! ५१७

कैं अश्रूंच्या महापूरीं घे शोकाकुलता उडी
कैं तटींच उभी ठाके बिंब पाहत बापुडी ! ५१८
अश्रूंत चित्र दुःखांचें जें तिच्या उमटूनि ये
स्वयें पाहत त्या राहे स्वयें कांपत ती भयें ! ! ५१९

आम्हीं निघूं प्रियासंगें आनंदी निरुपद्रवी
ज्या सकाळीं कधींनासा सुप्रसन्न दिसे रवी, १२०

ज्या सकाळीं प्रिया पुत्रा राक्षित्या तुझिया तया
दयेसी स्मरतां देवा आले नेत्र भरूनिया, १२१

सकाळला तया आली सायंकाळ अशी पहा,
निघण्यास तया ऐसें येणें हें परतें अहा ! ! १२२

स्वाहाकार सुसिद्धींचे आठवोत कृपा तुझी
हा:हा:कार अपापांचे क्रूरता तरि कां दुजी ? १२३

उगी, रमे उगी ! सोशी दु:खांना जरि सोसवे
ओतूं नको अशीं सारीं आतांचीं तव आसवें; १२४

जीं जीं गमे परा सीमा दु:खाच्या क्षितिजीं पहा
ती तीं पुढें परा सीमा दु:खांची दुसऱ्या अहा ! १२५

ओतिशील अशीं सारीं आतांची जरि आंसवें
विझवीशिल तूं कैशी दु:खाचे वणवे नवे ! १२६

तथापि धीर ना सोडी ! वणवाहि विझे जरी
वर्षाव घे घनौघांचे आले कोसळुनी तरी १२७

विझेच हें वदेना कीं ‘ विझे हीं ’ इतुकेंच मी !
हीच आशा पहा वीरा मार्ग दे तिकडे तमीं: १२८

मार्ग काढुनि शत्रूंचीं फळी फोडित जो निघे
वीर तो वळुनि मागें ग्रामीं अन्य पथें रिघे. १२९

साह्य बाहेरुनी येतों, लवसाह्य इथें जरी
ग्रामीं मिळे तरी रोधूं बाह्य साह्य न ओंवरी: १३०

कोणा परी विचारावें ? मल्ल एक युवा न कां
झाला या गांवचा यात्रेमधें त्या मज ठाउका ? ५३१

आखाडा हा पुढेंची येः रात्र ना सरली जरी
लोक संगत हे आजी आखाड्यांत कसे तरी ? ५३२

वीर येतां जरा झाले जन चंचल, तो म्हणी
मल्ल तो ओळखी वीरा युवा बोलत हर्षुनी ५३३

" या ! या ! येऊ परी घोरा रात्रि या धजला कसें ?
गांवास आग या लागे ! राहू येथ नका असे !" ५३४

घटना दिवसाची त्या साध्या गांवकऱ्यांमधीं
घेतां रूपांतरें घेई रूप अंतिम जें तधीं ५३५

कौतुकें वीर तें ऐके: कीं जै अंतुनि हिंदुता
निंदुनी ब्राह्मणा गांजी, झाला तै हर कोपता ! ५३६

सृष्टि कंपित त्या क्रोधें, सूर्यही दडला भयें:
ब्रह्मा निघे, निघे विष्णू, पिनाकी सहची स्वयें !— ५३७

अंध घोर अकस्मात् तैं ! शून्य चेतन अंतुनी
त्रैमूर्ति त्या तिघां गेले देखदेखत घेउनी ! ! ५३८

" मित्रहो ! वीर हासोनी सखेद ' जरि हें खरें
लज्जेची यांहुनी आह्मां गोष्ट काय वदा बरें ! ५३९

आह्मीं धरूं मिशा त्या कां देवांच्याचि पराक्रमा
गात पीळ भरायासी ? हस्त यास्तव कां अम्हां ? ५४०

धिक् पौरुषासि जातीच्या तया, जीस्तव भूतळीं
देवतांसि पडे त्यांच्या येणें रक्षुं परोपरी ! ५४१

त्या थूः मल्लांवरी ! ज्यांच्या आखाड्यांत लढूं स्वयें
आंजनेया विना जोडी अंतुनीस मिळूं नये ! ! ” ९४२
जातिवंत असा घोडा चाबुकासरशी चिडे
बेछूट बोलतां झाला युवा पाहत वांकडें: ९४३
“ चला याच पलीं: आम्ही आलों यास्तवची इथें:
पैज प्राण चला माझा ! धाडुं शत्रु न मागतें ! ” ९४४
आणाभाका झणीं झाल्या बजरंगबलीपुढें
रोधूं म्लेंच्छा, न येवोनी मराठी दल जो भिडे. ९४५

तों त्या रात्रींतुनी घोरा घोर तीहुनिही अहा
निघे दिवस कीं कोशांतूनि खड्ग सुतीक्ष्ण हा ९४६
हाकुनी गांवचा सारा केला लोक उभा पुढें
पारावरी पुन्हां त्याची भक्त अंतुनिया चढे; ९४७
टेकी जानू, मिटी नेत्रा, करी भावभरें नती
क्रूसस्था त्या दयाशीला येशूच्या प्रतिमेप्रती; ९४८
आणी सर्वां श्रवूं जाई अशी निश्चित वाक्तती
वाहे “ न्यायासनीं द्याजी देवा, न्याय्य मला मति !” ९४९
तांचि आसन जें त्याचें तें न्यायासन होतसे
आरोपितांतुनी आणी आणिला द्विज जातसे. ९५०
ब्रह्मा विष्णु महेशांचे भक्त स्तंभित तों ! कसा
आश्चर्य ! ओढिला विप्रा देवापासुनिंही असा ! ९५१
आणि सैनिक तों बालासह त्या अबले तईं
पाणी आणि जनांच्या तें नेत्रीं दुःखद दृश्यही ९५२

शेटजी त्रस्त, पंतोजी प्रकुप्त, भट बापुडा,
पाटील साश्रु, साथी उद्दाम, साधुहि तो भला, ५५३

इत्यादिकां धृतां एक्या दावणींत पशूहुनी
बांधुनी निर्दयत्वानें केलें प्रस्तुत जैं झणीं ५५४

धर्मशासन संस्थेचा धर्माध्यक्ष तया क्षणा
बहु बायबलीं पाहे धर्माधर्म पुनः पुन्हां. ५५५

आणी एकाग्र निष्ठेनें अंतीं निश्चित अंतुनी
वाणी वदे पृथक्शद्धा माधवास निदर्शुनी ५५६

"दुर्दैवानें यदर्थीं तूं सहेतु बघ भंगिली
पोपाज्ञा खिस्तधर्माची, आणि त्या प्रभुची भली ५५७

दैवी विभंगुनी आज्ञा सैतानी प्रतिपाळिली,
प्रकाशीं कृष्ण पाखंडाचरिलेंसि परोपरी ५५८

हिंदूच्या त्या असद्धर्मासंगें निंदित निर्भयें
नारकी स्नान कीं केलें क्रूरकीत तुवां स्वयें: ५५९

तदर्थीं माधवा अग्नि प्रायाश्चिताचि कीं तुला
तुझ्या हितार्थची देणें न्यायप्राप्त दिसे मला: ५६०

आणि पुत्रा तुझ्या ! तोही मुख्यपात्रचि कीं पहा
यदर्थीं भ्रष्टसंस्कारी काळच्या—जरि बाल हा. ५६१

रमे ! तथापि शिक्षा ना अग्नि दाह तुला ठरे
आनुषंगिक तूं त्यांच्या, जरी संगत हें खरें. ५६२

प्रथा संगति हिंदूची, न विवाहितता परी:
नारीनरासि एकात्मा एक खिस्त विधी करी ! ५६३

पापिणी ! तूं तरी जाऊं पळून सजलीस ही
तत्रापी मन्मना स्पर्शो सूडाचा नचि लेशही ! १६४

गेले तिचे सदा डोळे सुकुनी सहसा; उभी
अंगयष्टि धरी ताठा, जात पूर्ण पळूनि भी. १६५

लागे मुखीं नवे नाचूं रम्यभीषणसें हंसूं
बोलतां प्रतिमा लागे यंत्रें चालितशीं दिसूं ! १६६

" जरि सत्यचि जें आलें धर्मात्मन् तुझिया मता
वेश्या हिंदू वधू साऱ्या, संगतां न विवाहिता. १६७

तथापि मातृतेचा तो अधिकार तरी अहा
संस्कारें मानवी कोण्या दिला जात नसेचि हा. १६८

मातृतेची पशूसीही वृत्ति प्रकृतितः जरी
मानाल जाति सामान्या हिंदुसी तितुकी तरी ! १६९

पतित्व नाः तरी हिंदू स्त्रियांत जननी हृदें
हृदीं वत्सलता, वात्सल्यांत दुग्ध असेच तेंः— १७०

तें दुग्ध जीवनाचें ! जें तूही अंतुनि एकदां
असशीलचि प्यालासी लगटूनि कुण्या हृदा ! १७१

प्यालासि त्या स्मरे दुग्धा, स्मरे त्या जननीस्तना
दांतही नव्हते तैं जो पाजी दुग्ध पुनः पुन्हां ! १७२

असें कां बघतां ? ये विस्मृति कां ? तरि जा पुसा
अणुरेणुस रक्ताच्या, नसांतील रसा रसा ! १७३

अणुरेणुंत रक्ताच्या, आईचें तव दूध तें
देत साथ उठो आतांः प्यालासी जरि की जितें ! ! १७४

देत साथ उठो माझ्या हृदयांतिल वादळा
क्रूरतेच्या तुझ्या आणी उखडीत दळादळा: १७५
अंकीं अल्लडसा तूं जैं निजसी जननीचिया
तदा तुला तिथूनीची सहसा हिसडूनिया १७६
आगींत फूल कीं तैसें फेकिलें असतें कुणी
मानिती दृश्य तें आयुर्दान वा मृति ती मनीं ? १७७
मानिती तीः तुला जीनें दिला जन्माचि अंतुनि
उठो सांगत तें तीचें दुग्ध रक्त नसांतूनी ! ! १७८
फुलास्तव सुके शाखा, ती जगेल कशी तरी
तो वृक्ष जाळितां ती यत्संगमींच फुलें भरी ? १७९
आयुर्दान जरी न्यायें देणें युक्त ठरे मला
आयुर्दाना पतीसी दे, दे पुत्राप्रति कोमला ! १८०
त्याच्या वधें मलाही कीं वधिशील सहस्त्रदां
अग्नि जाळील त्यांसी, ती मज जाळिल आपदा ! " १८१
न्यायालयीं जसा न्यायाच्या या तोलुनि अंतुनी
निर्णया दे तसा लोकीं दे नयज्ञ क्वचित् कुणी. १८२
एकदां नियमांसी ज्या नयदंडक मानिलें,
त्यानें पुन्हां भयें लोभें किंवा त्या नचि भंगिलें. १८३
त्या धर्मशासनीं झाले सुनयज्ञ परोपरी
असेल लाभला ऐसा धर्माध्यक्ष क्वचित् तरी. १८४
ख्यात*पीतर तैसा हा पकडीनाचि अंतुनी
वेंचुनी सज्जनांची कीं: ' येती ते धरतां क्षणीं ' १८५

* स्पानिश धर्मशासनाच्या इतिहासांत हा ' पीटर, ' Red Rod व आणखी एक दोन न्यायाधीश व Inquisition चें कार्यातील पुढारी प्रसिद्ध आहेत.

किंवा न्यायासनीं घेतां गाढ झोंप, कचित् मधें
जरा उघडुनी नेत्रें " जाळा सर्वांचि ! " जो वदेः ५८६
त्या दुज्या ख्यात अध्यक्षासमही नचि अंतुनी
आरोपितां कधीं झोंपा घेत दंड करी झणीं. ५८७
धर्मभीरू अहो हा तों उलटी खिळुनी धरी
डोळ्यांत ओतुनी तैला दृष्टि बायबलावरी ! ५८८
रमा थांबत जों तोंची आली बायबलांतली
त्यापुढें देवदूताची तीची प्रेमल वैखरी ५८९
" पूर्वाचार्यीं तुम्हां आज्ञापिलें तें श्रुतची असे
नेत्रार्थ नेत्रची:दंतास्तव दंतः जशा तसें: ५९०
मी परी सांगतों तुम्हां प्रतिरोधचि कार्य ना !
देणें क्षमेसि, दंडानां: दंडनीयहि दुर्जना ! ! " ५९१

नेत्र संकोचुनी, कांहीं सूक्ष्म जंतू बघूं जसें,
शून्यीं पाहत धर्मात्मा लव अंतुनि तैं बसे. ५९२
सूक्ष्मा असेंचि आधीं कीं धर्माधर्मविचारणा
परी सूक्ष्मतरा ऐशी धर्म—धर्मविचारणा ! ५९३
" एक नेत्र जरी पापीः फेंक त्या उपटूनिया
एका नेत्रार्थ आत्म्याचा घात हो नचि कीं तुझ्या " ५९४
आणी " दंडी न ":—व्युक्तींच्या काय योग्य मधें अम्हां ?
दोन नेत्रांमधें द्यावा दंड एका दुज्या क्षमा ? ५९५

होंचि ना तरि चिंतोनी कांहींसें असलेंचि तों
धर्माध्यक्ष रमे उद्देशूनि निश्चित बोलतो: ५९६

" न्यायें स्त्रिये ! वधार्हा तूं नचि, बोलसि तथ्यसें,
क्षमावें अपराध्याही आदेश प्रभुचा असे ५९७

द्यावी करी दयेच्याची न्यायाची तरवार ती
ही धर्मशासनाची ही, पूर्वापार सुपद्धती; ५९८
दे तरी धन्यवादा तूं प्रभूच्या करुणे प्रतीः
कीं या वध्यांतुनि दोघां वांचे एकहि संप्रती ! ५९९
पुत्रवा पति ? तें बोले चल शीघ्र ! तयांतुनी
इच्छा तुझी तया एका ओढ मृत्युमुखांतुनी ! " ६००
प्रछन्न कां करी माझा हा विनोदचि राक्षसी ?
कां सूडाची सुगंभीरा ही नृशंसकता अशी ? ६०१
पातिव्रत्यासि कीं माझ्या परीक्षूं बघती असे ?
वात्सल्याचीच ही माझ्या टवाळी अथवा दिसे ! ६०२

शंकिता, लज्जिता, क्रुद्धा, अतिमात्र अनिश्चिता
रमेसी " वद हू " ! ऐसे बोले अंतुनी मागुता ! ६०३
" पुत्र कां पति ? हूं बोले ! वधाज्ञेवरि नातरी
घेच या उभयांच्याहि स्वाक्षरा चल मी करी ! " ६०४
" अहो नका ! नका ! बोले, बोले मी ! परिसा तरी !
शब्दांचा अर्थ ना होता कळला मज अंतरीं ! ६०५
कळे अर्थ, कळे आतां ! पहा, हाय, अहो, कळे !—
बोले ही ध्याच मी !—हारे दैवा ! धीर कसा गळे ! ६०६

भ्रमिष्ठासम उद्गारां अशा शुद्धिंतची जरी
दे निघूं, ना निघूं देण्या बहु ती झटली तरी ! ६०७

" पुत्र ! पुत्र ! वदे साध्वि ! पुत्र वांचिव आपुला !
लावी न ऋणहत्येचें घोर पाप तुला मला ! १०८

संसार पाहिला आम्हीः अगे तें परि लेकरूं
आत्मा वै पुत्र नामासिः नको घात सखे करूं ! " १०९

" पुत्र " माधव आज्ञापी " शीघ्र " अंतुनि धाकवी,
ओढाताणींत या घोरा मानवीय—अमानवी ११०

तिचें हृदय फांटाया पाही ! व्याकुल ही तरी
धैर्याणु शक्य ते एकीभूत ती फिरुनी करी १११

आणि बोलेः " अहो सांगा पुत्र कां पतिः तें तुम्ही !
धर्मात्मन् धर्मघोरत्वा सहूं शक्त तुम्ही न मी !! " ११२

" वध्य ते, वध्य ते दोघे न्यायें त्यांतुनि मी कुणी '
अधीर अंतुनी गर्जे ' अवध्य नचि कीं गणी ११३

तथापि अवधाहा तद्वधें जाशिल मारिलीः
तुझा जीव म्हणूनीची एका मुक्त दया करी ११४

तुझा जीव तुला ठावा; दया ही तव याचना
देतां घडे; वदे ! कां मी स्वाक्षरा करु या क्षणा ? " ११५

" नका, नका, अहो घ्या मी बोलल्येंचि ! दया करा "
कावरीबावरी नेत्रें फिरवीत गरागरा ! ११६

" पुत्र, प्रिये ! वदे पुत्र ! प्रिये ! साध्वि ! न घाबरे
मीच माधव सांगे ना धवची तव कां बरें ? " ११७

तों ती गेलीच बोलूं ही ' पुत्र ' हाय अहो करी
कंठामध्येंचि या शब्दा कोण चेंपुनि हें धरी ? ११८

अकस्मात् होत कीं होम प्रकाशांत लकाकती
वधू कोण वरासंगें घेई सप्तपदीस ती ? ६१९

पुनर्नव अहाहा तो माझा माधव ! ही हृदीं
दृष्टा रमा नवोढा मी !–होता पुत्र कुठें तधी ? ६२०

आणि गेलीच बोलूं ती ' पति ' !: तों सहसा स्तनीं
पहिलाच तिचा पान्हा गुंजे मंजुल ' मी अगी ? ६२१

गळ्यांत अपुराची तो हस्त अल्लड गुंफुनी
कोवळी हांक ये ' आई ' पहिलीच पुन्हां कुणी: ६२२

अनन्यशरणे आई ! मी अंगावरिलें पितें
तुझें मूल ! मला आई ! घे कसें पदरांत तें ! ६२३

ह्रदांतुनीं पुन्हां कंठीं शब्द ' पुत्र ' उठेः परी
हाय कंठींच हो कोणी पुन्हां चेपुनि त्या धरी ! : ६२४

होता पुत्र कुठें ? होमप्रकाशांत लकाकती
क्रुद्ध सप्तपदी बोले कंठ दाबित मागती. ६२५

पुण्य सेजहि ती तों येः जीवरी प्रथमा रती
दूर सारित लज्जेच्या अंतिमा पदराप्रती ६२६

अंगीं प्रत्यंग ह्रद्रंगीं अंतरंग जसें तसें
प्रिया प्रियाप्रती देईः सेजती आजि येतसे ! ६२७

होता पुत्र कुठें तेव्हां ? लागे सेज पुसूं बळें
होता पुत्र कुठें तेव्हां ? अश्रूंची पुसतीं जळें ६२८

न्हाणितां, घालितां वेणी केश प्रेमभरें पती
विंचरी ते विचारीतीः होता पुत्र कुठें तधी ? ६२९

अश्रूंहीं दाटला, चित्तें घोटुनी धरिला गळा !
उठे शब्द तया दानी प्रतिशब्द पळा पळा ! ६३०

हातांतुनी कुणा तोडूं: डाव्या कां उजव्याः अहा,
कंठीं करूं खड्गाघात एकाचि वा दहा, ६३१

गळा चेंपुनि मारूं कां तप्ततैलीं तळूनिया,
वैकल्पिकां अशी होई क्रूरताच जिथें दयाः ६३२

अहो निवड तैं कोणा ये नृशंसक ती करूं
केल्याविना अहो किंवा धीर कोण शके धरूं ! ६३३

नृशंसक परी त्याही निवडीत, नृशंसका
किती निवडही ! कर्त्री एक आणिक बालका ! ! ६३४

सुताचा, पतिचा किंवा ? कोणाचा चिरुनी गळा
धुवूं हात कुणाचीया रक्ताच्या करूनी जला; ६३५

जातजीवाचि भावू ती शब्दीं अंधुक कल्पना
छायेनेंहि जिच्या येई भोळ नेत्र हृदा मना ! ६३६

"हूं बोल" ! अंतुनीचा तों कांपवीत पुन्हां तिला
भीत मोळींतुनी ओढी जागृतींत भयंकराः ६३७

"हूं बोल ! याक्षणींची ! हूं क्षण शेवटला पहा
वधाज्ञे उभयांच्या नातरी स्वाक्षरवील हा !" ६३८

"पुत्र, पुत्र; प्रिये बोले ! बोलणें जरि वाउगें
वाउगें तरि त्याहूनी राहणेंचि असें उगें ! ६३९

जगे पुत्र तरी साध्वि, जगेचि तव कांत कीं
आत्माच पुत्र कीं माझा, आत्मा पुत्र तुझा सखि !" ६४०

उत्तप्त वालुका होतां तापलाच तवा तशी
मरुभूत मर्धेची जो फसे जीव तया जशी ६४१
जाळी आग पुढें जातां, जाळी निश्चल राहतां
तरी लोटित ने पाया प्रवृत्तीच जशी स्वतः ६४२
दे तिला माधवाचा तो तसा आग्रह लोटुनी
प्रतिध्वनितची त्यासी गेली ' पुत्रचि ' बोलुनी ! ! ! ६४३

बोलुनी आणि ती एकाएकीं कोसळली तशी
घावासंगें कुऱ्हाडीच्या शाखा कोसळते जशी ! ६४४
फुटे त्या सरसी लोकांतुनि दाबियला जरी
भीतयत्नें हृदींची तो हाःहाःकार तरीवरी. ६४५
आई ! आई ! करूनी तें मूल अल्लड पालवी,
गाल गालावरी तीच्या ठेवुनी तिज हालवी, ६४६
" आई ! जाऊ घरीं सांगे बाबाही, चल ऊठना ! "
आंसवें पुसिलीं तीच्या पदरासि पुनः पुन्हां ! ६४७
" प्रिये, साध्वी, अहा शोकीं धैर्य दाखवुनी तसें,
हर्षीं अधैर्य कां ? साध्वि, ऊठ घे तनया कसें ! ६४८
होत जन्मतिथी होती ज्याची मृत्युतिथी, जया
पुनर्जन्म दिला धीरावाणीनें तव आज याः ६४९
घेवुनी, चुंबुनी, आलिंगुनी त्या तनयाप्रती,
जा गृहासि, उठे रक्षी प्रजातंतु, उठे सती ! ! " ६५०

माधवोक्ति सुधासेकें रमा सावरुनी, वरी
उचलोनि न जों घेई पुत्रा प्रेमभरें पुरीः ६५१

तोंचि अंतुनि एकाची शव्दां स्पष्ट पुनः पुन्हां
घोळ घोळीत गर्जे " ना ! ना गृहासि, कदापि ना ! ६९२

ना गृहासि रमे जातां तुला येईल वा सुता
वधदंड क्षमा झाला, नर्कि दंडाचि सर्वथा. ६९३

तूं ख्रिये, मूल तें, तुम्ही अन्य जे भृत त्यापरी
झालां तीं त्या कुसंस्कारीं अंगभूत परोपरीः ६९४

त्या सर्वांसी तुम्हां पापक्षालनार्थ असेंचिना
प्रायश्चित दुजें एक्या ख्रिस्ताच्या शरणाविना ६९५

मान्य व्हाः तरि भक्तीनें अमान्यः तरि शक्तिनें
अंजपाल[1] कृपालू तो कळपांत तुम्हांस ने ! ६९६

भक्तिनें याल त्यासी तों मुक्त सोडिलची जना
शक्तिनें याल ते भोगा दास्य दंड पुनः पुन्हांः ६९७

सुनिश्चित अशा माझ्या युक्तियुक्तसुनिर्णया
राजाज्ञा ना ! शके खोडूं तरी कां दुबळी दया ?" ६९८

धिःकार ! त्या विभीतांहीं जनांच्या मधुनी उठे
जरी न सांगतां येई त्यांत तो उठला कुठें ६९९

" धिक्रे भंडा ! गुलामांच्या बाजारीं विकण्यांत कां
जाळिलें नसशीची त्वां त्या मातेसह बालकां ! " ६६०

शब्द हे क्रुद्धशा कोण्या स्वरांत उठतां वरी
अंतुनी गर्जला कांहीं कचरूनिच अंतरीं: ६६१

हाहाःकार नर्की तो तों दयेचा दुबळ्या, परी
धिःकार धीट तो होता शक्तिचाच कुण्या तरी ! ६६२

---

१ अजपाल—येशू ख्रिस्त व कळप म्हणजे ख्रिस्ती जनता असें मानतात.

तिरस्कृत तरीही त्या ध्वनिसी करुनी ज्ञणी
उद्देशुनी धूर्तां बोले वाणी गर्भित अंतुनीः ६६३
" साक्षी समर्थनाची ना प्रार्थनाहि परोपरी
श्रूत म्यां तुमच्या केल्या रात्री खर्चुनिया पुरी; ६६४
सांगोपांग विचारान्ती त्याच्या निर्णय हा दिला:
कार्य निर्वाह शिक्षेचा करा सैनिक हो चला ! ६६५
थांबा तरीहिः कीं आरोपितांत अपराद्ध जे
न्याय निश्चित त्या देण्या दंड दंडक जो सजे ६६६
तोचि दंडक तुम्हांही मलाही नियमी न कां !
पापी दंड्यचिः हो हिंदू, ख्रिस्त, बालक बालिका. ६६७
जनहो ! तरि, तो धर्माध्यक्ष पूर्ण गंभीरते
सह त्या बघुनी लोकाकीर्ण ग्रामसभे वदे: ६६८
' सद्धर्म कार्यनिर्वाहीं, राजाज्ञा करितां पुरी
सैनिकांतुनि या माझ्या, कोणी आजवरी जरी ६६९
ग्रामीं, गृहीं असे केला अत्याचार, करी कधीं
धर्मदंडक भंगोनी घात पात कुणी कुधीः ६७०
सांगो तुम्हांतुनी किंवा अभिशाप्त जनांतुनी
तें कुणीहि ! तुम्ही तैसे दंड्य सैनिक मी गणी." ६७१
झाला जो तो मनीं बोलूं लोक इच्छुक तैं परी
झाला प्रत्यक्ष बोलूं ना शक्त एकाहि त्या पळीं. ६७२
तथापि जो धूर्तामाजी, पासुनी पाहिल्या क्षणा
रागें रागें उभा पाही अंतुनीस पुनः पुन्हां ६७३

बध्योच्छृंखल वाजी कीं खिंकाळूनि परोपरी
मनीं धुमसत्या वेगा मार्ग फोडुनि दे वरीः ६७४
खोंकुनी, खाकरोनी वा बळेंचि वरचेवरी
आंतली तेढ जो होता व्यक्तवीत परोपरी ६७५
संधी ती त्या मिळे पंतोजीस मात्र खरी ! क्षणीं
वक्रस्मितें वदूं लागेः " हो कल्याणची ! अंतुनी ! ६७६
पाखंडोच्छेदनीं,, भक्ता तुझें जीवनची सरो,
ब्राम्हणाशीः तुला पाखंडीय हा पुरुनी उरो ! ! ६७७
धन्य प्रसव[1] तो, धन्या प्रसू[2] अक्षतकन्यका
धन्य सद्धर्म, ना तेथें धर्मशासन[3] धन्य कां ! ! ! ६७८
' वधः कार्यो न जीवानाम् ' येशूक्ती प्रथमा अशी
एतदर्थचि तूं जीवा वधिता नचि—जाळिशी ! ६७९
' पारदार्यमकर्तव्यं ' येशूक्ती म्हणुनी भयें
बलात्कारकरा अन्यां कुमारीच वरी स्वयें ! ६८०
' निषिद्धमपि चौर्यंच ' येशूक्ती करण्या पुरी
लूटमारीमध्यें तुम्हीं चोरी सोडुनिया दिली । ६८१
' मा गृधो गर्दभं कस्य ' उक्ती ही करण्या खरी
गर्दभा सांडुनी पागा घोड्यांची बळकाविली ! ६८२

---

( १ ) प्रसव (२) बायबलांतील कथेंत असें सांगितलें आहे कीं, मेरीशी कोण्या पुरुषाचा संबंध होण्याचे आधींच तिला गर्भ राहिला तोच येशू होय. ( ३ ) धर्मशासन=Inquisition संस्था ( ४ ) या सर्व बायबलांतील मुख्य आज्ञा आहेत. Kill not, Commit not adultery, steal not Covet not thy neighbour's house nor his ox or his ass nor anything &c.

' मा गृधः कस्यचित् किंचित् ' ह्या आज्ञेस्तव आणखी
किंचित् सोडूनि सर्वस्वीं राज्येंची गिळिलींत कीं. ६८३
आज्ञा अक्षरशः ऐशा पूज्य बायबलांतल्या
पाळुनी त्यावरी सर्वां कळसा चढवावया, ६८४
' दोषचर्चा कराची ना न्यायदंड धरा न वा '
आज्ञा पाळित ही ही अन्याय—दंड धरा तुवां ! ६८५
धर्मशासक हो, देती धन्यवाद तुम्हांप्रती
रक्तस्नाता बालभ्रष्टा कुमारीहि पथीं पथीं. ६८६
पाखंड अश्वमेधांचें बंड मोडुनि या क्षणीं
नरमेध नवे युष्मद्दिग्जया प्रथिती जनीं ! ६८७
नवाग्नि नरमेधांचा घेवो तो पदरांमधें
ब्राह्मणासीहि या ! दाना, अंतुनी, मज याच दे ! ६८८
रोधिलें म्या तुझ्या धर्मप्रचारासि परोपरी
प्रांतांत या; न कां शाला स्थापिल्या बहु तूं परी ६८९
—सेवेंत ना तुझ्या आलों, भांडलों तुजशीं स्वयें
श्रीगणेशाविनांची कीं अक्षरा शिकवूं नये ? ६९०
माझें वाढदिनोत्साहीं होतें अंगहि कालच्या;
राशी ह्या अपराधांच्या माझ्या सर्व जरी तुझ्या ६९१
आगीसी पेटवीतीना धर्माच्या, तरि ऐक, मी
प्रार्थितों नित्य देवासी, प्रकाशीं अथवा तमीं, ६९२
कीं हें राज्य अविंधांचें जावो सत्वर गा लया
दे महाराष्ट्रधर्माच्या खड्गासी प्रभुजी जया ! ! " ६९३

१ Judge not बायबल.

तोंच कोनांत ज्या मार्गे ये धिकार तिथेंच तो
लोक कोन, ' धरा ! धांवा ! मारा शत्रुसि ' गर्जतो. ६९४

तों गर्जे अंतुनी झाला उभा ऐकुनि सत्वरीं
सज्ज शस्त्र तया सेना रक्षूं घेउनिया धरी. ६९५

त्या लोककोनगर्जेनें जो आवेश जनीं भरे
शस्त्रें लकाकतांची तीं प्रकाशीं झाणि कीं विरे. ६९६

तोंच तो साधु, जो अद्यापिही बांधुनि टाकिला
निर्विकार उभा होता, जरि किंचित भागला: ६९७

भागला काल त्यासी जो डसे सर्प तया विषें
वनस्पतिबलें त्यानें जरि तें वधिलें असें: ६९८

तो शांतमूर्तिही आतां मात्र दुःखितसा जरा
गर्जना लोककोनाची तया ऐकुनि बोलला: ६९९

" बंधु हो काय हें गर्जा ? शत्रु कोण ? जगीं अहा
आत्म्यास एक आत्म्याच्या विना शत्रु कुठें पहा ! ७००

जातची साधुसी होता अंतु बंद करावया
तोंच हा पाहतां त्याचा रोख, देत कथूं तया: ७०१

' काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भव: '
शत्रु एक नरांचा हा, अंतुनी न अविंध वा ! ७०२

अंतुनी बंधुची आम्हां ! तयाची चकलीच घी
तरी समजवा, वैरें वैर कां शमतें कधीं !! ७०३

धान्य नेलें लुटोनीया ? द्या तरी धनही तया
क्रोधासी जिंकणें त्यांच्या त्यांवरी करुनी दया. ७०४

भ्रष्टल्यांना कुमारी ही ? हाय हाय ! अहो परी
पाप्यासी दे दुजा पापी प्रायश्चित कसें तरी ? ७०५

' तुम्हांत जो नसे पापी: फेंको तो पहिली शिळा '
देवपुत्र[1] अशा एक्या प्रसंगार्थेचि बोलला ७०६
शके ईश्वरची होवूं न्यायाधीश वरी नरां
तो विचारील–ना तुम्ही !–त्यासी ह्यास्तव उत्तरा: ७०७
छळें या तुमच्या कासावीसे जीव, अहो परी
कासावीस बहुक्रोधप्रवृत्ति तुमची करी. ७०८
सव्य गालावरी केलें आघातासि कुणी तरी
प्रत्याघात न !–तूं गाला दुज्याही पुढती करी: ७०९
अहिंसा परमो धर्मः युगानुयुग हें वदे
सर्व भाषांत, भूभागीं सर्व, वेद पदें पदें. ७१०
आघातानें मरे लोकीं एक जीव, परी अहा
प्रत्याघातें मरे लोकीं लाख लाख न काय हा ? ७११
आघाताची क्रियाशक्ती सीमाबद्ध करींच ती
अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति ७१२
सूड ना सोडणें हाची पुरुषार्थ पवित्र कीं
निवारकहि तो प्रत्याघात पापचि नारकीं, ७१३
जयो[2] वैरं प्रसवति दुःखं शेते पराजितः
उपसंतः सुखं शेते हित्वा जयपराजयौ ! !" ७१४

---

१ देवपुत्र–येशु खिस्त, एकदां एका व्यभिचाराच्या अभियोगांत येशूनें शिक्षा देण्याचें नाकारून उत्तर दिलेलें होतें. ( २ ) हा श्लोक धम्मपदांतही आला आहे.

शस्त्रांच्या खखलखाटानें आर्धी कांपित जाहलीं
त्या हृदां ही महात्म्याची उक्ति मुक्तिच भासली. ७१५

गर्जे निनामबाबाकी जय ! लोक पुनः पुन्हां
कीं तो निनामनामेंची ज्ञात संत असे जना ७१६

तदा अंतुनिही ग्रीवा डोलवीत हळू वदे
" साधु ! साधु ! सुकार्यातें कोण ह्याहुनि साधुं दे !' ७१७

शत्रुही स्तवितां वाढे मान्यता अधिका बळें,
साधुची त्या जनीं नादें जय शब्द पळें पळें ! ! ७१८

कोनांतुनी तया तों ये ध्वनि दंडमसा कुणी
ध्वनींच्या सकलांच्याही वरी स्वारची होवुनी ! ७१९

" होतसे ठीकची त्याची त्या जनीं बहुमान्यता
जनका पुरुषत्वाची जो वदे पुरुषार्थता ! ७२०

अकर्मण्यत्व तेंची सत्कर्म हें प्रतिपादुनी
अकर्मण्यपणाची तो लज्जाही वधितो जनीं. ७२१

प्रिय कापुरुषीं हीं तो, क्रूरांही प्रिय तो अणी,
अजातशत्रुता भोगी सहजींच असा मुनी ७२२

जो कथी, नरका जाती जाते चोर बळें धरूं
चोरांस तो स्वभावेंची भासणार जगद्गुरू ! ७२३

पाण्याविना सुके ज्यांचा आत्मा टाळुनि त्या घरा
पूर्ण गंगेंत जो ओती कावडीं भरुनी जला: ७२४

क्रोधाग्नींत जळे तेथें गेह—सोडुनिया तया
येथें चुलींतलीही तो आग ये विझवावया ! ७२५

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अ. क्र.
विभाग

अहो थंड जिथें नाड्या नसांहि पडल्या तिथें
आतांचि येत कीं होती लव ऊब तनूमध्यें ७२६
ती क्रोधशी गमे तुम्हां चटका बसुनी तिचा,
जीव कोमल हा कासावीस होय गुरो तुझा ७२७
मशाली परि कीं ज्यांच्या आग लावित धांवती,
जाळिती मंदिरें, माड्या, जिते जीव, शतावधी, ७२८
त्या हिंसेच्या मशालींचा मात्र तो चटका करी
जगद्गुरो ! तुला कासावीस ना !—करि वा जरी— ७२९
माहात्म्य या अहिंसेचें जा पढीव तयां तरी !
जातांचि त्या विरोधूं तूं—जिवंत उरसी जरी ! ! ७३०
निर्वैरस्तोत्र हें, हें अप्रतिकार पुराण कां
लांडग्या सोडुनी गाशी बकरीपुढती फुका ! ७३१
आततायी, अघाशी जे लोक संहरती तुझा
त्यांचा आघात रोधाया आधीं त्या प्रति सांग जा: ७३२
आणि नंतर रोधाया प्रत्याघात कधी द्विजा
आणखी भ्रष्टिल्या आयाबहिणीप्रति आमुच्या ! ! ” ७३३
“ आततायी न ते, बाला ! स्वकर्मफल हें असें
त्यांच्या मिषें स्वयें आम्हां देव दंड करीतसे ! ” ७३४
“ अत्युत्कृष्ट तरी ! ’ हांसे ध्वनि तो परिसूनियां
साधुचें वच तें: ‘ अत्युत्कृष्ट तर्कबलेंच या ७३५
दंड जरे दे मिषें त्यांच्या आम्हां देवचि तो तरी
अस्मत्क्रोधमिषें त्यांसी दंड देइल सत्वरी ! ७३६

चोरांही देवची योजी घातपात करावया:
आणि सैतान कां सांगे सावा चोर धरावया ? ७३७
घुसाचि बंधु नों ! धांवा सोडा शत्रुसि ना जितें
तीनशें ना तुम्हीं रांडा किंवा राक्षस तीस ते ! ” ७३८
कोनांतुनी दुज्याही तों गर्जे हर ! हर ! नादला
अंगीं अंतुनिच्या कांटा उभा तत्क्षण राहिला. ७३९

अमेरिका उभी आणी उभी धुंडुनि आफ्रिका
सिंधुयान शिवे अंतीं सुप्त भारतभूमिका, ७४०
ज्या दिनीं पुर्तुगालाच्या तटा सोडुनियां जलीं
सिंधुयान घुसे धुंडाळीत भारतसुंदरी, ७४१
त्या दिनापासुनी:—नाना द्वीपें, देश, शतावधी
पेरु, मास्किक, मिश्री, वा पारसी, हबशी, किती: ७४२
उभ्या अमेरिकेमाजी, आफ्रिकेंत उभ्याहि कीं,
भांडार भिन्न भाषांचें जरी भारतभू निकीं, ७४३
तथापि पुर्तुगीजांनीं ऐकिला न कधीं असा
कोटिभाषांतही कीं त्या शब्द हर ! हर ! हा जसा ७४४
त्या दिनीं !—ज्या दिनीं सह्याद्रीच्या सुप्त गुहांतुनी
व्याघ्र घे सहसा भक्ष्यीं झेंप हर ! हर ! गर्जुनी ! ७४५
मूरांचाहीं[1] जयें केला दीन ‘ दीन ’ रणीं रणीं
त्या दिनापासुनी त्यांही त्रास हर ! हर ! दे मनीं ! ७४६

---

१ मूर—मुसलमानांना पुर्तुगीज ‘मूर’ म्हणत. त्यांच्या देशांतून मूरांना स्पेनी व पुर्तुगीजांनीं हुसकल्यावर ते त्यांचा पाठलाग करीत जगभर गेले. हिंदुस्थानांतही मुसलमान दिसतांच ‘ मूर ’ म्हणून त्यांच्याशी लढाया देत.

तीर लागे चुकूं, होई खड्ग बोथट, कोसळे
मनोरथ करूं कोलंबियां[1] हिंद दुजी वळें: ७४७
त्या दिनीं पोर्तुगीजांचा !—पहिलीच जया दिना
सह्याद्रीच्या गुहांतूनी उठे हर ! हर ! गर्जना. ७४८
गर्जनेंची तयाचीही ठिणगी श्रवणांतरीं
पडतांचि भयज्वाला उठे अंतुनि अंतरीं. ७४९
“ बंड ! पाखंड ! जा धांवा, धरा गर्जेति जे दुरी
सशस्त्र घुसुनी मोडा दाटी, सैनिक ! सत्वरी ! ” ७५०
आज्ञेची तुटतां दोरी शिकारी कुतरे भुके
तुटोनि पडती शस्त्रीं वीस सैनिक सारखे. ७५१
संगिनी भोसकोनिया बालवृद्ध वधू जसे
जे पथीं ये तया सेना फाडफाडितची घुसे ७५२
रोधू किती नुरे लोकां धीर जाउनिही पळूं
होता उभा तसा जो तो लागे आहत कोसळूं ७५३
तोंचि अंतुनि ही पारावरी जे उरले दहा
आज्ञापी सैनिका “ संपे न्याय ! दंडित पाप हा ७५४
द्विज बांधुनि या वृक्षा जाळाची जितः हा चला:
कार्यनिर्वाह शिक्षेचा झटकाफटकीं करा ! ७५५
स्त्री ही, हें मूल, हे सारे बंदिवान तसेंच, यां
टाकण्यासि गुलामांच्या बाजारांत विकूनियां, ७५६
न्या, पायीं ठोकुनी बेड्या, चावडींताचि या क्षणीं
ठेवा गोव्यास जों आम्हीं जाऊं तों वरती झणीं. ” ७५७

---

१ कोलंबिया—अमेरिका.

'ऊठ हे, बटकी !' तोंची पायानें ढकलोनिया
शास्त्री गर्जे 'चलो !' सर्वां, दावणी हिसडूनिया ७५८

सूं सूं करीत तों येती तीर–कोठुनि ? कोठुनि ?
रक्तीं कोसळले पारावरी सैनिक दों क्षणीं ! ७५९

पाराच्या मागतीची त्या गृह एक जुनें दुरी,
ओसाड भूतबाधेनें ग्रस्त ज्यासि कथा करी. ७६०

त्या घरांतूनि ते आले तीर–तीरचि कां भुतें ?
कोणी पाहियलें, कोणीं पाहिलेंहि पुरे न तें !! ७६१

'चावडी ! चावडी !' गर्जे पार सोडित अंतुनी
चावडींत घुसे सेना धृतां खोचित तत्क्षणीं ७६२

रक्तांत माखल्या टोंका जिर्तीं लोंबति आंतडीं
संगिनी त्या खुनी साऱ्या करूनि बहु तांतडी; ७६३

जनांस सोडुनी आल्या दौडीनें परत्या क्षणीं
चावडीसि, स्वकीयातें अशा संकटिं पाहुनी ! ७६४

लोक कोनांतुनी तों त्या लोक संत्र घुसे पुढें
शत्रूंच्या पळत्या पाठीं पळतांहि पुन्हां पडे. ७६५

तो धनुर्बाण घेवोनी 'जय हरहर' गर्जुनी
घरांतुनि भुतांच्या त्या भूतनाथ निघे कुणी ! ७६६

तीरामागें स्वयें तीरा मारमारितची पुढें
तै सहाल्पानुयायी तो चावडीवरती पडे. ७६७

व्यूह बांधोनि सैन्यानें वीर अंतुनि गर्जला
जाळा या दंडिता येथें अंगणांताचि या चला ! ७६८

आज्ञा झालीच ईशाचीं प्रतिपालित पाहिजे
या मेषमात्र हिंदूंचा टाळूं ती न पिता सजे ! ! ७६९
तोडुनी चौकटी, दारें, दारू तैलहि ओतुनी
चावडीच्या चिता आवारांतची रचुनी झणी: ७७०
लोक प्रेता चिते बांधी स्वधर्म म्हणुनी जसे
त्या जित्या बांधिती विप्रा ते चितेवरती तसे— ७७१
स्वधर्म समजूनीया ! ! आगीचा भडका उठे
आणि हंबरडा दीना गाईचा सहसा फुटे: ७७२
“ मला ! मला ! अहो जाळा ! या मुला जरि तें रुचे
ज्वालांच्यासह मी माझीं टाकितें गिळुनी वचें ! ” ७७३
तों एक खड्गमुष्टीचा घाव कोसळुनी शिरीं
रक्ताळ मूर्च्छनेमाजीं समाधान तिचें करी ! ! ७७४

आग ती भडकोनीया अंगणीं उठतां वरी
जीभ वाक्पटु तैसी त्या युयुत्सु जन ते करी. ७७५
हाहा:कारांत लोकांच्या गर्जे हरहर कोंदला
रेटुनी पुढतीची घे जनसंघ पलोपला. ७७६
आज्ञेनें अंतुनीच्या तैं सैन्यव्यूह सुबद्ध तों
दाटीवरी पडे जैसा कंठीं एक कृपाण तो. ७७७
लोक लोकांवरी जाई मार्गे रेटित तो जसा
रक्त पीत पुढें जाई व्यूह संगिनिचा तसा. ७७८
चावडीपासुनी होता गौर सैन्य दुरी असें
मृत्यूच्या गोंधळांतूनी हिंदी वीर तिथे तसे ७७९

निसटूनि जवें, झेंपे घेउनी चढुनी वरी
टाकिती छपरांतूनी उडी चावडिच्या तळीं ! ७८०

बिलगूनि इथें तेथें खड्गा खड्ग खणाखणा
सैनिकांसह दों गौरा अंतुनी घुमवी रणा ! ७८१

दावणी तुटल्या तों त्या धृत ते सुटुनी जवें
ओढूं चितेंतुनीं जाती द्विजासी जन ते सर्वे: ७८२

परि हाय अहो ! आतां चितेंत जळण्याहुनी
अतिदुःखद त्या होतें सुटणेंचि चितेंतुनी ! ७८३

नाड्या फुटोनि रक्ताच्या धारा ऊष्ण सडासडा
उडतां उकडूनीया अस्थिमांस तडातडाः ७८४

कसला द्विज तो आतां अर्धदग्ध हवी अहा !—
सुटका न तरी आतां शक्य सूड असेंचि हा ! ! ७८५

अकस्मात जसा छापा मृत्यु घालुनि येतसे
तसा अंतुनिच्या अंगावरी खड्ग उभा दिसे ! ७८६

तों तो साधु, महात्मा तो, अंतुनी वरती पडे
"मा हिंस्यात् ! गाय ही ! सोडाः हत्या कार्य न ! आरडे: ७८७

' रक्त हें तुमच्या रक्तासारखेंचि, नसें दुजें
करा कृत्य कसायाचें कसें घातक घोर जें ! " ७८८

" सोड गोसावड्या ! " रागें भूतनाथ गडाडला
' नातगी टाकितो म्लेंच्छासहची चिरुनी तुला ! ७८९

रक्त अंतुनिचें ताजें ?—द्विजरक्त जळे तिथें
पाणी सांडवणीचेंची डबक्यांतिल काय तें ? " ७९०

तथापि अंतुनी तें तो, पक्षी जेंवि पिला तसा
झांकुनी खड्गधारे दे स्वदेहासिच ढालसा. ७९१

भ्रमिष्ठा हो, गरिष्ठा हो, दंभ हो अथवा दया
द्रववीन तरी सर्वां विरवीच जनां तया: ७९२

विरवीनचि अंतोनी स्तव !—त्या न कुणी परी
क्रुद्धही हस्त साधूतें धैर्य त्या दुखवूं करी, ७९३

तोच कीं थडके द्वारीं शस्त्रशाप खणाणितां
व्यूह तो संगिनींचाही जन मर्दुनि मागता. ७९४

मनीं चडफडे भारी शिकार सुटतां जसें
शार्दूल ग्रे तरी मागें पुच्छ आपटितां, तसें ७९५

तो गर्ज ऐकुनी घेती वीर ते परतें झणीं;
धावया परतें तैसें त्रासुनी बहुही मनीं ७९६

झटापटींत त्या ज्यानें गोर सैनिक दोन ते
छाटिले तो सवें वीरा साथीहि सहसा सुटे. ७९७

सुटे शेटजिही त्याच्या सहाय्यें, परि जों जरा
जाई दूर न तों होई पळतां बहु घाबरा: ७९८

तेव्हां खिन्न मनें जैशी व्याघ्रा पाहुनिया स्वयें
बसे मटकनी धेनू तसा घे बसुनी भयें ! ७९९

उठावदार त्या पोटाकडे दोंदिल पाहुनी
धापांत यांहि शद्बांसी टाकी तो वदनांतुनी: ८००

पोशी आजन्म त्याच्याची तू उरावरि बैसुनी
घात पोटा कसा केला ! खोटा कोण तुझ्याहुनी ! ८०१

पोशितां चढसी, दुष्टा, तूं उरावरि तत्क्षणीं,
आणी उपोषितां तूतें पाठी लागसि कीं झणीं ! ! ८०२
खेंचुनी त्या अपापा तों पुन्हां सैनिक ने बळें
पंगपुण्या असें प्रायश्चित्तची बहुधां मिळे. ८०३
पंगु दुर्बल पुण्याई: जोवरी जगतांत कीं
चरणीं नखरें व्याघ्रा, गरलें भुजगा मुखीं ! ८०४
मठीं शत्रुकरीं गेला साथी तो सुटतां सर्वे
सुरक्षित अशा, जीवा ये चैतन्य जरी नवें, ८०५
तरी अंतुनि, या हत्याहोमाचा यजमान तो
कसा हाय पडूनीहि हातींची मम वांचतो ! ८०६
राहुनी राहुनी हेंची करी त्यास पिसाळिलें,
क्षोभांत या कुठें जावें वीरा हेंहि न तैं कळे ! ८०७
संगीनीच्या खुनी आघातानें लोक दिशादिशा
गेला पांगत घेऊनी जीव देउनिया यशा; ८०८
कांहीं छायाळ होऊनी पळतांच पथीं उरे
क्वचित् शूर कुणी देशघ्नांशीं झुंजुनिही मरे. ८०९
तथापि लोक क्षोभाच्या लाटांहीं बुडवोनि हा
शत्रू टाकूं, म्हणूनी जो होय निष्फल हेतु हा ! : ८१०
परी पूर्णतयाची ना हेतु निष्फलही:—रणीं
प्रत्याघातहि हिंदूचा चाखी आजचि अंतुनी. ८११
गोमांतकांत शब्दानें त्यांच्या लोक थरारले
सांडतां रक्तसिंधूही हिंदुरक्तही सांडलें: ८१२

परंतु रक्त तें आजी रुचे ना रणदेवते
रक्तबिंदु अ-हिंदूचें त्यांत मिश्रित जों न तें ! ८१३
झटापटींत ह्या मेले सात सैनिक, जों न ये.
मध्यान्ह; वांचतांही ना आणि अंतुनिही स्वयें ! ८१४
हाय: ती स्मृति येतांची विचारांत अशा, पुन्हां
अक्षम्य आपली झाली ती चुकीच गमे मना ८१५
अंतुनी एक जातांची मारला, सगळें तसें
पाडाव सैन्यची होतें छिन्नशीर्ष वपू जसें; ८१६
आणि प्रांतांत ह्या सारी हिंदुता उठती क्षणीं
विद्युत्स्पर्शें तशी वार्तेनें या धैर्यद चेतुनी ! ८१७
तिखंटा तरवारींचीं जिथें शंभरदां जवें
पातीं जावीं लखाखूनी पातें ना लवतां सवें. ८१८
सूत्रें बसे स्मृतींची जी खंथ करितां तिथें
जातिजीवनसंग्रामीं जगलीच कधीं न तें ! ! ! ८१९
विचारांत अशा वीराग्रणी तो, रिपुच्या करां–
वरी तुरीस देवोनी सुटतां, लव राहिला. ८२०
तो तिथें गांवचा त्या ये नवमल्ल युवाहि तो
वीरासि 'भूतनाथाचा जय'! बोलुनि हांसतो: ७२१
"सत्य, भूतगृहांतूनी उडी, अग्राणि, त्वां तशी
घेतां पाहुनि तैं जो तो भूतनाथ वदे तुशी !" ८२२
"माझा' बिषण्ण बोले तो वीर 'मान न, मानितो
स्वजातिचा तया शब्दीं अपमान परंतु तो. ८२३

देव–भूत–कृतें त्याची कृत्यासी जन मानिती
ज्या कृत्यांसी करूं त्यांची शके वा न धजे कृति. ८२४
जो अशा सहसा मानी भूतनाथ–पराक्रमा
तत्स्तोत्र व्यक्तता दे तद्भीरुत्वासिचि अक्षमा ८२५
गोमांतकांत ही भीति, ही गुलामगिरी पहा
तोंडांत बोट घाली ज्या सहसा बघुनी, अहा ८२६
अन्यभागीं महाराष्ट्रीं तें तों आचरती क्रिया
तीनशें त्या न जात्याची हार तीस रिपूस या ! " ८२७
" रक्त गोमांतकाचें या ' साथी बोलत ' तें जरी
त्या महाराष्ट्र रक्ताचा मात्र ओघ असे तरी ! ८२८
तोच देश, असे ज्ञाति तीच, रक्त वसा नसा
एक बीज असोनीही कां हा भेद अहो असा? ८२९
भेद नाः मूलची ! त्यां कीं मार्गदर्शक लाभती
श्रीसमर्थ तिथें येथें मान भोळसटांप्रती ! ८३०
विश्वासघातही होई जिथें सत्य, जिथें अहा,
हिंसका करुं दे हिंसा अहिंसा आजि तीच हा ! ८३१
असाधुकार्य साधू दे साधुता वदती तया
जनीं पिसाळल्या श्वाना डसूं दे द्रवती दया ८३२
सुरी गुप्त गळेकापू, भवानी[1] जनमोचका
यांत भेद दिसे ना ज्या अंधतेप्रति भाविका !, ८३३
अंधता तीचि कीं जेथें प्रकाश करितां रवीः—
तो प्रकाश स्वहत्येच्या पथा केवल दाखवी !! ८३४

---

१ भवानी—श्रीशिवरायाची भवानी तरवार.

पूर्वजांच्या विके नामावरी अक्कड जी फुकी,
बाबावाक्यं प्रमाणत्वं, कूपमंडुकताहि कीं,: ८३५
तुझे दुर्गुण ना जैशी करिती, करितीच ते
तुझे सद्गुणची भारी, भारता, तव घात ते ! ! ८३६
जगद्घातहि जे आणीः अधमां प्रबळावया
सद्गुणाभासची झाले तुझे पौष्टिक कीं तया ! ! " ८३७
" सत्य तें ! ' तो मधें बोले नव मल्लहि ' ज्या क्षणीं
आम्हां तुम्ही जनांमाजी येथ तेथ विभागुनी, ८३८
वीर गर्जे तसा वीरा ' जय हरहर ' गर्जला
होता झाला युयुत्सूही लोकसंघ तया पलाः ८३९
परंतु साधुच्या बोला जन त्या परिसूनियां
वदेः ' सत्यचि हा बोले, ' दीनता द्रववी दया ! ८४०
देव साध्य असे यासी, कांहीं अद्भुतसा महा—
चमत्कार करूनीयां वाचवीलचि सर्व हाः ' ! " ८४१
" चमत्कार पुढेंची हा ! घात ! घात ! बघा, जळे
चावडीच ! गमे सर्वां धृतां जाळिति ते बळें ! ! " ८४२
साथी हे ओरडे तोंही वीर तो लव थांबुनी
उत्तरे " घातः—तत्रापी पुरा न गमतें मनींः ८४३
स्वार—तो बघः नाना ते स्वार—होय करा त्वरा,—
साह्या आले स्वबंधूंची ! गर्जा हरहर हो चला ! ! " ८४४
युवा, सवंगडी त्याचे, साथी, वीर अणी त्वरें
पुनः पुनः रणोत्साहें, ' जय हरहर ' गर्जले. ८४५

तों दहा स्वार ते आले भाले झेलित—ज्यापुढें
साथी दुजा ! निरोपा ज्या रात्रीं देउनि धाडिलें. ८४६

संभाळ, अंतुनी, आतां: आतां मात्र भिडे खरी !
सहस्र नरमेधांचें रक्षी पुण्य तुला जरी ! ! ८४७
असें गर्जत तें सारें मराठी दळ घे झणीं
चावडीवरती तीरासम नीटचि चालुनी. ८४८
घाण तों नरमांसाची जित्याची जळत्या तशी
त्यांस मूर्च्छवि—कीं कोणी वायवास्त्रचि राक्षसी ! ८४९
तोंचि जागवितांही त्यां ' बाप ! अहहह ! हाय ! हा ! '
कण्ह कर्कश अत्यार्ता कंठाचे जळत्या अहा ! ८५०
होमकुंडा जसें रक्षूं पूर्वीं क्षत्रिय झुंज दे
हत्याकुंडा तसें रक्षूं पुर्तुगीज कलीमध्यें ! ! ८५१
भिन्न सिंधूतले तैसे खड्गांचेही शतावधि
चाखलेलें जयानीं कीं पाणी भिन्न रणांमधि, ८५२
वीर ते पुर्तुगीजांचे ! तसेच लढले रणीं !
हत आहत वा झाल्याविना ना हटला कुणी ८५३
हटतांचि परी अंतीं रिपूंचा प्रतिरोध, ते
मराठे घुसले गेहीं सोडवूं जळत्या जितं: ८५४
हाय हाय परी सांगा पापपुण्य भलें बुरें,
निःपक्षपात अग्नीच्या मुखीं कोण जितें उरे ! ८५५
एक पंतोजिची मागें उरे, काळकरांतुनी
उरे स्मृति जशी, सांगूं घोर ती घटना जनीं ! ८५६

मग्नाश शौर्य तें, आणि बंधुभस्म ! परी कुठें—
अंतुनी ? जळला तोही अकस्मातचि कां तिथें ? ८५७

शापानें साधुच्या ? किंवा पापानेंचि निजा ?—जरी
एक जीव सहस्रांच्या हत्येची न तुला तरी ! ८५८

" छे ! छे ! ' पंतोजि हांसे त्या यातनांतहि तो तधीं:
' शापानें नाः स्वयेंची ना शापिता मरता कधीं ! ८५९

पापानेंही न वा !: लोकीं पापें आपण होवुनी
कोणा न जाळिती;—जों ना चापें चेतवि त्यां कुणी !! ८६०

अंतुनी दग्ध ना ! गेला तो सुरक्षित अंतुनी
आम्हां सर्वांप्रती हस्तें या चितेंत समर्पुनी " ८६१

" साधुसीहि तया ? त्यानें त्याचेंचि हित माधिलें ? "
" सर्वांच्याही म्हणुनीची आधीं त्याप्रति जाळिलें ! ८६२

जाळिलें सांगुनीः ' तूंतें गोसाव्या, जन पूजिती
तरी भ्याड तुझ्याहूनी जगतीं न कुणी कुधी ! ८६३

जीव तूं वांचवायासी स्वताचा वदसी वरीः
प्रत्याघात नका कोणी करूं हें वरचेवरीः ८६४

परंतुः पापकृत् आम्ही, बघो ईश्वरची मला
इंगितार्थें कथूं ऐसें लज्जा ना गमली तुला. ८६५

लोकांवरील ह्याची त्वद्वर्चस्वासि भयंकरा
भीरुतेनें तुझ्या आजी केलें साह्यदची मला ८६६

तथापि तें उद्यां अस्मद् घातासीहि करावया
शकेल, हेंहि ना पाही अशी अंध न मद्या ! ' ८६७

असें सांगुनियां लावी आग साधुसि अंतुनीः
आजन्म साधुसी ज्या ना पाही क्रुद्ध कधीं कुणी ! ! ८६८
प्रत्याघाता करी--जाळी म्हणुनी मज अंतुनी
प्रत्याघाता जनीं रोधी—जाळिला म्हणुनी मुनी ! ! ८६९
आणि नंतर तो त्याच्या सैनिकां वळुनी वदे
नीतिगुह्य तसें गांभीर्यानें स्पष्ट पदें पदें: ८७०
' वृक्ष निष्फळ, गेलेले सुकुनी, अथवा जया
शत्रुक्षेत्रांतुनी क्षेत्रीं रोपू येइ न आपुल्या, ८७१
माळी कुशाग्र त्यांसीची सर्पणास्तव जाळितो
तथापि फलत्या आणी फुलत्या न तरूंसि तो ! ८७२
न तो रोपासही वा त्या, ज्यासि नेउनि लावितां
स्वक्षेत्रीं ये अनायासें, होई वन्हित जाळितां ! ८७३
पतिताहि तशा नारी फुलती फलती तरी
जाळी, न सूज्ञ तो माळी जो तिलाहि नरांपरी ८७४
न्या तरी तिज आणि त्या मुला दास करोनिया
गोव्यास या क्षणींची जों शत्रु ये न फिरूनियां. ८७५
मूरांनीं[१] तों जित्या शत्रूपासुनी न धनीं परी
खंडणी बहुधा घ्यावी स्त्रीधनांत परोपरी ८७६
आणखी अर्भकां, ज्यांची नुमले स्मृतिशक्तिही,
गुलाम करुनी नेणें मानिली निजनीतिही ८७७
ग्रीकांचीं तीं मुलें आजी ग्रीक आपण होंहि ना
जाणुनी, भावुनी त्यासी पिता जो रिपु आपणां ! ८७८

---

१ मूर—मुसलमान राष्ट्रें.

संग्रहालय, ठाणे.

ग्रीकांचीं तीं मुलें आजीं ग्रीकांचे ख्रिस्ती गळे
आजि त्या जानिसारींच्या[1] इसलाम[2] जयी बळें
जित स्त्रिया मुलांचाची वंश वाढत कोटिशः
इसलाम जगी झाला पुष्ट नीतिबळें अंशाः ८८०
गोव्यांत पाय देतांची आम्हीही युवती, स्त्रा
मूरांच्या त्या सहापत्या गुलाम करूनी त्युन्हीं· ८८१
देउं स्वख्रिस्तदीक्षाही, त्यांची संतति आजला
आपणांहुनिही वाही गर्व कां नचि आपुला ?' ८८२
असें विवरुनी गुह्य तत्क्षणीं तुरगावरी
बळें बांधुनि ते साध्वी त्या पुत्रासह सत्वरी ८८३
सैन्या आज्ञापुनी, 'जों ना जाहले धृत राख ते
चावडी जळती तुम्ही व्हाल तोंवरि राखिते' ८८४
दोन स्वारांस घेऊनी स्वार आपण होवुनि,
आडमार्गें तया गेला जयी, जीवित, अंतुनी ८८५
जयी, जीवित—जो भंगी ख्रिस्तादेश पदोपदाः
जळे जिवंत जो वर्ते जसा ख्रिस्त तसा सदा ! ८८६
आणि हा गांवही त्याच्या संगतीं जळता जिता
न जरी, जन हो ! वीराग्रणी शत्रुसि रोधिताः ८८७

---

१ जानिसारी—तुर्कांनीं मुसलमानांच्या रणनीतीस अनुसरून ग्रीकांचीं जीं मुलें गुलाम करून नेलीं तींच मुलें मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन सुलतानाच्या शरीररक्षक पथकांत भरती केलीं गेलीं हेंच 'जानिसारी' नांवानें इतिहासांत प्रसिद्ध झालेलें तुर्कांचें पूर्ण विश्वासाचें सैन्य होय.

२ इसलाम—मुसलमान.

जनहो !, ’ लव घेवोनी श्वास तो कण्हता पुन्हां
पंतोजी अग्निदाहींही पुढें लागत बोलण्या ८८८

ग्रामस्थ शेंकडो दाटे भोंती भावभरें तयाः
‘ जनहो ! न जरी येते वीर रोध करावया. ८८९

तरी अंतु जिनें ग्रामा जाळितां दहनीं अशा
अथवा पतितत्वाच्या हाय तसतरा तशा ! ! ८९०

जें अहो भोगिलें एका अत्याचार तुम्ही दिना
अत्याचार तसा गांजी ग्राम ग्राम दिना दिना ! ! ८९१

ही एक घोर दुःखाची कहाणी कथिता पहा
कथी अकथिता ऐशा कहाणी शतशः अहा ! ! ८९२

पाणी दे त्या जसा तैसा पिळी जो चरकीं तया
इक्षुदंडसमानत्वें लागे गोड, करी दयाः ८९३

म्हणूनीच तया सारे खाती सोलुनि सोलुनी
चरकीं पिळितां, भारी रस गोड, वदे धनी ! ८९४

गति तीच जरी व्हावी, सुखेनैव तसें करा !
एकात्मत्वाचिया एक्या चितेंत जळुनी मरा ! ! ८९५

परंतु एकात्मत्वाच्या मंत्राचाचि तया ऋषि
कंसघ्न आचरे नीति ती गमे बहु पूज्यशी, ८९६

दुर्दशा निजदेशाची हृदास द्रववी जरीः
त्वरें दुर्बल अश्रूंचीं जळेंही पुसुनी तरी ८९७

तुसोत चवताळोनी, जय हरहर गर्जुनी,
ह्या राष्ट्रवीरभद्राचे भद्र वीर महारणीं ! ” ८९८

श्वास खोल पुन्हां गेला: स्फुंदस्फुदत तो रडे
जनसंघ हुतात्म्याच्या चरणीं शिशुसा पडे ! ८९९
अस्पष्ट, धीट तत्रापी, वाणी ये गुरुची पुन्हां
“ घाल कां वचना एका ? इच्छा एक असे मना ! ९००
येथें, याच क्षणीं, तुम्ही ग्राम—याजवळी असे,
—ग्राममुख्य तुम्ही, आणि तुम्हीही जनहो तसे,: ९०१
उष्ण राख हुतात्म्यांची, जावो तोंच उभारिली,
हिंदवी--पातशाहीची ध्वजा धन्य अम्हांवरी ! ! ९०२

शब्द हे न निघालेही पुरे तोंच: बरें ! बरें !
फुटोनी फुटुनी सारे जन क्रंदत गर्जले ! ९०३
स्वारासंगें नव्या होता त्याच घेउनिया ध्वजा,
भारतांत उभारी कीं महाराष्ट्र मरोनि ज्या ! ९०४
वीर देई हुतात्म्याच्या करी: “ हिंदु-गुरो ! धरी
उंच हिंदुपदाची ही ध्वजा कोण, नतूं जरी ! ! ९०५
तेथेंच ग्राममुख्यांहीं, प्रतिज्ञात जनें तिथें,
उष्णरक्षा हुतात्म्यांची साक्ष ठेवुनि तीच ते: ९०६
कीं पुन्हां पुर्तुगीजासी ठेवुं देवूं न पायही
स्वतंत्र आजपासोनी पूर्वजार्चित ही मही ! ९०७
वीर साश्रु सर्व काढी तो वृत्तांत लिहोनिया
प्रेषूं अंताजिपंतातें, वारंवार कथूनिया “ या ! ” ९०८
“या, या, ग्रामा स्वराज्याचा पदरीं वळवूंनिया
राष्ट्रवीरप्रधान श्रीबाजी हर्षनिधान या ! ” ९०९

स्वाक्षरग्राममुख्यांनीं पत्रिका करुनी दिली
जींत रक्षा हुतात्म्यांची अंगाऱ्यास्तव घातली. ९१०

आसन्नमृत्यु त्या पंतोजीचा हस्त हळूंहळूं
स्वशिष्या नव मला दे ध्वजा सांगत ' नां चळू ९११

प्राणजातांहि द्या यासी ! बोला हरहर ! हां-चला !'
जन स्फुंदतही वारंवार हरहर गर्जला ! ! ९१२

त्याचि गर्जामध्यें त्यासी पुष्टि अंतिम द्यावया
राहिला श्वासही दे तो हुतात्मा मिसळूनिया ! ! ! ९१३

तिचा श्वास परी ? नेली हरिणी हिसडुनिया
तिचा श्वास कशामाजी जातसे मिसळूनियां ? ९१४

सोडितांहि बळें केव्हां श्वास अंतिम ना सुटे
जीव दु:खार्त लोकांचा जावया बहुधां हटे ! ९१५

असें सांगुनि कीं वाचा, निद्रा, भूक, हसूं, असूं,
सुकोनीया कुणी यावें जितें प्रेत जसें दिसूं ९१६

आली दिसूं उन्हाळ्याची शुष्क तोय नदी तशी
अंतुनीच्या गृहीं भ्रष्टा, स्पृष्टा एक वधू अशी ! ९१७.

" पुत्र कां पति, हो बाई ? पुत्र कां पति तें वदा '
असेंही पुसतां यावी जनां ती दिसुनी कदा; ९१८

वाके एक्या मुला प्रेमें अंकीं घेउनिया घडी
सहसाचि तिनें घ्यावी, ढकलोनि तया, उडी !: ९१९.

" मला ! मला ! अहो जाळा; या मुला जरि तें रुचे !
माझी मी अग्निच्या ज्वाळांसह घे गिळुनि वचें ! ! " ९२०

बंदिवास असा कांहीं मास सोसुनि एकदां
सहसा सुटुनी धांवे ती गोव्यांत पथा पथा. ९२१
सुविशाळनिळा—काळा खोल सागर तों तिला
दिसतांच तिनें एकाएकीं धांवुनि तत्पला, ९२२
“ बाई बाई ! असूनीही पाणी हें इतुकें जगीं
आग ती जळतां मेली राहिल्यें बसुनी उगी ! ९२३
अशा शंभर आगीही विझवीशिल, सागरा !
सुशीतल, दयाशीला ! ईश्वराहुनि तूं खरा ! ” ९२४
असें बोलुनि, ओच्यासी उचलूनि, तिनें उडी
सागरीं घातली: घाली कालाब्धींत जशी घडी ! ! ! ९२५
परी होईल कैसें तें, जाईच्या खुडिल्या फुलां !
आई जातां, तुझें आतां, धाकुल्या मधुरा मुला ? ९२६

पूर्वार्ध गोमांतक समाप्त.

गणेश महादेव आणि कंपनीचीं

# आजकालचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | स्वराज्याचा श्रीगणेशा. | २-४-० |
| २ | स्वराज्याची घटना. | २-४-० |
| ३ | स्वराज्याची स्थापना. | २-४-० |
| ४ | स्वराज्याचा कारभार. | २-४-० |
| ५ | स्वराज्यावरील संकट. | २-४-० |
| ६ | मराठी रियासत, मध्य वि. ३ | २-४-० |
| ७ | ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध. | ३-८-० |
| ८ | श्रीएकनाथ चरित्र. | ०-१२-० |
| ९ | भक्तिमाणिमाला. | १-८-० |
| १० | अजिंक्य तारा. | १-८-० |
| ११ | निकोलाय लेनिन. | ०-१२-० |
| १२ | ग्रेट ब्रिटनची शासनपद्धति. | ०-१०-० |
| १३ | नवजीवन ( नाटक ) | ०-१०-० |
| १४ | जोसेफ मॅझिनी. | २-०-० |
| १५ | महात्मा गांधी. | २-४-० |
| १६ | मानवी कर्तव्यें. | १-०-० |
| १७ | माधवानुज ( कविता ) | २-०-० |
| १८ | वीर वैरागी | १-०-० |
| १० | गोमांतक ( ऐ. काव्य. ) | १-८-० |

## छापत आहे

२० श्री. चापेकरांचे निवडक लेख

# गोमांतक

## उत्तरार्ध

( सन १७९८ )

# गोमांतक

## उत्तरार्ध

( स. १७५८ )

वृत्त—' वैनायक '*

गळुनि सर्व पानें जो शुष्क वाळल्या
हाडांचा क्षीण पंजरचि तसा उभा
वृक्ष वटाचा तो, वासंत वायुच्या
झुळुकांहीं रान जईं अखिल आपुल्या
फलफुलांत डवडवुनी डोलुं लागतें
तैं पल्लवलक्ष्मीनें खुलुनि शोभतो
डौलदार नवजीवन पुष्ट असा कीं
तोची तो वट पहिला हें न कळूंही
सांगितल्याविण यावें ! तेंवि कळूंही
कथिल्याविण आज ये न हेंचि कीं असें

भार्गव तें !,—जें प्यालें भीत हरिणसें
क्षणक्षणांत भयविव्हल दारका जला—
—वीसवत्सरा मागें ! ! आज कोकणीं
हिंदुस्वातंत्र्यवसंततुसमीरें

---

* वैनायक—या वृत्ताचा उहापोह या काव्याचे प्रस्तावनेंत केलेला आहे तो वाचकांनीं या वेळीं अवश्य पहावा.

रान अखिल फलपल्लवपुष्पभरानें
डवडवतां नवजीवन—पुष्टता उठे
पल्लविता होउनि कीं भार्गवांतल्या
तरुलतांतुनीही इथें ! द्वार तयाचें
आज लोह—बळकट हें. वेशिच्या नव्या
उंच भिंतिचा आयत कोट जातसे

छाति बलिष्ठत्वाची तेंवि फुगोनी,
राष्ट्रस्वातंत्र्यजन्य आत्मविकासें
क्षितिज तया गांवाच्या पूर्वदृष्टिचें
विस्तारुनि, तेजस्वी तारका नव्या
नव आकांक्षेच्या ह्या उदय पावती
लघुहि जीवनांबरांत गांवच्या तया.
आज इथें शेजाऱ्या गांवच्या कुण्या
यात्रेंतिल झुंजीची होय ना तशी
चर्चा; कीं दिल्लीच्या झुंजिची जशी !
तरुणगडी कारण येथीलची किती

महाराष्ट्र--भूसैन्यीं भरति होउनी
दूर दूर गाजविताहेत आजला
आपुलिया तरवारी स्थलरणांगणीं
आणि सिंधुसैन्यांतुनि जलरणांगणीं

त्या हुतात्म गुरुच्या तनयांत एक ये
काशीहुनि संपादुनि वेदविस्त्वहीः

तो पंडित तरुण त्याचि गुरुगृहांत त्या
वेदपाठशाळेसी चालवुनि करी
पूर्वींहूनि भरभराट शतगुणें तिची.
मल्लयुवा जो लढला वीरवराच्या

संगति त्या अंतुनिसह, त्यांसि अर्पिती
गांवाची पाटिलकी पेशवे प्रभू.
गालमिशा भव्य तया पाटलाचिया
सभयादर जागविती गावकन्यांच्या
मनिंच मात्र नाः परंतु त्याहुनी मनीं
जाति रिपूंच्याहि आज. आज चिमुकल्या
त्या आखाड्याचें होऊनि उठतसे
मंदिर प्रचंड एक; ज्यांत गडी ते
बलभीमाची मूर्ति स्थापिती स्वयें.
झडत नगारा आणी घांट दरघडीः

स्वारांचे पथक सज्ज पाहरा करी.
मंदिराहुनीहि परी त्या प्रचंडशी
संस्था जी अवचित या जन्म घेतसे
भार्गव गांवांतः ती जिवंत जाळल्या
हिंदुहुतात्म्यांच्या स्मृत्यर्थ बांधिली
दहनस्थलिं जी समाधि भव्य ती असे.
या समाधिमंडपार्थ पेशवे प्रभू
भूम्यादिक सुप्रबंध करुनिया, स्वयें

पाचारिति यात्रा : प्रतिवर्ष जी भरे.
ही कायापालट ह्या गांवची अशी

आमूलात् होय विगत वीसवत्सरीं:
परि त्याचें काय होत ?—फूल लतेचें
फुलतचि जें गळलें तें ? काय होतसे '
मधुर धाकुल्या तनयाचें तया परी ?

कोणासी ठाउक !—परि एक दिनीं या
भार्गवांत सहसाची एक बातमी
जो तो अन्यासि कथूं लागला महा—
आश्चर्यें चकित होत ! मनुज एक जो
आणी त्या बातमीस त्या समादरें
पाटिलही अंतीं ने बोलवूनिया:

आणी बहुमानासह सत्य विचारी.
जन वदला " ह्या ग्रामीं आपुल्या नसे
मी केवल अपरिचितचि. बहुत जनांहीं
श्रीनिनामिबावांच्या त्या मठामध्यें
बाबांच्या सेवेचा लाभ भोगितां
पाहिलें असेल मला त्या दिनामधीं.
विप्रज मी. शुक्रनाम. साधुसेवनीं
ने जीवन. ज्या कालीं तीन वत्सरा
मागें, या गांवीं आकांत होउनी
सज्जनांसि पुर्तुगिजें जाळिलें जितें:

त्या काळीं परिसुनि तो संत निनामी
जावांचा अंत घोर कष्टलों बहु,
अंतीं ये चित्तीं कीं; तोंवरी जसें
जीवन मी त्यांसीची ने विचारुनी
तेंवी त्यावरतीही त्यांप्रतीच कीं
जिज्ञासिन कवण कार्य यापुढेंहि तें
म्हणुनी मी निरशन राहूनि घेतलें
धरणें शिवमंदिरांत, निबिड अरण्यीं
तों नवल्या दिवशीं दृष्टांत मज घडे
' जा ! आणी अंतुनिच्या हातुनी तया

सोडवुनी आणी पुत्रासि रमेच्या
माझ्यावरि विश्वसतां मरण ये तिच्या
पतिसिः परी वंश तिचा रक्षिनची मी ! !
जाः सत्वर जा ! ! ! " आज्ञा परिसतांचि ती
प्रत्यक्षाचि संताची मी उठे झणीं.
विनय कथूं दे न मलाः पोचलों कसा
गोंन्यासी; अंतुनि तें ओळखी कसा;
केवि मला मात्र दिसुनि मूल तेंच मी
कोणासीही न दिसूं पावलों तिथें;
कैसा अदृश्य जना होउनी असा

गेलों त्या दुष्टाच्या नीट घरींची
आणि घेउनी तें मी मूल निघालों

ऐकतांचि ह्या माझ्या प्रार्थनेप्रति
प्रत्यक्षचि दिव्य विमानांतुनी, अहो ! '
संतराज तो येई !—तें मूल घे करी;
आणि दिव्य वचनीं मज गौरवुनी वदे :
" जा ! आम्हीं वंशा या वाढवूं स्वयें—
स्वर्गीची !—तीच पुण्य योग्य यां गति ! ! !

एक परी भौतिकशी वासना उरे
वंशाची या: ती तूं पूर्ण करी जा !
ग्रामीं जी यांची कुलवास्तु पूजिता
तींत तयांच्याची कुलदैवतांप्रती
स्थापुनि तूं--आणि तूंचि—अर्चि नित्य जा !
साधन हें मोक्षेच्छा पुरवुनी तुझी
स्मृति जगतीं राखिल या पुण्यकुळाची ! "
' आज्ञा ! परि मजसी तों ठाउकें नसे
कुलदैवत कवण तया पूज्य कुळाचें ? '
जिज्ञासे मी : तों ते संत बोलले

' जा ! आणिक त्या तुळशीच्या त्या गृहांगणीं
कोनाड्यामध्यें कोदंडधरा जी
राममूर्ति तुज दिसेल : तीच तूं तिथें
स्थापीं जा ! साक्ष हींच दिव्यभेटिची
होईल तुज—आणि जनां !' वदतची असे
नेउनिया सतनु तया बालकाप्रती

माघारा नीट बळें : सर्व ती कथा
विजय कथूं दे ना मज याक्षणीं स्वयें.
इतुकेंची कथितों कीं तीं अमानुषी
कृत्यें जीं मजकरवीं घडलि तैं अशीं
तीं सारीं अत्यद्भुत संतशक्तिचीं
कृति केवळ !—दीनाची या न शक्ति ती ! !
जननी त्या बाळाची ती रमा तिथें
त्यापूर्वींची. होई मृत, असें मला

श्रुत होतां तत्क्षणींच परत निघालों.
तों जैसा तोंडीचा घास हिसडुनी
नेणाऱ्यावरि धांवे व्याघ्र तुटोनी
तैसा ये अंतुनी सहसाच मजवरी।
अस्त्रांचा, शस्त्रांचा, शत्रुसैनिकीं
केला भडिमार !—परी त्यास एकला
ब्राम्हण मी मंत्रबळें पर्वता असा
तोंड देउनी करितां विफल जहालों !
परि बालक तें कोमळ पाडसाहुनी
तापानें, तान्हेनें आणि भुकेनें,

विव्हल बहु व्हावें त्या यत्न चलेना:
तरिहि तसा तीन दिवस झुंजतचि—मयें
झालों करुणेसी भाकितां पुनः पुन्हां:
' धांव विभो ! आतां साह्यार्थ तूंच ये ! '

ऐकतांचि ह्या माझ्या प्रार्थनेप्रति
प्रत्यक्षचि दिव्य विमानांतुनी, अहो ! '
संतराज तो येई !—तें मूल घे करी;
आणि दिव्य वचनीं मज गौरवुनी वदे :
" जा ! आम्हीं वंशा या वाढवूं स्वयें—
स्वर्गींची !—तीच पुण्य योग्य यां गति ! ! !

एक परी भौतिकशी वासना उरे
वंशाची या: ती तूं पूर्ण करी जा !
ग्रामीं जी यांची कुलवास्तु पूजिता
तींत तयांच्याची कुलदैवतांप्रती
स्थापुनि तूं--आणि तूंचि—अर्चि नित्य जा !
साधन हें मोक्षेच्छा पुरवुनी तुझी
स्मृति जगतीं राखिल या पुण्यकुलाची ! "
' आज्ञा ! परि मजसी तों ठाउकें नसे
कुलदैवत कवण तया पूज्य कुळाचें ? '
जिज्ञासे मी : तों ते संत बोलले

' जा ! आणिक त्या तुळशीच्या त्या गृहांगणीं
कोनाड्यामध्यें कोदंडधरा जी
राममूर्ति तुज दिसेल : तीच तूं तिथें
स्थापी जा ! साक्ष हीच दिव्यभेटीची
होईल तुज—आणि जनां !' वदतची असे
नेउनिया सतनु तया बालकाप्रती

देखतां अदृश्य अहो गगनिं जाहलें ! ! !
तुकयाचें सतनु गमन ऐकिलें तुम्ही:
परि अत्यद्भुत हें श्रीसंतनिनामी
बावाचें, सतनु बाल घेउनी, नभीं
आरोहण प्रत्यक्षचि पाहियलें मीं ! ! ! ”
आणि दिव्य देखावा तो पुन्हां जसा
व्हावा प्रत्यक्षः तसें नयन तत्क्षणीं
विप्राचे मिटति दिपुनि ! तनु थरारली;
सहसाची शांत–मूक होउनी बसे.
अर्धसमाधिस्थ तसा विप्र पाहुनी
आदर वाचाच बंद करित त्या कथे—
विषयींच्या शंकेची जनमनांतल्या !
लवकालें लवचर्चा होउनी ठरे
जाण्याचें, पाहूं त्या मूर्ति जरि तिथें :
एक दोन जन वदले बहुत दिवस त्या
मूर्ति माधवाच्या कीं असातिची गृहीं !
—औत्सुक्यें तो टाळी विप्र वाजवीः
‘ असल्याची पाहिजेत ! साक्ष ठरें कां
कालत्रयिंही असत्य !—दिव्य वचांची !
तरिहि पंच गांवाचे घेउनीच कीं
जावें त्या दर्शनास;—कीं न कुणि पुढें
बोलो पाखंड:मूर्ति तेथल्या न या ! ’
पंचासह गेले जन माधवालया:
तों त्याची स्थलिं राघवमूर्ति तशाची !

सहस्राची जयजयकारांत नभ जनें
भरुनि दिलें ! झालें ! त्या दिव्य कथेची
माहात्म्यीं ग्रामाच्या कीर्ति शिरोनी
ग्रामा त्या क्षेत्र करी : साधु त्या द्विजा.
इच्छा ती वंशाची त्याच म्हणोनी
गेहा त्या देवालय आणि भूमितें
माधवाचिया अखिला देवधन असें
समजुनि, त्या शुक्र—करीं अर्पिलें जनें. ! ! !
   आणि प्रतिवर्षीं जी लागली भरूं
यात्रा नव त्या हुतात्मवीरवरांची

भव्य समाधीभंवती, तींत विप्र तो,
ज्या कथेसि विस्तरशः विनय देइना
कथुं पूर्वी—तीच अशा आग्रहें अणी
विस्तारें सांगे प्रतिवर्ष कीं उभ्या
अठराही प्रमुख पुराणांतल्या जुन्या
कवणाही अद्भुत रमणीय कथांसि
जावी ती नव कथा न हार अल्पही
अत्यद्भुततेमध्यें. शीघ्रची क्रमें
राष्ट्राच्या संत कथा सिंधुच्या मधें
हाहि बिंदु पडुनी अतिपावना कथा

ती स्वयंप्रमाण होय—नवकथांप्रति.
   प्रतिवार्षिक पुण्यतिथि प्रथित आज ती:

यात्रेची दंगल उसळोनि राहिली
सर्व दिशांसि ग्रामांतुनि आज त्या :
इतुकी कीं पूर्वी ना पाहिली कुणी !
कारण या वर्षी यात्रेसि येतसे
या विशिष्टसें महत्व आगमनानें
कित्येकां अधिकारी शिष्ट जनांच्या,
जातिकार्य नव विशिष्ट एक साधण्या :
पूर्वी जैं परदास्यें लोक पीडिला

तै ज्या ज्या म्लेंच्छबलात् वा छलात् खळी
भ्रष्टविती हीन दीन हिंदुजनांसी
त्या त्या पर—धर्महृता बांधवांप्रती
पुनर्हिंदु संस्करणें शुद्ध करोनी
सुस्वागत पितृगृहासि आणणें असे.
जातिकार्यसाधनार्थ ह्याचि आजला
यात्रेसी या अपूर्व लोकसंघ ये
छत्रपतिहि या कार्याप्रति अपूर्वशा
अनुमति देऊनि निजा शिष्टमंडळा
धाडिति अभिनंदनार्थ. पंडिताग्रणी

आनुकूल्या निज दर्शवु शिष्यजनांसी
प्रेषिति वा येती स्वयमेवही किती
कोंकणिचे देशमुख्य राजकीय जे
अधिकारी तेही निजसैनिकांदिकां

परिवारासह येती; आणि आंगरे;
घोरपडे; सावंत; सरदार सिंधुचे.
तंबूतुनि, डेऱ्यांतुनि, राहुट्यांतुनी
शूरत्व, श्रीमत्ता, — उतरती इथें.
पालख्यांत, मेण्यांतुनि वा कधीं कुणी
हत्तींच्या अंबाऱ्यांतूनि ऐटिनें

जातानां प्रथित महाराष्ट्र अग्रणी,
पाहतसे मुदित महाराष्ट्र भक्तिनें.
शिंगांचे खणण फुंकार; हे तिथें
ती नगारघाई; ते चौघडे किती;
घंटा वा घाटा वा तास वाजतीं.
    पेठ्यांचीं जिलब्यांचीं रचिति विचित्रें
पात्रें ते हलवाई. फळफळावळी
नव रसाळ फळवाले मांडिती विकूं.
ताफे रंगेलशा तमासगिरांचे;
ते रहाट चक्रें तीं खेळणीं किती,

झोंके गमगमतीचे खेळ—एवढी
मोठी यात्रा न कुणी येथ पाहिली !
    वीर हुतात्म्यांची जी भव्य समाधी
तेथें तों मुंगीसी वाव मिळेना !
संकीर्तनिं भजनिं नामघोषगर्जनीं,
चाले निर्विघ्नपणें ती उपासना.

शतजन नवसांसि करी : नवस फेडती
केलेले शतशतजन : शतशतांवरी
जन भाविक परिसताति दिव्यकथेसी
सतनु रमातनयासह संतनिनामी

बावांच्या त्या स्वर्गारोहणाचिया,
आणि तशा अद्भुत सिद्धाइचे धनी
ते शुक्राचार्य विप्र कथिति कथा जे,
तच्चरणा नमिति सदाक्षिण पुनः पुन्हां.
हुत संताच्या पावन पादुकांचिया
दर्शनार्थ तों झिंबड एवढी उडे
कीं मंदिर तें प्रचंड करकरा लवे !
चावडिचें त्या समाधिमंडपांत ह्या
रूपांतर होय न तें असह होय जें
दहन–स्थल–हें तेंची ! जीव घेउनी

ज्यापासुनि दूरदूर शक्य तोंवरी
जन गेले पळत पळत मरत अनुपलीं :
–आज त्याच वास्तूच्या भोंवतीं झुले
जन रेटित शतसहस्र, जावयाप्रति
दहनस्थलिं त्या सुरम्य शक्य तोंवरी
जवळ, जवळ, जवळ ! असा काळ उलट घे !
दिवस सर्व तो ऐसा कीर्तनें कथा
नमन–अन्नसंतर्पण विक्रय–क्रयीं

यात्रेचा विगत होत येतसे क्रमें
वेळा त्या कार्याची मुख्य योजिल्या.

पाराच्या त्या पटांगणांत थोरल्या
जन लागे जमण्यासी, उत्सवें महान्.
बैठक जी मध्यें विस्तीर्ण शोभली
तीवरि जे थोर थोरं त्यास नेउनी
पाटिल ते प्रमुख बैसवीति सादरें.
कोकणांतले नेते हिंदुजनांचें,
प्रतिनिधिस्वरूप लोक तैं सभेंत या
सर्व उपस्थितचि, परी अन्यही किती
येति महाराष्ट्रांतिल ठळक पुरुष ते
म्लेंच्छीकृत निजबांधव मोचनाचिया

कार्यास्तव ह्या विशिष्ट आजच्या सभे.
शृंगांचे कर्ण्यांचे फुंक, सैनिकी
बाजांचीं रणगीतें, बार बंदुकी !
सैनिक रणशूर सज्जशस्त्र थाटले;
सैनिक जलशूरहि नौसाधनांतले,
शास्त्री, विद्वान, वैद्य, वणिक, थोर ते
संन्यासी योगीही पातले इथें.
पालखिच्या मागुनिया पालखी घुसे
सरदारामागुनि सरदार येतसे :
संपादूं कार्यासी भव्य सांग या

म्लेंच्छीकृत निजबांधव मोचनाचिया
येति राजमुख्यहि तो : उठुनि सभेनें
सत्प्रत्युत्थान दिलें. शब्द विविध तो
स्तब्ध होय. चित्र तशी पल सभा बसे.
राजमुख्य सत्ता गंभीर परि मृदु—
—वचनीं मग करुनी सुस्वागताप्रती
अखिल समागत निजजातीय जनांच्या
वदले : “ हो वीर राजकार्यकारि हो :
सैनिक, नौसैनिक, विद्वान वणिक हो;
पौर, जानपद हो: आबालवृद्ध हो:

आजि परशराम क्षेत्रांत आपल्या
हा आनंदाचा दिन उगवला खरा :
उगवला परंतु कसा? याचि वटाच्या
या पारावंरिच हीन हिंदुजनांचे
अंतुनिचा हिंस्रस्वर मात्र ऐकुनी
प्राण पटापट गेले ! बायकामुलें
आपुलिया देखतही भ्रष्टवूनिया
नेतांना म्लेंच्छ, तया हटकिता कुणी
होता ना मायेचा पूत एकही :
—त्या पारावरिच आज या क्षणीं असूं

१ राजमुख्य—सुभेदार ( viceroy )

हे आम्हीः हीं शस्त्रें तीक्ष्ण आमचीं :
हा भगवा झेंडा; दुर्धर्ष आणि हा
हिंदूंचा जरिपटका ! ! आज कोकणीं
हिंदूंचा विद्वेषी–गौर, कृष्ण वा,—
कवण असा मायेचा पूत जन्मला
जो पाहूं शकत इथें वक्रदृष्टिनें ?
न्यूनाधिक अवधि वीसवत्सरांवरी
जाहला असेल आज त्या दिनांप्रती
कीं दिवशीं ज्या नृशंस नरचितेवरी
जाळिलें जितेंचि जनां भार्गवांतल्या

पुर्तुगिजें, केवल ते हिंदु म्हणुनिया !
नेहमिंचाची होता पोर्तुगिजांचा
खेळ एक तो यद्यपि; यद्यपी अशा
ग्रामांवरि शतशत होतेचि फिरविले
धर्मपीडनाच्या त्या वांझ नांगरा
आजवरी त्यांनीं निर्लज्ज मानसें;
तत्रापी पेटवितां नरचितेप्रती
पेटविता हाताचि ना पेटला कधीं—
जैसा सहसाच भार्गवांत त्या दिनीं ! !
न्यूनाधिक अवधि वीस वत्सरांवरी

जाहला असेल : त्याचि नरचितेंतल्या
भस्मासी धर्महुतात्म्यांचिया तया

करुनि साक्ष जी जनिका घोषणा करी
दास्य–मोचनाची हें ग्राम, चिमुकलें :
एकामागूनि एक नगरपट्टणा
ध्वनवित ती दीप्त घोषणा भयंकरीं
रणगर्जी रूपांतर शीघ्र घेतसे ! !
शिद्दी, इंग्रेज, पुर्तुगीज–आसुरी
शक्तींचे सिंहासन ज्यावरी उभे—
स्तंभा त्या हिंदुसहनशीलतेचिया

हरिविद्वेषार्थ असुर लाथ मारिती ! :
तोंच असह कडकडाट होउनी अहा
स्तंभातुनि त्याचि घुसे हिंदुशक्तिचा
मूर्त–नृसिंहचि तैसा वीर चिमाजी !
थरथरलीं असुरदलें. दळुनि टाकिलीं
शामलीय कंदचि उपटूनि कंदनीं
रावणसा राक्षस तो मारिली बली
शिद्दि सात : हस्तानें एक : आणखी
हस्तानें दुसऱ्या त्या नरतिमिंगला
धर्मोन्मादासि गौर राक्षसांचिया !

तत्व अहिंसेचें उपदेशिण्या प्रती
जातां शत संत, अति जाहले बळी
हिंसेसी मात्र जया हिंस्त्र पशूच्या :
—व्याघ्र आफ्रिकी तो, तो वृकहि युरोपी;

निरुपद्रव सहसाची आज होउनी
हिंसी ना !—कारण कीं हिंसु शकेना !
इतुकीं ती आमूलात् स्वच्छ छाटुनी
दंतसखें हिंसेची, गाय तिज करी
धर्माचा तीक्ष्ण खड्ग ! कोकणांत ज्या
हरिनामोच्चारण हें पाप ठरोनी

देहांताचाचि दंड होत : आजला
तेथेंची हरि गर्जे, नित्य नव जयीं,
हरिभक्तांच्या सेना भरिति अंबरा !—
—आसमुद्र–सह्याद्रि ! ! प्रबल आजला
कोकणांत धर्म, ध्वज, धेनु, आणखी
हिंदु स्वातंत्र्य असे : हिंदु यश असे :
  देवार्चन चाले निर्विघ्न मंदिरीं,
हत अहिंदु खलबल होतांचि कोंकणीं :
निर्विघ्नचि चाले तत्रापि कोकणीं
मशिदींतुनि वा चर्चांतूनि अर्चना

जे अहिंदु त्यांचीही :—हिंदुशक्तिचा
कीं आत्मौपम्य मृदुल हा स्वभावची
बहुशः निरुपद्रविता : परसहिष्णुता :
  आकाशासी सहसा घोर रात्रिच्या
फाडुनिया स्वर्ग्य असा दिवस भूवरी
आणण्यांत ज्यांनीं स्वप्राण खर्चिले

धन्य हुतात्मे ते ! तद्भाग्य अतुळची ! !
देवभक्त, देशभक्त वीरगुरू श्री
ब्रह्मेंद्रस्वामी तो थोर तपस्वी;
हिंदूंची अभिमानी मूर्त देवता

श्री मथुरा देवी ती; सिंधुवीर ते
सेखोजी, मानाजी,—वंशची उभा
आंग्र्याचा अखिल; अखिळ धारकरी ते
मोड; मोहिते; शिंदे; शूर पिळाजी;
ळढवय्या बांका बांकाजि वीर जो
गनिमांसी काढी मोडोनि चिपळुणीं;
खंडोजी धीट; रणप्रखर खराडे;
अंताजी आणि रामचंद्र कावळे
अभिमानी कट्टे जे हिंदुजनांचे;
गंगाजी नाइक; पटवर्धन : श्रमी

राणोजी—छिनुनि डहाणूसि घेत जो;
वीर रेटरेकर, जो रिपुसि रेटुनी
तारापुरवरच्या हल्लयांत हटवितां
अभिमुखची संगरांत झुंजुनी पडे;
वीर पडे : वीराचा ध्वज परी चढे
तारापुरवरच्या हल्लयांत रिपुवरी
माहिम, शिरगांव, घेत. घेत वांद्रा
धारावी, वांसावें, अंतिं मराठे

भिडले त्या वसईसी !—नांवची जिचें
अतुल पराक्रम तो आणूनिया उभा

दृष्टीच्या करित पुढें ! वीर हे जथीं :
आणी ह्या वीरांचा अखिल विजेत्या
वीराग्रणि चिमणाजी वीर तो स्वयें !
सैनिक वा सेनापति : कोण कोणते
वानावें मोजुनियां ! जे सहस्रश :
योजक, झुंजार, धर्मवीर, हुतात्मे;
धर्मयुद्धयज्ञीं ह्या प्राण अर्पिती
पुण्य परशुरामक्षेत्रासि कराया
दैत्यमुक्त पुनरपि:—तें धन्य सर्वची ! ! !
आणि तया सर्वांची परम उपकृति

आजि महाराष्ट्र अखिल—त्यांत विशेषें—
करुनि परशरामक्षेत्रस्थ हे अम्ही,—
परम नम्रतेनें ही स्मरतसों इथें
हिंदूंची शेखी त्यांनींच राखिली !
चरणीं त्या सकलांच्या ही सभा उभी
अति कृतज्ञ, अति विनम्र, वाहातसे ही
राष्ट्रीया पुष्पांजलि परमभक्तिनें ! ! !
सर्व सभा तों प्रत्युत्थान घेतसे :
शृंग, शंख, कर्णे, रणढोल, नगारे,
उठत घोष वाद्यांचा द्यावताप्रती

स्मृतिसि धर्मवीरांच्या जनिक वंदना.
गंभीर क्षण, कृतज्ञ, साश्रु असे ते
कांहीं होताति विगत. वाद्य नादही
शांत होय. वाक्पिपासु ती सभा बसे.
आणि राजमुख्यांची युक्त्यलंकृता
वाक् पुनरपि लोकहृदा होय कर्षिती:
" बांधव हो ! हतवीरस्मृतिसि कृतज्ञें
हृदयें सत्कारुनिया, लेशमात्र कीं
पुण्यतिथीच्या झालों अग्रतम अम्हीं
कर्तव्या आचरिते : परि हताहुनी

पुण्यकार्यसंगरिं तैशाच विक्रमें
झुंजुनिही भाग्यवशें विजय पाहण्या
राहिले जिवंत अशा थोर जनांची
उपकृति कां रेसभरी होतसे कमी ?
मग ह्याची पुण्यतिथिसि पुण्यहतांच्या,
हिंदुस्वातंत्र्यरणीं झुंजलें हतां—
सह त्यां जे कोकणांत; आणि कृपेनें
ईशाच्या आजहि जे, त्या ध्वजार्थची,
अन्य दिशे अन्य क्षेत्रांत झुंजती,—
त्यांचीहि स्मृति आम्हां स्मर्य कां नसे ?

त्यांचीहि सत्कृति सत्कार्य कां नव्हे ?
पुण्यतिथीसी ह्याची पुण्यजनांच्या ?

ह्या ग्रामस्थांताचि जो त्या दिनीं स्वयें
अंतुनिसी सगळ्यांच्या प्रथम विरोधूं.
तुटुनि पडे प्रथम असा एक इथेंहि
वीर असे वर्तमान ! कोण तो तुह्मां
नलगे म्या कथिणें तें ! ' जनिक शब्द ये:
पाटिल ते ! पाटिल हे ! तों सभेंतुनी:
" हो ! हो ! हे येथिल पाटील; आणखी
जी हुतात्मरक्षा ह्या क्षेत्र शिवारा

गांवाच्या करित, तींत धन्यतमा नी
रक्षा ज्या गुरुची—तत्तनय धन्य हा !
उभया मी आजी ह्या, वर्तमान त्या
वीरांच्या अखिल स्थानींच कल्पुनी
सार्वराष्ट्रिका सन्मानासि देतसे :
पाटिल हो ! या; आणी पेशवे प्रभु
धाडिति स्वयेंचि तया तीक्ष्ण कृपाणा
घ्या; कसा काटिला, घ्या ! धर्मशत्रुतें
धार तिची तीक्ष्ण असो नित्य दुर्धरा !
आणी हे गुरुपुत्रा; भावुनी वचां

' आत्मा वै पुत्रः ' तुझ्या मूर्तिंतचि दिसे
आम्हांसी मूर्ति तुझ्या वीरपित्याची !
तोंचि अग्निहोत्री या ब्राह्मणांमधें:
होमाग्निंत देत बळी आपलाच जो

परि अहिंदुशत्रुशक्तिचाहि त्या सर्वे ! !
पूजनिं गुरुचरणस्मृतिच्या तया, अणी
पांडित्याच्याहि तुझ्या, पंडिताग्रणे !
एक पान तुळसीचें तेंवि सादरें
तुजसि समर्पित हो उपहार लेश हा !
श्रीमंतस्वयमेवाचि पेशवे प्रभू

धाडिति ही शालजोडि–हिंदुतेत्रिया
मानाचें पान म्हणुनि—पांघरा हिला ! ! ”
 सकल सभा जयजयकारांसि करोनी
सत्कारी त्या उभयां. धारकरी ही.—
परि पाटिल त्या समया लाजला जरा
वदला ‘ हा मान असे वीरवराचा
त्याची : कीं जो मज तैं यौवनोद्गमीं
दीक्षा दे देशस्वातंत्र्यरणाची :
तारापुरवरच्या हल्ल्यांत आणि जो
रणमुखींच लढत देशसंगरीं पडे ! ’

मंत्र तेंवि विप्रहि सश्रद्ध साश्रु तो
‘ तस्मै श्रीगुरवेदं ! न मम ! ’ बोलतो
हस्तें अत्तर, गुलाब, पानविड्यांसी
दे मानें राजमुख्य उभयतां तया.
खंडित तद्वाक् मग घे चालना पुन्हां
“ राष्ट्रास्तव झटल्यांच्या उपकृतिप्रति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र.
विभाग
क्रमांक

विसरें जें राष्ट्र न कीं, त्यांस कधींही
तोटा पडणार संकटांत आम्ही
राष्ट्रास्तव झटत्यांचा आजही सभा
त्या कर्तव्यासि करा अंशतः तरी,

सत्कारुनि हार्दिकतः वीर हतांच्या
आणि वर्तमानांच्या जनिक उपकृती.
परि बांधवहो, हिंदु स्वत्व आणखी
हिंदु राज्य जें आजी फळफुलावलें
तें न हतांच्या न जिवंतांचियाहि त्या
शोणितजलसिंचनेंचि मात्र; परंतु
वृक्ष पोषणासी तो घेत येतसे
मातींतुनि संसाराच्याहि तयांच्या:—
जे तुमचे धर्मबंधु दुष्ट शत्रुनें
हिसडुनिया नेले कीं पाडसें जशीं

ने कळपांतूनी हिसडोनि लांडगा !
संसारचि ज्यांच्या मातींत मिळोनि
ती माती खत झाली या तरूप्रती
ज्यांच्या छायेंत आज विगतभी उभी
हिंदुश्री शीतलांग हसतसे मुदें
—त्यांची आम्हास काय आठवण असे ?
ज्या अबला सुंदर, जीं कोंवळीं मुलें
निस्सहाय बांधव जे आपले तईं

म्लेच्छांनीं नेले हिसडोनि जितेची;
धर्मपथावरुनि बलात् पाप रौरवीं

ढकलुनि ज्या दिधलें; ज्या स्वजन अंतरें;
विकले जे जाताती देशविदेशी
बाजारांतूनि कसायासि पशु तसे;
तुच्छ तेंचि चरण शिरावरति हाय हा
धरणें ज्या प्राप्त होय; जीवभार ज्या :
बंधूंचे, हिंदूनों! दुःख आजही
अहह जसेंचे तसेंच असह त्या असे !!
परदास्यांतुनि आम्हीं मुक्त होउनी
चोरांच्या हातांतुनि पैतृका गृहा
सोडविलें पैतृकवैरासि उगवुनी :

परि येतांची पैतृक धन करांमधें
त्या पतिता हीन दीन बांधवांप्रती
मात्र पळहि न प्रवेश त्या गृहीं मिळे !
म्लेंच्छगृहीं पापबलात् वा छलात् जयां
करणें हें अपरिहार्य जाहलें, तयां
जातिशत्रुनीं तुमच्या समयि जेंविं त्या
तेंवि आज तुह्मीही निस्त्रपें हृदें
करणें ना मज्जावचि पैतृकीं गृहीं ?
निवसूं आम्हांत झुरे जीव जयांचा
त्या सख्या भावांबहिणीस आपुल्या

उघडूं आम्ही न दार ! आणि हंत ! हा !
—हा ज्ञातिद्रोह, धर्मघात हा असा,
हेंचि धर्मतत्व म्हणुनि मिरवितो जगीं!
ज्ञाति—कलंकाची ह्या लाज धरोनी
त्या विधर्ममकरग्रस्तां स्वबांधवां
युद्ध करुनि शुद्ध करुनि, सोडवुनि पुन्हां
पितृगेहिं आणालचि, बंधु बंधुनां
भेटवाल, भेटवाल हिंदु हिंदुनां,
ही आशा मजसि असे! ही उतावळी !
पुण्यतिथि ठरेल पुण्यतिथिच ही जरी

पुण्यकार्य हें संपादील सभा ही !
बोलावें : विप्रवर्य! कवण निर्णया
धर्मशास्त्र—विद्‌द्विजवर--मंडळें दिलें :
शुद्धिकार्य कार्य वा अकार्य भासलें. ”
राजमुख्य गौरवुनी कथित हें बसे.
मानुनि ती मुख्याज्ञा विप्रवर्य तो
गुरुसुतही उठला : क्षण ईक्षि सर्वतः
अखिल--सभा--हृद्गत कीं आकलुनि तसें
मग निर्झर निर्मल कीं शुद्धबुद्धिचा
तेंवि उगम घे तद्वाग्गौघ गौरवें :

“हे श्रीमन् राजमुख्य, आणि सभ्य हो!
म्लेंच्छीकृतपतितपरावर्तनाप्रती

धर्मशास्त्र संमति दे वा नः निर्णया
करण्यास्तव त्या आपण शास्त्रविद्वरा
सह मजही आज्ञा केलीत मागती.
तदनुरूप आम्ही ती नव विचारणा
शास्त्रयुक्तिसह सांगोपांग करोनी
स्थिरव्यवस्थिति केली जी सुसंमता,
आज्ञापित मी त्या द्विजवर्यमंडळें
ज्ञातिसभेसी ती या करुं निवेदना.

कथिणें ना शक्य इथें ती विचारणा
साग्र जरी तरि सारांशासि तियेच्या
मुख्य विधेयांसह मी प्रतिनिवेदितों,—
याचुनिया प्रथमाचि दाक्षिण्य आपुलें !
धारणाद्धि धर्म इति प्रमुख लक्षणें,
जो प्रजांसि उद्धारिल, अभ्युदयातें
नेइल जो जीवासी धर्म तो ठरे.
धर्माचें हें स्वरूप निश्चितांच कीं
न्यायेंची हेंही निष्पन्न होतसे
कीं समाजधारण जो करिल, जातिच्या

अभ्युदया कारण जो होत, होतसे
देशकालतः समाजधर्म तोच कीं.
धर्माचें द्विविधत्वहि एतदर्थची
स्वास्थ्यकालतः, आपत्कालतः, असें—

सर्वस्मृतिसंमत हें. भिन्न अवस्था---
आवश्यकता--योगें कृत्य एकची
कैं मारक कैं तारक होतसे क्रमें
स्वस्थकालधर्मीं जी विहित तीच कीं
' स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते महाभये
संग्रामे, यात्रायां देशविप्लवे,

ग्राम नगरदाहे वा ' ह्याच हेतुनें
धर्माचें हें स्वरूप स्वरूप दृष्टिच्या पुढें
धरितां आम्हांसि मुख्य एकची दिसे
प्रश्न विचारार्ह येथ : पतित जनांची
शुद्धि समाजाचें हित ? वा बहिष्कृति ?
हितकारक अभ्युदयप्रवण कीं जरी
पतितपरावर्तनची,—धर्म्य ही तरी.

जातिसंघ वा समाज जो प्रबुद्ध तो
अनुरोधानें कवणां तरि विशिष्टशा
कार्याच्या–साध्याच्या–संगटना घे.

तदनुरूप रचुनी निजदंड[1]काप्रती
व्यक्तिशः तो समाज आचरी तया
परिकवणा तें जीवन–साध्य वाटुनी
अपुरेंसें वा असह्य : वा स्वजातिचें

१ दंडक a law, regulation कायदा.

ते दंडक अकरणीय वा न रुचेसें,
जरि तो जन वांच्छि करूं त्यागची तया
निजसमाज संघाचा : तरि अशा स्थलीं
दोन मार्गची उरती जातितें तया :
एक : बळें करुनी त्या व्यक्तीतें सदा,
देहान्तापर्यंतहि दंड देउनी

देणें ना जातित्यागासि करूंची,
जातिनियम वा भंगूं व्यक्तिहेतुतः
दुसरा : अप्रीत तया व्यक्तिते न जो
माने संबंध तया आपण स्वयें
सोडुनिया देणें; निज जातितुनि तया
व्यक्तीतें, गणुनि बहिर्भूत तीप्रती
सत्य गमे तें देणें आचरूं सुखें :
आणि सुखें आपणही आचरिणें जें
आपणांसि सत्य गमे. उभयपथीं ह्या
आसुर तो पहिला : तो आर्य जो दुजा.

आर्यपथा ह्याचि बहिष्कृति जगत् वदे.
आणि बहिष्कृतिचा हा आर्य मार्गची
जातिव्यक्तीस अशा काठिण प्रसंगीं
हित—म्हणुनिच विहित असे. सत्यशोधनीं,
आत्मविकासार्थहि, वा व्यष्टिचें जसें
स्वत्व समष्टीचें तैसेंचि रक्षण्या,

जातिबलात्काराहुनि शतगुणें असे
जाति बहिष्कारचि पथ भूतहिताचा.
सामाजिक धर्माचें तत्त्व आणखी
अर्थ बहिष्काराचा निश्चयुनि असा

आम्हि बघूं प्रस्तुतचा प्रश्न तों अहा
पतितपरावर्तनीय शुद्धिवाद हा
शुद्ध वितंडाच मात्र भासुं लागली !
खलदलबलशक्तिनें विधर्मदस्यु ज्या
पळवुनि ने; त्यासी निज जातितुनि करूं
प्रथम बहिष्कृतची अधिकार ना कुणा !
जातिध्येयासि, जातिदंडकासि वा
ज्यांनीं ना स्वेच्छेनें भंगिलें कधीं;
निजधर्मत्यागस्वप्नींही ज्यांप्रती
रुचला ना हार्दिकतः;—धर्मतः असे

अधिकारचि त्याचा पितृमातृदत्त हा
निवसूं हिंदूंत : हिंदुधर्म आचरूं
तुमचें हें पूर्वार्जित गेह तसेंची
आहे तें त्यांचेंही कोण त्या तुम्हीं
दार लाविते ? वा घेणार आंतही ?
वाट मारित्यांनीं सर्वस्व हरुनिया
निबिड अरण्यीं सुदूर टाकुनि दिलें
ज्या, सुत तो मातेचा भाग्यतः जरी

धुंडित पोचेल गृहा; तरि तयाप्रती
आलिंगुनि, हुंगुनि, कुरवाळुनी पुन्हां

अंकावरी जननी घेईल : कां दुरी
ढकलुनि देईल वरें ? राक्षसांतही
जननी ना ऐशी जी त्या क्षणीं अशा
निज अपापतनयासी पतित म्हणुनिया
ढकलुनि देईल दुरी रुक्षचक्षुनीं ! !
जातिजननि ! परि तूं गंभीरपणानें
पापहि ना तेथें पतितत्व कल्पुनी.
शुद्धीचा, जे अबहिष्कार्य तयांच्या,
पाहत शास्त्रार्थ शिलानिष्ठुरें हृदें
बसलीशी दार बंद करुनि हृदाचें !—.

जों ते तव चिरविरहित तनय हाय हा
अप्रतिष्ठ छिन्नाभ्रासम इतस्ततः
निर्दय दुर्दैववादळांत भटकती
बाजारा–बाजारांतूनि जगाच्या ! !
शत्रूंच्या दाराविण भीकही न ह्या
मागाया स्थल दुसरें ! भाउबहिणी
झिडकारिति त्यांस इथें;—आणि तिथे ज्या
भाउबहिणी होण्या झटति, त्या मना
सर्पसर्पिणीसम गमती भयंकरा !
रात्री विहिरींत कुणि अविंध चोरुनी

फेंकितसे अन्न लेशभरि अभक्ष्यसें:—
मद्याचा थेंब एक, पावं गव्हाचा.
उगवतांच गांवांतिल शतकुमारिका.
हास्यमुखीं येति भरूं जल सुवासिनी
कटि कळशा स्वच्छ, शिरीं ते सुरेखसे
घेत घडे जळ भरुनी, आपुल्या घरा
गेल्या तान्हेसि हरूं प्रियजनांचिया.
स्नान, दान, देवार्चन भिन्नगृहविधी
पाक, तृषाहरण, त्या जनीं घरोघरीं
जन लागे साधूं निःशंक हृदानें:—

तों सहसा आरोळा उठत चहुकडे :
भ्रष्ट जलाशय ! जलही–! पाव सांपडे !
तो अविंधची येउनि दुष्ट कर्म तें
निर्भय निज सांगे लोकांत हंसोनी !
प्याला जो जल अजाण–जाणपणें वा
भ्रष्ट सर्व तो–ती–तें ! कठिण निवडणें
कोण कोण प्याले जल ?—सिद्धची तरी
प्याले जल अवघे शास्त्रार्थ कीं त्यजेत्
‘ ग्रामं जनपदहिताय ’ ! पतित ग्रामची !
झालें : त्या हास्यमुखी शतकुमारिका,

त्या सुवासिनी—हिंदवि देवता तशा:—
प्रियजन ते त्यांचे : ते पितर वृद्धही :

देवार्चन करितांची गांव अखिल ते
दैत्यार्चक म्हणुनि जातिबाह्य ठरतसे ! ! !
प्रहसनींहि जी लज्जास्पद गमेलची
बालिश ही कृति होई धर्मविधि इथें !
इतुका अन्यत्र कधीं जातिच्या कुण्या
भ्रंश बुद्धिसी झाला जगतिं नसावा !
' जनहिताय ? ' ना ! दारुणजनपदाहिता !
कीं हिंदूनों, तुमच्या—आणि ज्या निजा

बंधूंची तुम्ही अवहेलना करा
त्यांचा—संबंध असा करकचूनिया
एकत्रित कर्मानें बांधिला असे :
कीं जितुके 'पतित! पतित!!' म्हणुनिया तुम्ही
बुडवा त्या खोल खोल दुःखसागरीं
खोल खोल बुडवीले जातसां तसे
तुम्हींहि भारें अवहेलितांचिया ! !
ही पिढी तया अपापबंधुजनांची
झुरत तुम्हांस्तव, तुमच्या अंगणाकडे
दुरुनि बघत जैं मरेल, तै तुम्हांप्रती

भीषण तें अहितमूर्त येइलचि दिसूं !
कारण या एकेका धिक्कृता जना
प्रति होइल संतति अहिंदु गृहीं जी
ती पालित लालित शत्रूंत होउनी

परची ते पितर असें मानिणार कीं :
धर्म तयाचा स्वधर्म, शत्रु तयांचे
ते स्वजातिशत्रु, अशी घोर भावना
आजन्मचि वर्धित होउनि त्यांत, ते
हिंदूंसी आमूलात् नष्ट कराया
झटतिलची आपणां अहिंदु समजुनी

जों पिढीवरी पिढी चढेल तयांचीं
तों तों ते शत्रूहुनि शत्रु जातिचे
हिंदूनों ! तुमच्या होतील निश्चयें
पितृगेहीं यावयासि असुनि सिद्ध हा
दूर करा बलपूर्वक आढ्यतावशें
एक एक बंधु भागिनि पतित म्हणुनि जी :
तीपासुनि दुष्ट दहा शीघ्र उपजुनी
म्लेंच्छांची जाति पुष्ट करित, आपल्या
जातींचें शोषितील रक्त निश्चयें !
पुत्र बळी देउनिया व्याघ्र पाळिते

माता जी आज; तिला तेंच रक्त कीं
पीत पुष्ट होउनि तो व्याघ्र फाडुनी
शीघ्रचि खाईल !—आणि बुद्धिहता ते
देहान्त प्रायश्चितासि पात्रची ! !
तीन जाति या जगतीं चिरबहिष्कृती
धर्मविहित मानिताति : हिंदु : यहूदी :

आणि पारसिक पुराण :—याच तिन्हींच्या
मांसाचे लचके तोडूनि सहजचि
दुष्ट होउं शकला इसलाम विशेषें
तेंच जिथें ईसायी पंथ ये पुढें

तेथें ना इस्लामी वंश वाढ घे.
कारण जरि सबळ दिनी भ्रष्टविती हे :
तरि ख्रिस्ती बळ होतां, तेहि त्यां गतां
पतित बंधुसीच न परि त्या महंमदी
बळमत्तांही खिस्ती करिती बळमर्दे.
स्पेन पोर्तुगाला इसलाम बळानें
बहुश: इसलामी पंथांत ने खरा :
परि आजी त्या अखिला उभयभूंतही
हातावरि मोजुं मुसलमान ना उरे !
ख्रिस्त--विजय होतांची, पूर्वनिश्चिता—

एका दिवसांत. अहो, ख्रिस्तशरण घे
लक्ष मुसलमान ! न तरि जाय मारिला—
देश--पार वा केला ! ! जिंकि बल बला ! !
आणि बलात्कारीं अहमहमिका अशी
करत्या त्या दोन्हींहि दैत्यगदांची
धाड आजि हिंदूनो बघतसा न कां—
सहसाची कोसळली आपणांवरी !
दुष्टापत्तींत अशा सत्ययुगाचे

शांतिपाठ हे होतिल आत्मघातकी !
छे ! छे ! हा घोर कली ! हिंस्र आपदा !

—कलियुगीन आपद्धर्मांचि हणा ही !
दूषां म्लेच्छांसि तुम्हीं कीं दुज्याप्रती
धर्मबलात्कार करुनि बाटविती ते :
परि न बलात्कार करी भ्रष्ट जनांसी
पूर्ण तेंवि जेंवि बहिष्कार हा करी.
देहबलात्कारें ते जिंकिती: तुम्हीं
मनचि बहिष्कारें जिंकूनि रिपुकरीं
अर्पा त्या पतितांचे ! शत्रु तुम्हींची
तुमचे त्यांहूनि असा ! भारतामधें
मुसलमान आले किति ?—आज ते किती ?

येतां देशांत अल्पसंख्य ते, जयां
प्रथम बलात्कारें हिसडूनि पळविती
—त्या कांहीं पाताळीं पाठवितीना :
येथेंची ते होते; शतशतांवरी
गुप्तपणें आचरीत हिंदुधर्महीं :
त्यांसि जरी तुम्हींही संधि साधुनी
जातां कीं हिंदु करुनि घेत मागती
तरि आजी कोट्यवधी मुसलमान जो
उपसुनि तरवार कंठ कांपण्या उभा—
तो लक्षावधिही ना पावता भरूं ! !

बल आहे तोंच बलात्कार कीं टिके :
बल गेलें शतदां तें:—कां न मागतें
कोट्यवधी आले हिंदूंत हिंदु ते ?
स्वेच्छेनें रिपुशिबिरीं राहिले ! न ते :
आचरिते हिंदुधर्म गुप्त तरी ना.
आले ना: कारण पहिल्याच पिढ्यांसी,
जातिजननि, तूं बळेंच येउं दिलें ना.
साधिं न जें शस्त्र–बहिष्कार हा तुझा ! !
 द्रव्य तुझें परतस्कर दांडगाइनें
कोटींही : लुटितां तूं मात्र त्यांतला

रूप्यक तो जो जो पर शिवतसे तया
भ्रष्ट म्हणुनि घेशि न–मिळतांहि पुनरपि !—
पुण्यप्रद तेंचि गणुनि : हायरे तरी
मूर्ख वणिक्वर्या ! तूं, निघुनि दिवाळें,
अन्न अन्न करुनि मरत जोडिशीलची.
पाप आत्महत्त्येचें मात्र निश्चयें !
 लढत्या शत्रूंसि एक तीक्ष्ण शस्त्र कीं
प्रत्येकीं राज्यांतिल शस्त्रकार हो,
देत नित्य नियमें जा ! : म्हणुनि सोडितां
स्वेच्छेनें राजाज्ञा कां कुणीं कधीं

पाहियला राजाही ? जरि नसे तरी
येथें या : या हिंदुस्थानच्या असे

आश्चर्यागारीं आश्चर्य हेंहि कीं !
मलयीं नृप हिंदूंचा शिष्टसंमतें
आज्ञापी हिंदूंतिल एक—जातितें
प्रत्येकीं एक एक पुत्र अर्पिण्या
मुस्लीमा स्वेच्छेनें ! कां ? तरी तशी
सामुद्रिक वाणिज्यीं वृद्धि घडावी ! !
हिंदुशास्त्र ना समुद्रगमन मानितें :
हिंदुशास्त्र निजकन्यातनय परंतु

विकण्यासी म्लेंच्छांना लव ने लाजतें:—
वेश्येसम रुपड्यांसी अधिक अर्जिण्या ! ! !
पढतमूर्ख हो ! अत्युत्कट निदारुणा
बुध्यंधत्वाचा या कटु विपाक कीं
प्रत्यक्षचि अनुभवाल शीघ्र, या जगीं !
शुष्क कंठ होई : ये कंप शरीरीं :
कथुं अंतर्गत भयासि !—घोर भाविष्या !
हिंदूंच्या या बीजांतूनिची पुढें
क्रूर शत्रु हिंदूचे उपजतील ते :
जातिगोत्र मायबाप कोण आपले

विसरोनी, ते राक्षससम महा—पिले
' मान्य पुत्र ' हे हिंदूचेचि कीं अहा

---

१ मापले-महा-पिल्ले-मोठीं मानाचीं मुलें हा या शब्दाचा मूळ अर्थ आहे.

हिंदूचे कापितील कंठ चराचराः
गाईच्या रक्तें भिजवीत मंदिरा
भ्रष्टवितिल हिंदुबालबालिका बळें :
उच्छेदूं हिंदुधर्मः—करुं यथारुची
मलयभूमिची अखंडशी मशीदची ! ! !
एतदर्थ पूर्वोध्दृत धर्मलक्षणें,
शास्त्रबहिष्काराचि जो आपला असा
नाशासी घातासी हिंदुजातिच्या

शस्त्रबलात्काराहुनि घोर रिपूंच्या
करित असे, करणाराचि;—तो न शकतची
हिंदुसमाजस्वधर्म व्हावयाप्रती !
कीं धारक तो धर्म : न जो मारकही तो !
एतदर्थ ज्यां बलात् विधर्म रीतितें
अनुसरणें दैहिकतः मात्र पडतसे
ते न बहिष्कार्य : न ते हिंदुबाह्यची.
केवळ जे भक्ष्याभक्ष्यादिदोषतः
पापबलात् घडवीती तत्करें रिपू
त्यास्तवची आपद्धर्मीय अंशतः

प्रायश्चित्तासि नाममात्र पात्र ते
होउंत—होणेंचि तरी. पाव दूषिति
जरि जलाशयासि तरी जळचरांचिया
मूत्रमलोत्सर्गे तीर्थेंहि दुष्टची !

तीर्थमृता सडक्या दर्दूर मूषका—
—हूनि पूति पर्युषित न पाव निश्चयें !
सांडवणींतुनि नैवेद्यावरी सदा
मक्षिकांसि वसतां, निरुपाय म्हणोनी,
अनुदिन जे सद्यःशौचासि मानितो :
त्या आम्हां म्लेंच्छबलात्कारकारिता

स्पृष्टास्पृष्टींत हीन बांधवाप्रती
“ सद्यःशौचा :”चि गणूं मात्र कां घृणा !
अल्पदोष परिहारीं रूढची अशां
जीं प्रायःश्चित्तें : पर्याप्त तीं इथें.
मृदुना वा दारुणेन कर्मणा खलु
आत्मानं राष्ट्रविपद्युद्धरेदिति
आपद्धर्मीया स्मृति शास्त्रसंमतिः
बहुत हिंदु बांधव जे आज पुनरपि
हिंदूच्या पितृगेहीं सिद्ध यावया
ते अशाचि असुरबलात्कारपातितीं

वर्गीं येताति जरी : तरि असेहि कीं
असती जन जे गेले हेतुतः तदा
रिपुशिबिरीं सत्य तोचि धर्म समजुनी,
लोभें वा, मौर्ख्यें वा, क्षणिक बुद्धिनें.
त्यांच्यावरि मात्र बहिष्कार युक्तची :
—परि तोंवरि : कीं पश्चात्ताप जों तया

कृतकर्माचा ह्रदयीं दग्ध करी ना.
परि पिढींत या किंवा अन्य तत्कुलीं,
ज्या क्षणीं शिरांत हिंदु दूध तयांच्या
उसळुनिया ठोठावित दार ह्रदाचें :

" चल गेहीं आईच्या चल गृहाप्रती ! '
धरणें कीं धरिल असें झुरणि लागुनी;
तैं पश्चात्तापेंची अर्धशुद्ध ते.
भिक्षा जरि दारीं येऊनि मागती
' घे पुनरपि पदरीं तूं ! भीक घाल या
जातिजननि, चुकलेल्या अर्भकांप्रती
प्रेमाची पुनरपि तव ' ! ! तरि तयांसही
स्वीकरिणें धर्म्य : परी शुद्ध करोनी.
शुद्धिदंड तत्कृत निजजातिविरोधा
अनुरूपाचि निश्चेय प्रखर वा मृदू.

धर्माचें तत्व युक्तिश : विवंचुनी
निश्चित ही केली जी सुव्यवस्थिती
तिज ऐतिह्यादिकही इतर उपांगें
शास्त्राचीं पोषकची असति निश्चयें.
वास्तवत: आपत्ती ज्या अपूर्वशा
परिहारीं त्यांच्या ऐतिह्य—वचन—वा
पूर्वसदाचारींहि न मार्ग मृग्यची
जोंवरी ह्या तेजस्वी भारताकडे

वक्रदृष्टिपातहि करण्यासि धजूं कीं
शकत जगीं होता ना शत्रु एकही :

तोंवरतीं म्लेंच्छबलात्कारपातिता
शुद्ध करायाचा हा प्रश्नची मुळीं
नव्हता संभाव्य त्या वलिष्ठसमाजीं !
दुर्बलांत ही चर्चा संभवते : ना
शक्ति—भूति शाली त्या पूर्वजांतही ! !
तदनंतर दौर्बल्यें भारताप्रती
ज्या क्षणीं पछायडिलें, ज्या क्षणीं रिपू
शक बर्बर हूणादी प्रबल जाहले,
त्या क्षणीं विधर्महस्तपतितशुद्धिचा
प्रश्न उठे प्रथमाचि : तै " सा विधीयते

शुद्धिरिति " स्मार्त देवलोक्तिबलानें
पतित पूत केलेची हेंचि ना परी
भागवतीं, ऐतिह्यीं आणि, उक्त कीं
यवन पुलिंदादि म्लेंच्छांसाहि तया
विष्णुचरणिं रिघतां ते शरणभक्तिनें
संग्रहार्ह विष्णुपूजकांत मानिले.
आणि हेंचि युक्त : जरी कवण विजाती
आत्म्यासी सत्यप्रद हिंदुधर्मची
भासे : तरि त्यासी मज्जाव जो करी
सत्याचा अपलापचि तो करीतसे !

जी दैवी संपत् हे हिंदुनों, जगद्
धर्माची सत्य सनातन तुम्हां करीं :
ती मानवजातिहिता !—न स्वजातिच्या
स्वार्थास्तव, कार्पण्या, अपरवार्थ वा
अस्मत्कर्तव्य असे वेदविधींचा
आचारचि ना : परंतु सुप्रचारही :
सत्यरक्षणासहची : सत्यदानही !
ज्ञातिसभ्य हो ! श्रीमान् राजमुख्य हो ! :
हें निश्चित मत, सदुक्त ही व्यवस्थिती
केली प्रतिवेदित संक्षेपतः असे
भवन्नियुक्तशास्त्रविद्विचारमंडळें.
कोणीही, स्वेच्छेनें, हिंदुजातिच्या
चरणिं शरण येउनिया दिव्य अन्न तें
याचिल जरि आत्म्याची भूक भवार्ता
भागविण्या, तरि शरणागत गृहागता
—हो प्रत्यागतचि : नवागत अहिंदु वा :—
परि त्यासी आपलें म्हणूनि आपल्या
दिव्यनिधीचा अंशक कल्पिणेंचि कीं
तो प्रत्यागत असेल : तरि तया स्थिति
शुद्धोत्तर देया तत्पूर्वजातिची.
श्रीशिवेंहि, शिष्टमतें जैं वजाविलें
पुनर्हिंदुसंस्करणें पूत करविलें

१ अपरवः—संपत्तीच्या स्वामित्वाबद्दल विवाद.

तइं पूर्वज्ञात्यंतर्भूतची तया
गणुनी तत्पुत्रा निज अर्पिली सुता
राजपुतीं जातीचा गर्व कोण तो !
परि सुंदर इंद्रकुमारीसि मागुती,
म्लेंच्छभुक्तशय्येवरुनींहि आणुनी;
जोधपुरीं जैं हिंदीकरण करविलें :
राजपुतेसी तैं त्या राजपुतींची
हिंदुसमाजें केली स्थापितां पुन्हां.

होय नवागत : तरि वा हिंदुसमाजीं
जाति नवा संघटिणें तत्समीं जनीं.
देवो तो श्रीश तुम्हां धैर्य कार्य हें
पूर्ण करायासी : जें कार्य याचि कीं
भार्गवीय रानांतिल त्या सरोवरीं,
पूज्य पूर्वजीं केले धैर्य धरोनी !
या रानीं हिंडत जैं सिंहसे वळी
पुर्तुगीज धरुनि हिंदु बालबालिका
होते कीं भ्रष्ट करित हाय हजारों
तैं हिंदविदौर्बल्योद्भूत तामसी

दक्षिणायनींहि तया, विप्र विगतभी
निजधैर्याच्याचि मुहूर्तावरी स्वयें
—या सरोवरींच, बलात् पातितां तयां
पुनर्हिंदुसंस्कारें पूत करोनी

आलेची घेत परत हिंदुसमाजीं !
धैर्यास्तव त्या दिधला प्राणदंडही
कित्येकीं रिपुसि : परि न कार्य खंडिलें
दाक्षिणायनीय तमीं धैर्य पूर्वजें
केलें ह्या भार्गवींच गुप्तपणें जें
आजी तें करणें ना कठिण निश्चयें

ह्या स्वराज्यसूर्याच्या उत्तरायणीं :
सुप्रकाश : त्या छातीवरति रिपूंच्या !
ज्या श्रीशें उच्छेदूं बाह्य शत्रुंसी
अर्पियलें शक्ति–धैर्य भारतासि या :
अर्पो तो बुद्धिधैर्यही तसेंच कीं
अंतर्कुविकार शत्रु हे वधावया ! ! ”
वदत असे वाग्मीवर विप्र तो बसे.
“ साधु ! साधु ! ” शब्द उठत एकमुखानें
त्या सहस्रजनमंडित मंडपांतुनी !
उठति महामान्य राजमुख्य मग पुन्हां :

हिंदूनों ! बंधूनो ! ! आज माझिया
आनंदा पार नसे, परिसुनी अशी
शास्त्रविनिश्चितिही, ही लोकसंमती.
पतितपरावर्तन हें एवढें जरी
वैध गणूं आम्ही सर्वत्र यापुढें
तरि समजा झाली तरवार आजची

बोथट या म्लेंच्छांच्या धर्मछलांची !
उक्ति पुरे तरि—आतां कृति करूं चला !
परवाची हें मंगलकार्य मुहूर्तें
सिद्ध करूं या सारे ! सर्व पतित जे

पाचारित बंधू यात्रेसि पातले—
सर्वांचि ते यज्ञाग्निसि साक्ष ठेवुनी
पुनरपि प्रवेश कीं करोत हिंदवी
देवालयिं देवादृत या सनातना !! ”
त्याच सनातन शब्दा उचलुनी सभा
ती प्रचंड गर्जुनिया जयजया उठे :
धर्मसनातनकी जय ! जय सनातनी
धर्माची धन्य धन्य !! कंठसहस्त्रीं
ध्वनि तो शतगुणित होत मंडपांतुनी
ये पटांगणांत : पटांगणिं उभ्या तया

पाचारित पतितांच्या झुंडिच्यावरी
झुंडी तों तेचि शब्द झेलुनी महा—
गर्ज करिति एकाचि : जय हिंदु धर्मकी ! :
धर्मसनातनकी जय ! : जय पुराणकी !!
जयजयकारांत त्याच घे विसर्जना
जनिक सभा ती औत्सुक्यें प्रतीक्षती
शुद्धि समारंभाची निश्चिता तिथि
दिवस धन्य परवाचा उगवतो कधीं !

तिकडे, समयासि त्याच, पथ पुण्याहुनी
जो ये ग्रामासि तया, त्या पथेंचि कीं

एकाकी स्वार एक धीरवीरसा
होता सोत्साह येत भार्गवाप्रती.
वेग शिथिल तुरगाचा करित ना मुळीं
मांडीचा नीट, धीट, एकसारखा
रात्रिभरी आक्रमीत पथ तसाच तो
स्वार तरुण–भव्य शिवे भार्गवाचिया
पोचला प्रभातकाल जों नये पुरा.
नीट पथें तैसाची राजमुख्य ज्या
स्थलिं देती तळ तेथें पोचला जवें.
भेट राजमुख्यांची लाभतांच दे

करिं मुद्रांकित पत्रा राजकीयशा
काय वृत्त जें असेल तें असो तशा
पत्रीं अति हर्षद : परि राज्यमुख्य त्या
वाचितांचि सत्वर उत्फुल्ल मानसें
दुर्गपासि[1] पाचारुनि सांगती : झणीं
सरबत्ती तोफांसी देउनी करा
राष्ट्रजयाची हर्षद जानिक घोषणा !
धडड ! धडड ! धडड ! सुटति बार सुक्रमें

१ दुर्गप—किल्लेदार.

तोफांचे बारामागूनि धडकत्या ! !
आश्चर्यें चमकुनी तो जन गृहीं गृहीं

उठत पुसे शेजाऱ्या : काय ? कां तरी ?
तोंचि मांगलिक वाद्यध्वनिहि घोषला
सैनिक जयजयकारासह निनादुनी :
हर्षदची वृत्त तरी ! कवण परंतु ?
एक वदे अर्काटा घेतलें : दुजा
वदत, न, हें दिल्लीचें वृत्त असावें
वा निजामचि सहसा धरुनि बुडविला ?
तर्कें शत त्या यात्रेंतील हजारों
व्याकुल तो जन अंतीं लोटुं लागला
राजमुखांच्या तळाकडेच सारखा

तों गुणगुण झाली कीं उत्तरेकडे
विजय थोर दादांनीं मिळविला असे.
भालदार, चोपदार, त्या जनांप्रती
बसवुनिया नीट सिद्ध करिती विशिष्टा
लोकसभेप्रति सत्वर : तों क्रमें जमूं
मानकरी, पंडित, सरदार लागले.
अंतीं त्या भव्य–तरुण पाहुण्याप्रती
संगतिं घेऊनि राजमुख्य पातले
सिंधु[१]–मुख्यही आले; जन उतावळे.
उठति राजमुख्य : वदति : " सिंधुमुख्य हो :

---

१ सिंधु—मुख्य=सुभा आरमार chief of the admiralty.

मानकरी, सरदार, ज्ञातिसभ्य हो :
अखिल मराठे हो; हे हिंदुमात्र हो :
आजि पहाटे येती राजदूत हे—
वीर आणि विद्वान्, कवि आणखी कृती,
स्नेही श्रीमंताचे जे स्वत : ! स्वत :—
त्यानींहि दौत्य स्वीकार करावें
ज्या महान वृत्तास्तव, त्या निवेदित्या
श्रीमंतप्रहितपत्रिकेसि घेउनी
ऐक महाराष्ट्रा तें वृत्त : ऐक कीं
आज महाराष्ट्रध्वज रोविला असे

अटकेवरि वीरांनीं आपल्या पुन्हां ! ! ! ”
त्यासरशी लोकसिंधु सिंधुसारिखा
हेलावत झंजाहर्षांत गर्जे ग्रे
हर हर हर महादेव ! जय भवानिकी !
शिंगें, रणढोल, कुणी उंच तुतारे,
वाजविती टाळ्या, वा फुंकिती शिट्या,
धडड धडड तोफांचे बारही क्रमें
होतेची होत मधुनि मधुन धडकते;
ज्या जैसी स्फूर्ति होय त्याच रीतिनें
जन प्रदर्शवीती राष्ट्रीयहर्ष तो :

थोरांचे नेत्रींही आंसवें : गळे
बहु गंभीरांचेही येति दाटुनी :

राजमुख्य तो होउनि वाग्मस्तुती
जानिक भावनावेगें शब्दही पुरे
बोलूं ना शकले इतुकेंच बोलुनी
" राजदूतची हे यापुढति उचितें तें
तुम्हासी कथितील ! प्रेय काय जें
श्रेय काय तें ही ! कीं मूकभावना
राष्ट्राच्या सूक्तविती राष्ट्रकवीची !!"
तेव्हां तो भव्य तरुण पुरुषवर्य घे

उत्थाना धीरपणें : क्षण उभ्या उभ्या
आलोकी जानपदा : जानपदाहि जों
अवलोकित ती संहततनुबलान्विता;
चिंतेसी राष्ट्राच्या अखिल कुण्या कीं
धारणार्थचि निर्मित तेंवि तयाचें
प्रतिभोज्ज्वल भाल; आणि धीर आकृती
मग अवनत शीर्ष सभे सभ्यवंदना
करुनी तो वदत : ' अपात्राहि तरी मला
मुख्याज्ञा होय शिरोधार्यची : परी
उत्तरेकडूनि नसे अजुनिही पुरा

विस्तृत वृत्तांत पुण्यासीहि पोंचला
विजयाचा ह्या अद्भुत म्हणुनियां मला
जिज्ञासा तुमची ना येत पुरवितां.
तत्रापि प्रथमाचि हें वृत्त पारसितां

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
विषय ........
क्रमांक, ........
ना. दि. ........

भावना-विचार-भीति-खचित गीत जें
हर्षप्लुत चित्तरसावरि तरंगलें,
हें श्रवोत सभ्य तेंचि : तेंचि अर्पितों
रानफूल राष्ट्रदेवतेचिया पदीं,
या महोत्सवीं महान, हीन पतित मीं ! !
लव स्तब्ध होय सर्व. मग उभारुनी

उच्च खड्या सुस्वरास शास्त्रसंयता,
उचित वाद्यरवसमृद्ध वीर भाट तो
गात वीरबाहूंसी स्फुरविता नवा
राष्ट्र पौरुषाचा हा सुघड पवाडा :

---

## महाराष्ट्रभाटाचें विजयगीत.

ऐका ऐका हिंदुमात्र हो: वार्ता विजयाची आल्या;
उभ्या सात शतकांचा उगवे सूड जिंकिलें जेत्याला ॥१॥
हिंस्त्र हार जी वीर दाहिरा[1] दाही तुजला तैं तीची
सह्याद्रीच्या वणव्यामाजी राख होतसे ये आजी ! ॥२॥
पळूनि जय जो जयपाळा[2] तव हाय हातिचा तैं गेला,
आज फिरुनि ये तुझ्या घरा तो घालित लोटांगण आला ३॥

---

१ दाहिर:–सिंधूचा शूर राजा मुसलमानी पहिल्या विजयी हल्ल्यांत झगडून रणी बळी पडला. २ पंजाबच्या प्रसिद्ध जयपाळानें मुसलमानांशीं लढण्यांत अपजय आल्यानें अग्निकाष्टें भक्षून देहान्त प्रायश्चित्त घेतलें.

हाय लाविली भारत–वीणा व्यासें गाया त्या समरा ॥
बंधु बंधुच्या रक्तें रंगत ज्यांत भरती जन मेला ॥४॥
हाय ! हाय! शतवार हाय हा ! भारत–वीणा वरदाई[1]
जागवि पुनरपि–परिती गाउं भारत शत्रूंच्या विजयी ॥५॥
ज्याच्या ज्याच्या कटुकर्तव्याचि दैवीं ये हे उरफाटे
हृतवीराच्या गात हताशा रासोचा[2] त्या उर फाटे ॥६॥
अश्रू परि ते, पूर्व कवी हो, हिंदवि पडत्या काळाचे
तेच फुलविती गीत आज हें हिंदवि चढत्या काळाचे ॥७॥
धन्य भाग्य मम ! आज न मजला गाणें जातिघ्नाहि रणा
अहिंदु हस्तें घडल्या किंवा घोर हिंदवी संहरणा ॥८॥
देवारींच्या देशारींच्या न्याय्य गाउनी निःपाता
धन्य भाग्य मज आदिकवींच्या भाग्यीं येउं ये वांटा ॥९॥
धन्य भाग्य ह्या गात्यांचें, तें धन्य भाग्य या श्रोत्यांचें
जयार्थ मरता लढत्यांचें, यावाचुनि विजया बघत्यांचें ॥१०॥
जय ! जयकारें भरा अंबरा; करा घरोघर महोत्सवा;
परम मांगलिक, हिंदुमात्रहो; वार्ता ये आतांचि नवाः– ११
हिंदू–वीरांचा कीं, श्रीशें असे यशस्वी हट केला
आज हिंदवी जरिपटका कीं पुन्हां पोंचला अटकेला ! १२

(२)

घडलें म्हणुनी घडलें होत न सामान्याचि वा तें सोपें;
शंकाव्याकुल महदाश्चर्यें हृदय सुखभरें थरकांपे ! ॥१३॥

---

१ बरदाई–चंदभाटाला बरदाई म्हणत– २ रासो–रजपुतांचे भाट ग्रथित इतिहासराखे इत्यादि.

स्वयंपूतही वेदर्षींनीं निज देहावरि जया जला
प्रोक्षणिं, मार्जनिं, सिंचियलें कीं भिजवुनि भिजवुनि कुशांकुरा;
पूत पावना जलांत देउनि पाय सिंधुच्या तयाच हा
शिकंदर करी कलींत त्यासी गढूळ सहसा जंई अहा! ॥१५॥
वीर भारती तीर्थरक्षणा मागधांतुनी धावत ये,
घुसले त्याहुनी शीघ्र पळविता परा मारिला घाव तयें ॥१६॥
अन्य कुणाचा असो शिकंदर; परंतु भारत–जेता ना.
अंगणही ना तयें देखिलें कवलाही ना कुणा कुणा ! ॥१७॥
राजदुकूलांचलासि किंचित् करस्पर्श ना जों केला
क्रुद्ध दृष्टिनें भारतभूच्या भस्म होउनी रिपु गेला ॥१८॥
यावरती ही परकी सेना अंगणींच ना परि पहिल्या
राजमंदिराच्याची चौकी हाणित मारित कीं घुसल्या. ॥१९॥
घुसल्या चौकीं पहिल्या; परि ना पुढें एकही पद धांवूं
आल्या तैशा परत्या किंवा जिवंत शकल्या ना जाऊं ॥२०॥
आ पसरील्या तिमिंगिलाच्या गळ्यांत मासे भराभरा
घुसती वेगें:—परंतु परतें कोण तयांतुनि जात घरा ! ॥२१॥
मर्दी यवना पुष्यमित्र त्या मर्दी विक्रम शका तसा
मर्दी हूणा यशोधर्म कीं राम रावणांप्रती जसा— ॥२२॥
जो जो मार्गे आला आसुर शक्तींच्या कीं भरावरी
भारतीय यज्ञाश्व नाचला त्याच्या त्याच्या उरावरी ॥२३॥
कुठें आज ते शक ? ते बर्बर ? बाह्लिकही ? वा हूण कुठें ?
भारत–जरठाग्नींत जळोनी भस्म जाहले द्रुत ते ते ॥२४॥

गदाप्रहारीं भारतीय तद्वत् वक्रता सरला ती ॥
होय आणि तद्बर्बरताही भारतयज्ञाग्नींत सती ! ॥२५॥
आसुर सेना सगळ्याही त्या कधी न गंगा तरल्याची
विंध्याद्री वा वलांडावया जिवंत समरीं उरल्याची ॥२६॥
हंत ! हंत ! परि पूर्वी घडलें कधींही न तें घडे कसें !
हंत ! कशी ही तुटे आमची धार बोथटे खड्ग असे ! ॥२७॥
संचित पापांची कीं अमुच्या मूर्तिमती ती प्रतिक्रिया
महंमद तसा भंगित मूर्ती, भ्रष्टवीत ये सती स्त्रिया ॥२८॥
राजमंदिराच्या कीं पहिल्या चौकीची ना परी अहा !
थेट राजसिंहासनपीठीं शत्रु नागवा नाचत हा ! ! ॥२९॥
सिंधुपासुनी हंत ! सिंधुपर्यंत हिंद भूमींत उडे
प्रथमाचि परका ध्वज अप्रातिहत ! कधींही न घडे तेंचि वडे! ३०
ध्वजची उडता, तरीही अवघड नव्हतें तितुकें : कुठें कुठें
काडीचेची राजध्वज कीं मोडति काडीसमची ते ॥३१॥
परंतु खंजीर इस्लामाचा गेला इतका खोल हृदीं
कीं जातीच्या आत्म्यासीची दुभंग करुनी ग्रुसे मधीं ॥३२॥
त्या घावानें विव्हल पाहे हिंद कोसळू पदोपदीं
उभीं सात शतकें तें सललें शल्य सारखें तिच्या हृदीं ! ।३३।
परी आज तें शल्य उपटलें आज तोडिला ध्वज तो रे
आज जिंकिली हीहि लढाई ! आजि महंमदमद उतरे ॥३४॥
चंद्रगुप्त जें पुण्यमित्र जें, विक्रम विक्रम दूर करी
शतपट दुर्घट संकट त्याहुनि निरस्त आजी श्रीश–करी ॥३५॥

समर्थ बघती रात्रींमाजी ज्याच्या नुसत्या स्वप्नाला
योग हिंदुपदपातशाहिचा आजी प्रत्यक्षचि आला ॥३६॥

सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत मिळेल तोय जयां—
होय उदंडची तोय शुद्ध करुं आज स्नानसंध्येसि तया ! ॥३७॥

घडलें म्हणुनी असें न समजा सामान्यचि वा तें सोपें
घडलें तरिहो हृदय कुशंका—व्याकुल सौख्यें थरकांपे ! ॥३८॥

जयजयकारें भरा अंबरा करा घरोघर महोत्सवा !—
मांगिलका कीं हिंदुमात्र हो ! वार्ता ये आतांचि नवा !॥३९॥

हिंदूवीरांचा कीं श्रीशें असे यशस्वी हट केला
आज हिंदवी जारिपटका कीं पुन्हा पोंचला अटकेला ! ! ! ॥४०॥

( ३ )

सामान्य न तो इतुकेंची ना, परी विजय ना हा आला
लागुनि सहसा ओझरता शुभ—दैवाचा वा फटकारा ॥४१॥

आकस्मिक ना जय हा ! किंचित् बलिदानाची आठवही
भावें दाटुनि आणिल कंठा; कशासि व्हावी पाठवही ॥४२॥

सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत हिंदभू होय जई
निर्वीरा, निर्देवा, निर्द्विज निस्सिंहासन हाय ! तंई ॥४३॥

कोनामाजीं सह्याद्रीच्या एका कांहीं तरुण गडी
घेउनि मारे गवताचे रे होते एकया चढत गडीं ॥४४॥

गोसाव्यानें एका तों ती फूक मारिली दूरवरी॥
फुंकीसरशी पेट घेतसे सह्याद्रीची दरी दरी ॥४५॥

---

१ स्वप्न—समर्थांचें स्वप्न या नांवाची त्यांची प्रसिद्ध कविता.

गवताच्या त्या काडीकाडींतुनि कीं म्यानांतूनि वरी
तशी घुसत तलवार तळपली तरुणाच्या त्या करीं करीं ४६

आणी भारे गवताचे रे घेवोनी जे तरुण गडी
होते वरती चढत—जाहले राजे तेची तया गडीं !! ॥४७॥

सह्याद्रीच्या कोनामार्जी स्वतंत्रतेची ध्वजा करीं
शूर शिवाचा संघ जिवाचा उभवूं ऐसें धाष्टर्य करी ॥४८॥

दिनापासुनी तया भूमिची तसूतसूही लढवीली
स्वतंत्रतेची ध्वजा झुंजवित गडोगडींही चढविली ॥४९॥

प्रतापगडिच्या देवीपुढतीं कसा आठवा दिला बळी
बत्तिस दांतांचा तो बोकड लुटुनी कुटुनी परोपरी ॥५०॥

चार हजारांवरी शत्रुचा घोडा धरिला त्या समरीं
पुढें रांगणा विशाळगडिची झुंज आठवा अल्प तरी ॥५१॥

बाजी पडला, पडला वीरा वीर सांवरित परोपरी;
बाजी पडला परी पडूंना दिलीच बाजी वीरवरी ॥५२॥

चाकणासि तों कणाच मोडे रिपुगर्वाचा; पडे गढी; —
नरसाळ्याचि नरसिंव्हाळी गढीहुनि दे बळा दिढी ! ॥५३॥

वर्षामागुनि वर्ष कोंकणीं सिद्दीची तरवार—सुरी
गायगरीबा चिरिती, होई बोथट राजापुरावरी ॥५४॥

षाइस्त्याच्या बंगल्यातली दंगल ती त्या तमांतली;
सिंहगडचें प्रकाशांतलें तत्स्वागत तें अनंतरीं; ॥५५॥

विजापूरचे सहा हजारावरती पडले—भूमिवरी
रणीं आणि तितुकेचि शत्रु त्या कोकण युद्धीं जलांतरीं;।५६।

आठवोनि तें पुढें आठवा सर्वेचि मुहकमसिंग करी;
धर्मद्रोहा कशा अर्पुनी औरंग्याच्या स्वत्व करी; ॥९७॥
म्लेंच्छमैत्रीचें रणांत देहान्ताचि तो प्रायश्चित्त करी
दहा हजार प्रताप आणी घोडा रिपुचा धरुनि करी ॥९८॥
पुरंदरींच्या मुराराचिया बलिदानासी दे समरीं
सिंहगडाचा तातडीचा डाव तोडिसी तोड भली ! ॥९९॥
तीन हजारावरती तुटुनी मरतां मोंगल तरवारी
दाउदखाना पळतां थोडी चांदवडाची भू झाली ॥६०॥
साल्हेरासी करी मराठा दिल्लीराची जान ढिली
हिंदुगदा रिपु चेंदुनि पाडी दहा हजारांहूनि वरी ॥६१॥
कसूर काढूं उंबराणीची जेसूरींच्या जया स्थलीं
लढुनी शूर प्रताप त्या कीं शेता राष्ट्रक्षेत्र करी ॥६२॥
सावनूरचा मार आठवुनि निमाज पढतां आजवरी
‘ गांठ मराठ्यासह ना पुनरपि पडो ईश्वरा ’ रडे अरी, ॥६३॥
संगमनेरीं रणमस्तांची रणांत मस्ती जिरवीली;
हिंदुस्वातंत्र्याची द्वाही दिशोदिशासी फिरवीली. ॥६४॥
शूर शिवाची दहा जिवाची गुप्तमंडळी ती पहिली
एक्या प्रबळा राष्ट्रमंडळांमध्यें प्रकाशीं परिणमली ! ॥६५॥
पठाण मोंगल तुर्क इराणी--दाढी तितुकी सामोरी
पुर्तुगिज वलंदाज फिरंगी--टोपी तितुकी पाठिवरी; ॥६६॥
परि तितुक्याहिसहित मराठा--वीर दुहेरी झुंज करी
एक्या हस्तें उपटित दाढी टोपी उडवी दुज्या करी ! ॥६७॥

मुख्या वीरा येसाजीला घाव लागला हाय ! तरी
पुर्तुगिज शिरें टक्करींत रे फोंड्यावरतीं फोडियली ॥६८॥
हंबीरानें मारित मारित मरोनि वाईच्या समरीं
समर्थ गुरुची केली शिष्यें कृतांत उक्ती खरी खरी; ॥६९॥
धर्मासाठीं, वीर हुतात्म्या संभाजी ! तूं पडुनि बळी
तुझींच ना परि पापें अखिलां राष्ट्राची प्रक्षाळियली ॥७०॥
भालेराई; राव धनाजी; ते संताजी,--उच्चारी
एकेका या एकेका मी युद्धाचा उच्चार करीं ! ॥७१॥
युद्धामाजीं एकेका ज्या गर्भित झुंडी शतावरी
छापे, धांवे तुमुल लढाया, पृथक् कथाव्या कोटवरी ! ॥७२॥
शरणीं न रिघूं सरणीं जळल्या सती सातशें ! जळणारी
विशाळगड ती ध्वजा फडकवी दुज्या चितोराचिया परी !! ७३
कासम मेला श्वास कोंडुनी दुडेरिच्या संगरावरी
बसवपट्टणा हिम्मतखाना वधी मराठा धारकरी ॥७४॥
सेनेमागुनि सेना रिपुची जिंजीभंवती मारियली
भूल पाडुनी झूलफिकिरखानासि धूळची चारियली ॥७५॥
नारोपंत प्रमुख वीर रिपु--करास पडती स्वयें बळी
म्लेंच्छशक्ति परि हौतात्म्यें त्या अंतिम विजया आंचवली !
हौतात्म्येची त्याच्या त्याच्या घेउनि जो तरवार करीं
पडला झुंजत रणांत राष्ट्रस्वातंत्र्यास्तव धारकरी ॥७७॥
पाइक हो तो नाइक हो तो स्मृतवा विस्मृत धारकरी
हौतात्म्यासी त्याच्या त्याच्या वंदन मी शतवार करी !! ॥७८॥

करी वंदना प्रयागजीच्या पराजया मी परोपरी !
पराजयाची महती ऐशा कितीक विजयाहूनि खरी ! ॥७९॥
घेउनि भारे गवताचे रे गढी जिंकिली कशी तरी
त्याच्या जाती सेना चढुनि गाजत वाजत दिल्लीवरी ! ॥८०॥
वीर पंधरार्शे तूं कापुनि काढिसि सहसा खरें परी
घुसला जात न दिवाण खासा ! पाय मराठा माघारी ॥८१॥
परंतु हिंदुद्वेषीं जनहो सावध आतां मात्र परी !
प्रधान आजी झाला बाजी महाराष्ट्र मंडळांतरीं ! ! ॥८२॥
मात हिंदुपदपादशाहिविण बोलूं देचि न तो दुसरी
किन्नरखंडीं हिंदुध्वज तो रोवुं होतसे हांवभरी ! ! ॥८३॥
पालखेडसी निजाम पिटिला, अल्ली पिटिला बंगालीं
अर्काटासी नबाब पिटिला, पिटिला शिद्दी जलीं स्थलीं ॥८४॥
चिपळूणासी, विजयगडासी, मार दिला त्या जसा स्थलीं
तसाच पिटिला जो जो आला शत्रु आडवा तया जलीं ॥८५॥
श्रीगांवीं तो मर्दुनि सेना दहाहजारांचिया वरी
शिरच्छेदची सिद्दीचा त्या श्रीचिमणाजी वीर करी ॥८६॥
हिंदुछळाच्या प्रायश्चित्ता हबशी जों ना पुरा भरी
पाप–प्रायश्चित्त–गदा तों पुर्तुगिजांच्या पडे शिरीं ॥८७॥
ठाणें, माहिम, तारापुर त्या झुंजी सांगूं कोठवरी !
वसईच्या तों पराक्रमाची ख्याति उभ्या या जगत्तलीं ॥८८॥
पेटलादला, सारंगाला, तिरला, जो जो लढे अरी
माळव्यांत तो मुकला प्राण म्लेंच्छभृत्य रणरणांतरीं ॥८९॥

बादशहाच्या बादशाहिची जाळुनि दाढी दिल्लीवरी
होता कीं नव्हतासा केला निजाम पिटुनी भोपाळीं, ॥९०॥
बुंदेल्यांचा पक्ष घेउनी बंगष पिटला जैतपुरीं
हिंदूंचा सत्पक्ष घेउनी अहिंदु पिटिला जलीं स्थलीं ॥९१॥
म्हणुनि चढुनि ये म्लेंच्छमोचना इराणांतुनी नवा खळी :
परंतु नादिर सहसाची तें रण सोडुनि घर जवळ करी ॥९२॥
तोंची बाजीराव जहाले हाय ! दिवंगत महाबळी
परी पित्याहुनि पुत्र धुरंधर महाराष्ट्रपदधुरा धरी : ॥९३॥
दशरथ देउनि राज्यश्रीसी रामलक्ष्मणाचिया करीं;
प्रभाततारा देउनि जाई कांति आपुली सूर्य–करीं; ॥९४॥
तशीच बाजीरावें हिंदु–स्वातंत्र्याची ध्वजा दिली
या नरवीरा नानांच्या, या भाऊंच्या, दुर्दांत करीं ॥९५॥
रोवी हिंदुध्वजा शिवाजी शूर पिढी त्या रायगडीं
पिढी बाजिची झुंजवीत ने तिला थेट चंबळेवरी ॥९६॥
नरसिंह श्री नानांची तों महाराष्ट्र मंडळी परी
रोविति हिंदुस्वतंत्रताध्वज शत्रूच्याची उरावरी ॥९७॥
पठाण, मोंगल, तुर्क, इराणी, हबशी, शिद्दी, परोपरी
पुर्तुगिज, वलंदाज, फिरंगी, इंग्रेजादिक गोर खळी ॥९८॥
इराणपासुनि फिरंगाणपर्यंत शत्रुची उठे फळी;
सिंधुपासुनी सेतुबंध–पर्यंत रणांगण–भू झाली ॥९९॥
तीन खंडिच्या पुंडांची त्या परंतु सेना बुडवीली
सिंधुपासुनी सेतुबंधुपर्यंत समरभू लढवीली ! ! ॥१००॥

आठवण मला त्याची देणें तुम्हांसि नलगे अशा स्थलीं
प्रत्यक्षाचि ती असेल सरशी तुम्हांत बहुतां पाहियली !१०१
तुम्हांत असतिल बहुत वीर जे स्वयें झुंजले त्या समरीं
नाइक ऐसे, पाइक ऐसे, मर्द मराठी धारकरी ॥१०२॥
कथेंत ते ते सरशी आजी आकस्मिक कां ही झाली ?
विजयश्री कां केवल चुकुनी घरा आमच्या ही आली ?१०३
आकस्मिक ना अहो भूमिची तसू तसूही लढवीली
हिंदुस्वातंत्र्यार्थ रणरणीं रास शिरांची चढवीली ! !॥१०४॥
संतत शोणित तर्पण धारा धरीत आली पिढीपिढी
हविर्भुजाची रणकुंडांतिल आग विपल ना विझूं दिली ! १०५
समर्थ समजे योगी करिती महातपस्या तपोबली
अमात्य, मंत्री, प्रधान करिती सूक्ष्ममंत्रणा मंत्रबळीं; ॥१०६॥
हणमंते, प्रल्हाद निराजी, पंत आणखी परोपरी
लहान मोठा शतशतकर्ता मुक्ति समरिचा धारकरी ॥१०७॥
तपें तयांच्या, जपें तयांच्या, उपदेशें त्या, प्राणविली;
मंत्रयुक्तिनें प्राणविली : त्या शस्त्रशक्तिनें त्राणविली– ॥१०८॥
–ती ही आजी जन्मा ये जी हिंदु–शक्ति नव जगत्तलीं
जन्म द्यावया जिला साधना महाराष्ट्र दृढ अशी करीं ॥१०९॥
जयजयकारें भरा अंबरा करा महोत्सव घरोघरीं
मांगलिका कीं हिंदुमात्रहो वार्ता आतांची आली ॥११०॥
हिंदूवीरांचा कीं श्रीशें असे यशस्वी हट केला
आज हिंदवी जरिपटका कीं पुन्हां पोचला अटकेला ॥१११॥

( ४ )

करा महोत्सव हिंदुमात्र हो ! तुमच्या हौतात्म्यें आला
विजय तयाच्या महोत्सवाचा हक्कचि आहे तुम्हांला ॥११२॥
परंतु जिंकुनि आला जे जे असामान्य ज्या विजयाला
त ते विसरूं नका वीर हो त्याचि जवोत्था नवभारा ! ॥११३॥
चंद्रगुप्त ज्या, पुष्पमित्र ज्या पुत्र गौतमीचा स्वकरीं
करी राष्ट्रसंकटासि पूर्वी निरस्त त्याहुनि तुम्हीं जरी ॥११४॥
शतपट दुर्घट संकट हरुनी शककर्त्या त्या वीरवरा
वंशज व्हावें तसेंच विक्रमशाली शोभा या काला ॥११५॥
तथापि अजुनी कार्य न सरलें इच्छित हाता तट आला
परंतु अजुनी चढुनि दुर्ग हा कुशल पोचणें असे घरा ! ॥११६॥
आज हिंदुपद पादशाहिचा योग सत्यची हा आला
तथापि अजुनी समारंभ तो संपुनि निर्विघ्न न गेला ! ॥११७॥
शककर्त्यासम सत्यचि आम्हीं धन्य विजय हा उपार्जिला
शककर्त्यासम परंतु विजया करीं पाहिजे राखियला !॥११८॥
शल्य उपटलें परंतु भारी घाव न भरुनी हा आला :
कुठें हूण ते ? जसें तसें न क्षमता अजुनी पुसण्याला !॥११९॥
चक्रव्यूहा देवारींच्या भेदुनि शौर्यें जरि गेला :
तरी परतुनी येणें आहे सजय त्यांतुनी माघारा ! ॥ १२० ॥
अमंगल टळो ! पूर्वस्खलनें सावध होउनि या काला
सारथि[१] तो अविलंबित देतो साथ धांवुनी आम्हांला. ॥१२१॥

१ सारथि—अर्थात् श्रीकृष्ण. चक्रव्यूहकथेशीं संदर्भ सूचित आहे.

आणि जयांहीं चक्रव्यूहा देवारींच्या भेदियला
सजय परतुनी भोगुत चिर ते धर्माधिष्ठित वसुंधरा !! ॥१२२॥
सशस्त्र समराभिषेक जैसा हिंदुश्रीसी हा झाला
सशास्त्र सिंहासनाभिषेका तिच्या पाहुं द्या आम्हांला!!॥१२३॥
राष्ट्रासी, या, धुरंधरा या, जया जसें या वरण्याला
प्रभो ! महाबल, तसेंच दे या जयोत्थ भारा धरण्याला !१२४
याहिवरी जी ईशेच्छा ती घडेल !—परि हा घडलेला
पराक्रम,—महत्कर्मे हीं; हा असामान्य जो जय आला, ॥१२५॥
व्यर्थ न तो जाईल कधींही दिन हा हिंदवि राष्ट्राला
सच्छक्तीचा, सत्स्फूर्तीचा स्त्रोत सततची की झाला ॥ १२६ ॥
आज सात शतकांनें विजयी मिरवित सोनेरी तोडा
पिई सिंधुचें पाणि पुनरपी हिंदु सैनिकाचा घोडा ॥१२७॥
सागरसंगत भागिरथि ये कावेरीच्या पूतजला.
सिंधु, शतद्रु, त्रिवेणि, यमुने, गोदे, कृष्णे या सकला॥१२८॥
हे तीर्थांनों, हे क्षेत्रानों, अखिल भारती भूमितल्या—
हरिद्वार, कैलास, काशिके, पुरी द्वारके या साऱ्याः—॥१२९॥
ऐका ऐका लोमहर्षणा वार्ता विजयाची आल्या
उभ्या सात शतकांचा उगवे सूड जिंकिलें जेत्याला ॥१३०॥
हिंदूवीरांचा कीं श्रीशें असे यशस्वी हट केला
आज हिंदवी जरिपटका कीं पुन्हां पोंचला अटकेला" १३१

---

चढत चढत गिरिशिखरावरति अकस्मात्
पथ येउनि संपतांच थक्क मन जसें

कृतकृत्याश्चर्यी क्षण विश्रमूनिया
विस्तृत चौफेर वनश्रीसि परिचिता
करितां करितांचि गुंग होउनी थिजे :
तेंवि वीरभाटाचें वीरगीत तें

श्रवत वृत्ति वीरांच्या गुंग जाहल्या.
संपतांहि गीति न तें समजुनी पुरें
कृतकृत्याश्चर्थि मुग्ध ऐकतचि बसे
भारावी मंत्रें कीं तेवि सभा ती.
भंगूं ती स्तब्धता न वांछिही कुणी
जों न सिंधुमुख्य उभे राहिले वदूं :
“ उत्तरदिग्विजयोत्स्तव आज हा उम्या
मुदित महाराष्ट्रासी न्हाववीलची
आनंदाश्रूंत सत्य ! त्यांतही स्वयें
पुण्यपुरीच्या पुण्याईस तों नसे

तोड आज जगतीं,—वा विक्रमासही !
परि आम्हां परशुधरक्षेत्रनिवासी
जानपदांही स्वकीय धन्यता अशी
वाटावी, हेंही तों क्षम्यची असे !
विजयाचा सेनानी ह्या महान् असे
कीं ह्याची आपुलिया कोकणांतल्या
रानामधलाच एक गरुड भरारी !
ज्या कुलांत अखिल महाराष्ट्रशक्ति–ना—

आखिल हिंदुसाम्राज्योत्कर्ष आजला
केंद्रित होऊनि असे : कुल सुधन्य तें

अंकीं या कोंकणभूनेंचि लालिलें !
परशुधरक्षेत्रीं प्रति परशुरामसे
वीर येति जनु आजहि ! ह्या कलींमधें
स्थापाया धर्मराज्य ! धन्य भूमिही ! ! !

शककर्त्यासम दिग्विजयासि अर्जिलें
सत्य आजि : परि तुम्ही कविवराचिया
या उक्त्यर्धापुढचें अर्ध परिसिलें
आहांची सद्य : कीं : विजय तो करीं
शककर्त्यासम अजुनी राखिणें असे !
कर्तव्या त्या करण्या थोर थोर जे

कार्यधुरंधर, शिंदे होळकरादि
नेतृत्वाखालीं श्रीमंत यशस्वी
नानांच्या—भाऊंच्या झटत असतिची
उत्तरेसि, पूर्वेसी आणि दक्षिणे;
परि पश्चिम सिंधुवरी हिंदुजयाचा
ध्वज तो निजदोर्दंडावरति तोलणें :
कार्य हें विशिष्ट, पृथक्भार हा महान्—
परशुधर क्षेत्राचा भाग कीं असे !
उत्तरसीमान्तीं तुरकाण ज्या परी
तैसेची पश्चिम सीमान्त सिंधुच्या

द्वारीं डोळ्यांत तेल घालुनी खळी
हाव–फिरंगाणी[1] हबसाणि[2] आणखी
टपत बघे छिद्र कधीं आणखी कुठें
पडतें तें धैर्याच्या आपल्या तटा.
आजवरी मार्गांतिल कंटकासि ह्या
उखडुनिया टाकाया समय संधि वा
गवसलीच ना पुरती : काळसर्प जो
ह्या स्वराज्यमार्गावरि आड येउनी,
मातृभूसि वेढुनि वळख्यांत विखारी
विद्ध करी धरुनीः—तुरकाण सर्प तो

झोडुनिया, तोडुनिया, पचवुनिया तें
विष दुर्धर टाकण्यांतची स्वशक्तिचा
व्यय करणें अद्यावधि भाग जाहलें
    विश्वनाटकांतिल या दृश्य कोणतें
आगामी अंकाचें, तें न कवणही
कथुं शकेल निश्चिततः आज ! परंतु
प्रस्तुतच्या स्थितिगतींत तरि न ह्या तिन्ही
हबशी, इंग्रेज, पुर्तुगीज बलांची
मार्ग कंटकाहूनी अधिक थोरवी.
जरि तयांचि उखडिण्यांत, उत्तरोचिया

अखिल हिंदु साम्राज्या आक्रमिण्याच्या
त्यजुनि फलोन्मुख कार्या, लागतों झटूं

१ फिरंगाण—युरोप. २ हबसाण—आफ्रिका.

तरि हास्यास्पद, निष्फल आणि घातकी
तैसेंची तें होतें कृत्य कीं जसें
कृष्ण भुजंगा डसत्या पथिं उपेक्षुनी
प्रथम कंटकासी वेंचीत राहणें !
इतुक्यावरि जरि पिढी पुढील यादवी
ती तें तृण जैसें, ह्या कंटका तसे
निजघातीं उपयोजिल : मूर्खता तरी
आणि दोष तो—पिढीचियाचि त्या शिरीं !

उत्तर दिग्विजयाचें कार्य तें परी
आटोक्यामध्यें हा विजय आणितो
आतां हे कंटकही उखडुनी दुरी
टाकावे निष्कंटक मार्ग निज करूं
कारण कीं क्षुद्र तृणहि यादवींत त्या
कुलनाशक मुसलाचें रूप घे जसें :
सांगावें कोणी ! नव यादवीचिया
करिं कवणा कंटक हे प्राणघातका
बाणांत न रूपांतर घेतिलाचि असे !
चिंता ही भारतांत आणि जरि कुणा

श्रीमन्नानांसि मात्र ती तरी असे !
यास्तवची बहुशः अतिकष्टहि तरि तयां

१ यादवी—प्रसिद्ध यदुकुलांतील लढाईंत तृणेंच उपटतां मारक शस्त्रें होत गेलीं.

करणेंची प्राप्त पडे ज्ञातिकलहही—
वीर तुळाजी संगें हाय ! जरि कमी
तो मदांध कीं असता—प्रबल अधिक वा !
व्यर्थ न तरि जातें तें वीर्य तयाचें !
बलमत्त न होता : तरि राष्ट्रहितार्थी
शिरिं धरिता राष्ट्रधुरीणांचिया वचा
प्रबळ अधिक असता : तरि भारताचिया
राष्ट्रधुरे धरिता स्कंधींच आपल्या

परि अखिलां हिंदुतेचिया धुरेप्रती
धरण्याची धमक, पात्रता, परिस्थिती
एकही न असतां अनुकूल, हटेंची
एतद्गुणगणभूषित जे स्वयें, स्वयें
राष्ट्राचें प्रत्यक्षचि केंद्र कुशल जें :
त्या प्रधान पंतांच्या मत्सराचि ना,
परि करण्या समरविरोधासही धजे !
कोंकणच्या, भारताचियाहि मंगला
पश्चिमीय सिंधुस्वातंत्र्य मुख्यतः
आवश्यक जें, तें ना साध्य ह्या अशा

सत्ताभंगांत, आणि जलबलाचिया
एकमुखाभावीं या, पाहुनी असें
श्रीमंता प्राप्त होय नमविणेंच कीं
गर्व तुळाजीचा हा राष्ट्रघातकी

तरिहि विलंबानें कां होईना, परी
धीर दमाजी किंवा वीर रघूजी—
—सम घेता आटोपुनि राष्ट्रघातका
हट्टासी आपुलिया वीर तुळाजी :
श्रीमन्नानाहि तरी रक्षिते तया.
परि उन्मादें ब्राह्मण आणखी प्रजा

यांचा छल; खलकृत्यें : बर्बरांसही
लाजवील तें कापुरुषत्व आगता,
सामार्थी, श्रीमंतप्रहित, पूज्यशा
राजदूतपुरुषांच्या नासिकांप्रती
कापुनिया परतें त्या धाडण्यांतलें :
छत्रपतीसहि उभया होत नकोसें,
—राष्ट्र असो दूर ! परी बंधुसिहि निजा—
मानाजीरावासम सौम्य सूज्ञ ह्या
बंधुशिही–दृढ वैरा राखणें सदा :
—हें मदांधपणची तन्नाश कारितसे.

नवदुर्योधनसम ‘ सूच्यग्रमृत्तिके—
—स्तव ’ दुर्योधनसम निजराज्य बुडवि तो !

तरिहि वीर ऐसा आम्हांस अंतरे
दुःखदची, अनुशोच्याचि, हें सुनिश्चयें.
श्रीमंतहि, आणि तुळाजीहि आमचे :
परि हिंदुश्रीमत्साम्राज्यदृष्टिनें

वदलो हे. आणि जरी वीर तुळाजी
नानांच्या स्थानीं, ते आणि त्यांचिया
असते : तरि नानांच्या समपराभवीं
वदतो मी हेंचि ! शोकविद्ध असाची ! !

ह्या अप्रिय गृहकलहाहूनिही परी
अप्रिय, अनुशोच्यहि जे भासले स्वतः
श्रीमंतां सकलाहुनि, आणि ज्या प्रती
केवल निरुपायास्तव अंगिकारणें
भाग पडे तरिही त्यां, कृत्य होय तें
परसाह्या घेणें ह्या ज्ञातिकलहिंही !
परि दुर्दैवें हिंदूची न खोड ती
आत्मघातका सुटली आत्मघातही
झाल्यावरि इतुका अजुनीहि पूर्णतः
अक्षम्यहि दोष खरा : दोष परी तो

राष्ट्राचा अखिल ! कुण्या व्यक्तिचाचिना !
जों वरतीं इतर सर्व गृह्यविग्रहीं
परक्यांचे साह्यानें स्वार्थ साधिती
तोंवरती एकानें दोषही तरी
अंगिकारितां त्याची निंद्यसाधना
केवल निरुपायवशें; आणि विशेषें—
करुनि, कार्य होतांची, निंद्य तेच कीं
साधन करण्यासि दीर्ण, चूर्ण, पूर्णतः

दोष परिस्थितिचा तो राजनीतितः
व्यंकोजीं साह्य विजापूरकरांचें

घे जों तों, श्रीशिवभूपाहि बांधवीं
कलहींही कुतुबशाहितें स्वयें पडे
करणें सन्निध,—आणी सर्वंची तया
शाहींचा नायनाट करुनि विधर्मी,
स्थापायास्तवचि हिंदुछत्र भूवरी !
हाडवैर जो राखी हिंदुतेसवें
मोंगलांसि त्या अनुसंधान राखणें
उच्छेदूं श्रीमंता, हा न भासला
ताराऊंसीही अपराध कीं जिथें
जेथें परसाह्याचा लाभ त्या स्वयें

घेवोनी ताराऊसहित तुळाजी
बुडवाया पेशव्यांसि नित्य झुंजला :
ह्या आंग्र्याच्याची वंशांत बंधुनें
बंधूसी दंडाया इंग्रजांसची
साह्यास्तव आणियलें जेथ : आणखी
जेथ हिंदुछलक दैत्य शिद्दि ये जईं
मानाजीरावांवरि चढुनि तैं न दे
साह्यासी याचितांहि अल्प तुळाजी :
तेथेंची आणि तुळाजीस त्याच कीं
दंडाया कंटकेन कंटकं अशा

१ ताराऊ—ताराबाई.

नीतीचें अवलंबन भागची पडे
आणि जरी नाना ना इंग्रजाप्रती
घेते मिळवूनि रणीं तरी पुढें स्वयें
नानांचे शत्रु तुळाजीस आणखी
इंग्रेजासहि बांधुनि संधिनें झणीं
नाशासी नानांच्याची न योजिते :—
कोण हमी ही देता ? कोण पाळिता ?

इंग्रेजावीण जिंकुं ये न तुळाजी;
जित ना जों तो; तों ना नौबलाप्रती
एकमुखी सत्तेची प्रबलता मिळे;

नौसाधन जों प्रबळ न तों स्वसिंधुचें
स्वातंत्र्य स्वाधीन न राखणें घडे;
एतदर्थ आंग्लादिक पररिपूंचिया
नाशार्थचि आंग्लांचें साह्य घेतलें.

आणि तेंहि टाकाऊ एक मात्र कीं
बाणकोटचा तुकडा टाकुनी पुढें
इंग्रजासि जिंकिता तुळाजिविना ना
येणेंची कवणा, ही स्थिति मुळींचि ना !
असतेंचि तेंवि तरी मात्र पाप तें
होतें अक्षम्य तुळाजीसि विनाशूं

जात तुळाजी म्हणुनी वीर्यची नसे
जात महाराष्ट्राचें त्याबरोबरी !
जात तुळाजी परि त्या संगरेंच कीं

कोंकणिचें भूबल तें, सिंधुबलहि हें
होत एकमुख, एकाधीन ! मराठी
शिवपूर्व त्रस्त, वृकग्रस्त, ते कुठें
आणि कुठें कोंकण स्वतंत्र आजचें !
त्रस्त आज तें वृकची हिंस्र ! आपल्या
तीन बिळाबाहेरी एक पायही
टाकूं ना धजति ! भयें आंतही बसूं !

परि आतां तीन बिळांसीहि त्या झणीं
मुंबईच्या–गोंव्याच्या–जंजिऱ्याचिया
उखडुनि; परलोभ–लांडग्यासि नृशंसा
नामशेष करुनि, आणि सिंधुपूर्ण हा
निर्वैर, स्वांकित, निरुपद्रवी करूं
शीघ्र, बद्धपरिकर होऊनिया उठा.
कोंकणिची भू स्वतंत्र जाहली जशी :
वीरांनों कोंकणिच्या ! जिंकिण्या उठा
कोंकणिंच्या सिंधुची स्वतंत्रता तशी !
आणि ती स्वतंत्रता न साधनाविना

ज्या एका होउं सुरक्षित शके कधीं
नौसाधन निज तें करण्यासि विधर्मी
दुष्टतेसि दुर्जेय प्रबळसें झटा !
हे रत्नागिरि ! अंजनवेल ! कोंकणी
सिंधुपुरींनों अवघ्या ! घणघणाटुनी
द्या सारें नभ नवीन रणतरींप्रती

१ सिंधुपुरी किंवा सिंधुद्वार–बंदर Post

घणित, रणावित, अहर्निश, सहस्रशः !
बावड्या, गुराब, पाल, पोत, तारवें,
तिर्कस, तीं चिनांई[1], तीं विलायेती[2],
व्यापारी, झुंजारी, सबळ शिडांची ! !

नौशिल्पी कोण हात धरित आजला :
नौरणांत कोण हार देत आजला :
कोंकणिच्या नौशिल्पाभिज्ञ जनांना ?
कोंकणिच्या नौरणशूरांसि ह्या क्षणा ?
    ही विनंति, उपदेशहि हा, न एकट्या
माझाची; परि आज्ञा ही तुम्हांप्रती
पंत श्रीमंत प्रभु पेशवे स्वतः
धाडिताति आज जयोत्सव सुमुहूर्ते—
मद्गारें, अवघ्या ह्या मिळित मराठ्यां !
    एकमुखी नौसाधन; अग्रणी स्वयें

श्रीमंतचि ज्यातें; ज्या जनक शिवाजी;
हे सावंत, हे श्रीमानाजिरावही
सरदार प्रमुख ज्यांत; आणि झुंजुनी
ज्यानें हबसाण—फिरंगाण—नौबळा
जिंकियलें बहु रणांत : आरमार तें
शीघ्र महाराष्ट्राचें हिंद सिंधुच्या

१ चिनई—चीनपर्यंत जाणाऱ्या जाहाजास म्हणत. २ त्याचप्रमाणें विलायतेस जाणाऱ्या जाहाजास विलायती म्हणत.

नक्कासी होइलची ठार मारतें ! !
कीं पाश्चिम सिंधुस्वातंत्र्य रणीं जैं
चौदिशांसि करुनि परिघ; एक बांधुनी
सांगड रणपोतांची; त्यांचियावरी

मारक त्या मोरच्यांचे रचुनि विमोघा;
करिल मारगीर भयंकर जलांतुनी
नौबल हें : आणि भूमिबलहि मराठी
रेटिल इकडूनि जलीं एकसहाची
कलकत्ता—कर्णाटक—मुंबईकडे
ताम्रांसी अवध्यांची : तैं स्वयेंचि कीं
तें पश्चिमासिंधुस्वातंत्र्य जिंकितां
हिंदसिंधुही स्वतंत्र होतची स्वयें !
तरि भारतवीरानों ! भूमिची जशी
नौसाधन नव उभवुनि जिंकिण्या उठा

भारतीय सिंधुची स्वतंत्रता तशी ! ! !
नौसाधन नव तें, तें आरमार कीं
उदित हिंदुराष्ट्रचें ज्या दिनीं कधीं
सिंधूच्या लाटांवरि स्वार होउनी,
तोफांच्या दुर्बीणींतूनि पहारा
अनिमेष प्रबल करीत भारतांचिया
दूर भविष्यावरि, विचरेल सागरीं
त्या दिनींच घेइल जें लब्ध आज तें

हिंदुस्वातंत्र्य चिरस्थायिता खरी ! ! ”
   हितकारक, उत्तेजक, साश भाषणा

करुनि अशा सिंधुमुख्य बैसले जंई
तंई पुनरपि राजमुख्य उठुनि बोलतां
   “ तथ्य आणि पथ्य अशी सिंधुमुख्य जी
आज्ञा श्रीमंताची आणि आपुली
आम्हांसी आतांची सांगती स्वयें
शिरसा ती वंद्य असे : समययोग्य ती :
कीं विजयानंदीं या मग्न होउनी
कार्याचा पुढल्या ना विसर पडावा !
आंग्लासी आम्हि असूं जोखुनी पुरें !
उत्तरेकडील महान् विजय आजचा

पचतांची पाहुनियां घेउं त्या त्वरें !
सिंधु[1]जयाचा उत्सव आज जसा त्या
आशा मज दृढतम कीं शीघ्रची तसा
सिंधु[2]जयाचा उत्सव गाजवूंचि ह्या
   जेतृत्वप्रमद जरी म्लेंच्छ रिपूंचा
आज असे निहत : जरी शल्य तें तया
म्लेंच्छांच्या तोऱ्याचें आजि उपटिलें;—
तरि हो ना हिंदूंनो विसर आपणां
घाव भयद कीं अजुनी मातृभूमिचा
भरुनी तो आला नां ! कवि कथी तसें

१ सिंधु–सिंधुनदी. २ सिंधु—समुद्र.

कोठें ते हूण ? असें पृच्छिण्याप्रती
क्षमता ना अद्यावधि आपणांस ती !
एतदर्थ ह्या विजयास्तव जरी असे
उचित उत्सवक्रम तो कोणता तरी—
हाची कीं धावा त्या जातिहृदाच्या
अपहृत निजजातिबांधवासि धर्मतः
बंधमुक्त करुनीया रिपुकरांतुनी
ओजस्वी औषधि प्रयोजणेंचि ती !
तरि आहे आधींची निश्चियला जो
शुद्धियज्ञ आम्हीं उद्यीक—तोंच कीं

विजयाचा या उत्सव होउं उचितसा
त्यांतहि तो राजदूत वृत्त तें कथी,
जो कविवर गात मधुर विजयगीति ती,
—तोची या शुद्धियज्ञपावकाप्रती
होणारा पावनीय कीं असे उद्यां !
आश्चर्यें चकित दृष्टि आपली मला
जिज्ञासे, काय ? कसें ? : होय; सभ्यहो
गीतीच्या प्रारंभीं कविवरें स्वतः
पतित म्हणुनि निजपरिचय जो दिला तुम्हां :
तो न औपचारिक !—परि शब्दशः खरा !!

श्रीमंतें पत्रीं ह्या त्रुटितवृत्त तें
आहेची लिखित मला—आणि उद्याला

होईल तें साग्र सर्व विदित तुम्हांला ! ”
  वदुनि असे राजमुख्य करिति सभेसी
आश्चर्यानंदसिंधुमधिं विसर्जना.

  जन थव्यायथ्यांत पृथक् जात पथानें
चिंतित वा संवादत तर्कवितर्कीं :
राजदूत कोण ? कसा पतित ? हें कुणी :
कवण मनीं चित्रीं ती अटक छावणी !
—त्यांत बांधवहि निज वा ! कवण कल्पिती

विजयीं त्या पुत्र पिता वा स्वकीय जो
करित पराक्रम असेल तो असा, तसा :
पदवी वा पारितोषकासि घेउनी
येइल ह्या ? किंवा त्या ? कवण भिई वा
वृत्त अमंगलचि असे भाग तयाचा ?
“ तरिहि वीरगतिची ती ! ’ धीर दे कुणी,
‘ श्रीमंताचे आम्हां होतील त्या स्थलीं : ”
प्रश्न कुणी काढी, ‘ कां अटक नदीच्या
पुढतीही सेना जातील आपल्या ? ’
कवण निंदि, ‘ हिंदु कसें ते करो ! ’ म्हणीं

‘ कां न ? करूं तेही ! ’ प्रतिपक्ष घे कुणी :
आशास्था घटितेंची समजुनी कुठें
उच्छृंखल जयनिनाद गर्जुनी उठे :
संकटासि भावी फुगवीत उसासा

दुर्भविष्यवाद्यासम हळहळे कुठें :
तिकडे ते तोफांचे बारही क्रमें
होतेची सुटत मधुनि मधुनि धडकते :
इकडे त्या राष्ट्रीया प्रीति–भक्ति–भी—
—आशा–अपशंका–उत्साह–भावना—
भावांची मानस यज्ञाग्निहुतांची

अग्निज्वालाचि तशी दीप्त ती ध्वजा :
—तो भगवाझेंडा कीं सतत अंबरीं
होताची फडकत अवध्यांचिया वरी ! !

प्रांतीं त्या ग्रामाच्या एक रम्यसें
पुष्पलतापादपसंकीर्ण पुराण—
प्रथित तपोवन होतें सिंधुतटासी.
वेलावलिशोभित पुन्नागसुगंधी
कोकिलादिखगकूजित, मृगमनोज्ञशा
त्या तपोवनांत तीर्थ एक शोभलें
स्वच्छ सलिल सलिलजपरिवेष्टनामधें

नारिकेल–आम्र–पनस–पूग–कर्दली
—तरुलता स्वभक्तिभरें गुंफुनी निजा
शाखांसी डवडवत्या फलफुलांमधें
रचिति रम्य मंडपास उंच अंबरीं
तीर्थाच्या रविकिरणोज्वल जलावरी.
दिवस दुजा उगवतांच, पुण्य उषेचीं

स्तोत्रें सुस्नात द्विज गात पवित्रें
शतशः सत्वरचरणें लागले दिसूं
जातांना काननांत त्या सुपावना.
तीर्थतटाभोंवति जी समतलस्थली

विस्तीर्णा होई संस्तीर्ण शीघ्र ती
समिधांनीं, दर्भांनीं, घृततिलादिकीं,
याज्ञियांगसंभारीं पुण्यपावनीं.
शीघ्रचि तें वन घोषित-दीप्त जाहलें
स्वर-विशुद्ध समुदीरित वेदपदांहीं
आणि हविर्लुब्ध हुताशार्चितेजनीं.
स्निग्ध सुगंधित शोभन हवन धूम ही
लोलुपसे जाताही जात दूर ना
भोंवभोंवतीं गगनीं स्वच्छ रौप्यका
जालांप्रति लोभांच्या आंतरा निजा

गुंफित बहु विलसले थव्याथव्यांतुनी :
देव जसे विविधाकृति दिव्य विमानीं !
तों जनही अखिल बघूं त्या अपूर्वशा
शुद्धिसमारंभाप्रति काननीं क्रमें
सोत्सव स्वधर्मनिरत येऊं लागले.
पौरवृद्ध करुनि पुढें तो समाज त्या
यज्ञशरण सीमेवरि वेषभूषणीं
दूरवरी विलसतसे दाट कीं दुजें

सिंधुतटीं वेलावन फुलतसे कुणी
तों सादर समुदायांतूनि ये ध्वनि

‘ मार्ग ! सरा ! बंधूसी मार्ग द्या सरा ! ’
आणि तया राजदूत वरियुल्याच्या
नेतृत्वाखालें शत पतित जनांचा
ये समूह त्या तीर्थावरति पावनां,
मग सचैल सर्वहि ते पतित त्या सरीं
स्नान करुनि वरि आले. वस्त्रमात्र ते
जीर्ण शीर्ष पाय पुरातन तसें दुरी
टाकुनिया सर्वांहीं प्रोक्षिलें शुभें
कटिवस्त्रें केलीं परिधान नवीनें
श्मश्रूचा विधि होतां मग विराजण्या

लागतसे शास्त्रशिखा त्या शिरीं शिरीं
शेखी ती हिंदूंची आणि अंतरीं.
मग सर्वां अभ्यंग स्नान करविण्या
विप्रवर्य आवाहन करिति जलांचें :
हे गंगे, हे यमुने, हे सरस्वती,
सिंधु, नर्मदे, गोदे पतितपावने
ये कृष्णे, कावेरी ये जलांसि ह्या !
अखिलभारतीयजीवनैकतास्मृति—
संस्कारोज्जागृत स्वजातिभावना —
प्रीत, पतित ते सरांत धुवुनि निजांगें

हृदयांतःकरणासह विमल जाहले.
विश्वचक्षुसम भास्वान् भास्कराप्रती
बद्धांजलि अर्घ्यदान करुनि सर्वही,
तीरावरि जी सवत्स धेनु मंगला
ती प्रेमें स्पर्शुनिया आणि पावका
यज्ञपावकांच्या त्या करुनि दर्शना,
सालंकृत सपरिधान उत्सवें महान्
जयशब्दा पुनरागत सर्व गर्जती :
धर्मसनातनकी जय ! जय पुराणकी !
अखिल जनें उचालितांचे शब्द तो सर्वे

काननची आनन कीं मूर्त जसें त्या
लोकांतर्गत राष्ट्रोत्साहभक्तिचें
तेंवि उठे ध्वनि प्रतिध्वनित " धर्मकी
—हिंदुधर्मकी जय ! जय रामचंद्रकी ! !"
प्रेमें जन पुनरागत त्या जनांप्रती
आलिंगू लागति चिरमिलित बंधुसे.
मादत रघुवीराच्या जयसुधारसें !
रामनाम सोमरसें राममयाचि ते
सकल गमत सकलांसी ! प्रीतिभरानें
आलिंगी जन जनास—हिंदु हिंदुला !

थोर कुणी म्हटलें ना पोर वा कुणी :
ब्राह्मण वा अंत्यज वा ! जातिजीवनीं

जीवभाव विरघळुनी मिसळल्या नद्या
सिंधुमध्यें निर्विशेष हिंदुतेचिया !
जयकृष्णा ! गोविंदा ! करीत जयजया ! !
चिरविरही बहिणीच्या बंधु आणि तैं
आईच्या सुत गळ्यांत घालिती गळा
आठवुनी म्लेंच्छांचे जाच—दुःख तें !—
बहु रडले करुनीया कंठ मोकळा.
परि त्या सकलांत जरी जातिमिलन तें

हसवी बहु, रडवी बहु, अधिक कुणाच्या
हृदयासी तरि तें त्या होय कविवरा
राजदूत तरुणाच्या ! ती गभीरही
प्रेक्षणीयशी मुद्रा भालविशाला
अनुवेदनरसित होय चंचला; जसा
सुखदुःखासी त्या, त्या लोकभावना
भावांसी बिंबविता स्वच्छ आरसा !
जातिमिलनमोदाचा प्रथम पूर कीं
ओझरता लव, उठुनी राजदूत तो
सर्वांसी नम्र नमस्कार करुनिया

बोले " हे बंधूंनो ! शुद्धि होउनी
आम्ही संस्कारहीन पुनरपि स्वयें
विप्रांहीं कृतसंस्कृत हिंदुविधीनें—
त्या आम्हां सर्वांसी देवतांमधें

प्रथम दर्शनीय दोन मुख्य देवता
अभिमानी ज्या विशिष्ट शुद्धिच्या अशा :
धर्माचा दंड, शिखा शक्तिचीचि जो
तो भगवा झेंडा हा एक; आणखी
दुसरी ती : जी दूरी दिसतसे तिथें
मग्न जुनी दुर्लक्षित : तीच समाधी !

पुनर्हिंदुकरणाचे जनिक विधी ते
जाहलेचि असती संपन्न आणखी
व्रात्यस्तोमादि इतर ऐच्छिकें व्रतें
होतिलची उचित तशीं पुढति : परी जें
रक्तासी; प्राणासी, हिंदु करित तें
मुख्य व्रत दर्शनची या समाधिचें !
कारण कीं ही समाधि जीर्ण तयाची
ज्याचें ना शेष आज नामही जनीं :
जो गेला केवल कर्तव्य करोनी ! !
    कीं तपोवनांत याचि कोंकणांतले

धर्मभक्त तेजस्वी विप्र जाहले
पुर्तुगिजांच्या पीडद शासनामधें
शुद्ध करुनि घेते बहु पतित जनांसी
गुप्तपणें अनुवत्सर एकदां पुढें
एकाएकींच गौप्य तें स्वशत्रुतें
कळुनि पुर्तुगिज ससैन्य पातलें तिथें !

आणि वेढुनीया त्या पतित जनांसी
पावक त्या विप्रांसह, हाय सर्वतः
सरसहाच कत्तलीस लागले करूं ! !
त्यासमयीं त्या पळापळींत एकदां

वीर एक गोसावी राहिला उभा !
आणि देत आव्हाना संगिनीप्रती,
खड्गाप्रति, खंजिराप्रति स्वशत्रुच्या
गर्जे : ‘ मज बलात्कार करुनि शैशवीं,
हो विधर्मदुष्ट दैत्य !, पळविलें तुम्हीं.
भ्रष्ट देह केलांती : हृदय परी हें
हिंदूचें हिंदूची राहिलें असे
आलों मी शास्त्राग्निस्पर्शविधीनें
पावन व्हायासि येथ : परि जरी तुम्ही
तें न रुचे तरि हाची धर्मसमरिंचा

शस्त्राग्निस्पर्श शुद्धिकार्य तें करो !
या, फाडा ह्या हृदासि ! बिंदु बिंदु तों
त्यांतिल अभ्रष्टशक्ति या पहा कसा
परमाणू परमाणूपर्यंत हिंदु तो ! ! ’

सत्य काय हें ? तेंची पाहण्या जसें
पुर्तुगीज संगिन त्या हृदयिं मोसके
ये भळभळ रक्ताचा पूर उसळता
प्राणांसह बाहेरी : साधु तो तरी :

हिंदू मी ! हिंदू मी ! होय गर्जता !
दैत्यहि त्या दचकतीच बघुनि अद्भुता ! !

त्याच हुतात्म्याची ही जीर्ण समाधी :
तो उभाच मज तेथें आजही दिसे :
भळभळभळ रक्ताचा पूर उसळतो
हिंदू मी, हिंदू मी, गर्जताचि तसे ! !
नांवहि ना उरलें कीं आज जयाचें
नांव चिरंतन झालें सत्य तयाचें !
नामरूप निजहुत तो करित तैं स्वयें
म्हणवि नामरूपा हें राष्ट्र आज ये—
क्लिशित वीरतेसि आणि वरियलें जयें.
देवो तो आम्हांसी धैर्य भक्तिचें

आणी हा भगवाध्वज बाहुशक्तिचें ! !
हें खोदुनि काढोनी हिंदुजातिच्या
हृदयावरि सत्य हेंचि कीं जगामधें
धर्माविण बल पाशव हें जसें खरें
पंगुधर्महि तसा बलाविना ठरे ! !

वदत असें राष्ट्रभक्त तो स्वयें तया
घालीं जाऊनि दंडवत समाधितें.
दंडवता तेव्हां ते अखिल लोकही
घालिति त्या साधु समाधीसि सोशिल्या
आणी त्या भगव्या झेंड्यासि झुंजल्या—

साधु आणि साधुपरित्राण सुव्रती
शक्ती ज्या उभय लोक उभय साधिती ! !

करुनि फलाहारासी मग यथोचिता
वनभोजन सकलांहीं रुचिर सारिलें.

तों धिमि धिमि वाजूं पखवाज लागले
टाळ मृदंगाचेहि गजर नादले.
तो समाज अवघा मग उंच पताका
फडकवीत, हरिच्या सुव्यूढ पंगती
धरित संघ संघ करुनि भजनकऱ्यांचे;
काढितसे दिंडी हरिनाममंगला.
भालीं चर्चोनि बुका, प्रेमभरानें
फुलमाळा कंठीं घालोनि सुगंधी
टाळ करीं नाम मुखीं गोड हरीचें
घेत गात नाचत नवमिळित बंधुही

त्या दिंडीमाजी मिसळोनि विराले :
पुनरपि ना व्हाया त्यांतुनि निराळे !
धिमि धिमि धिमि वाजति पखवाज पूत ते.
एकमुखें, एकहृदें, एकजण तसा
हिंदुमात्र गर्जत समरसितजीवनें
गोविंदा ! गोपाळा ! विठ्ठला ! विभो !
'नेती'ची प्रीतिकृता सगुण गीति ती
दिंडी ये गात गात भार्गवाप्रती

मग पारा भंवतीच्या त्या पटांगणीं
मृदु विचित्र आस्तीर्णा बैठकांवरी
लोक सर्व तो घे विश्राम येउनी
हारतुरे पानसुपारीसि वांटुनी
नव गुलाबपाणी सिंचूनि सुगंधी
उंची तीं अत्तरेंहि लाविलीं जनीं
आणि समारंभ विसर्जन असे असें
कथिलेंही मुख्यांहीं: तरिहि लोक ते

जाऊं उठती न घरा. परि पुन: पुन्हां
प्रार्थिति कीं आश्वासन काल दिलें तें
वृत्त राजदूतांचें इच्छितों श्रवूं !
मुख्यहि मग लोकेच्छा उत्कटा, तशी
पाहुनियां साग्रह त्या पाहुण्यांप्रती
वदति वृत्त सांगाची ! श्रीप्रधानही
पत्रीं मज लिहिती सुश्राव्य तें असें.
म्लेंच्छदेश बघुनि विविध जातिरीतितें
अवलोकन केलें बहु; संकटांप्रती
भोगियले, हारविले, पुरुषवरें ज्या;

ज्यानें श्रीभाऊंच्या प्रीतितें स्वत:
रणिं अद्भुत करुनि पराक्रम उपार्जिलें :
क्रूर कडाप्प्याचें रण माजतां स्वयें
तो नबाबची चिरुनी काढिला उभा

चढत्या तरवारीसह हातच्या जयें:—
त्या तुमचें राजदूत ! वृत्त परिसण्या
—लोक कां न लोलुप हो ! वीरवृत्त तों—
अन्य कवी कथिति जनीं : परि तुम्हांहुनी
कवण येथ कविहि वदा अधिक कुशलसा ?
वीरमणिहि तुम्ही : कविमणिहि तुम्हींचीं :

एकेंची रत्नमणिद्वयही दृढपिणें !—
हावरेपणासि असा दंड हाच कीं
निजवृत्ता निजमुखेंचि कथन करावें.
जरि आहे तेंचि कृत्य लोकाहिताचें
तरि कार्यचि अनुरंजन लोकमताचें.
सुखदु:खें सहृदयांसि सांगण्या नवीं
उत्सुकता वसत कुण्या अंतरीं नसे !
विनय, बुद्धिवा, बांधी बांधही तरी
स्निग्धाग्रह तेव्हांची कोसळीतसे ! !
उठत वरी तो मग गंभीरपणानें

तरुण राजदूत दर्शनीय गज तसा;
दृष्टि तरी अंतुर्मुख ती तशीच कीं
दिसत; जशी दिसली पाहिल्याच पासुनी :
इतुक्याही जात्युत्सव भाव–भावना
मध्येंही मुद्रेवरि त्या युव्यांचिया
चंचलतेतुनि अंत:स्थिर विषण्णता

पृष्ठभूमि चित्रांतुनि, तेंवि दिसावी.
ईषत्स्मित वदनावरि झळकलें, परी
सौख्याचें ? दुःखाचें ? कां उदासची ?
"काय कथूं ? कोठुनिया ? तरिहि आपुली

आज्ञा ती म्हणुनि कथन विहितची असे.
बंधूंनो ! आहे मज मित्र एक जो
जिवलगची ना परंतु जीवची असे
आस्मृति तो साथी प्रिय मजासि होता.
त्याचेंची वृत्त मनोरंजनीयसें
श्रवणाहे प्रथम आपणांस मज गमे
आनुषंगिका क्रमेंचि मम कथाहि तो
घेइलची प्रस्फुटता तत्कथेमधें.
तो माझा मित्र एक दिवसिं शैशवीं
आईच्या पदरासी धरुनि ' चल नं तूं !—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

गेहासी चल नं ! ' अशा बोबड्या वचीं
होता जों ओढित तों क्रूर कोणसा
हस्त तया हिसडुनि दे दूर ढकलुनी :
आणि क्षणीं आगीचे डोंब उठोनी
परिसरतें अवघेंची लागलें जळूं !
मूळचि तें ! प्यालें ना दूधही पुरें
तों त्यासी जननी वा जनक ना उरे ! !
वय असेल चौदावें लागलें तया :

तेव्हां तो एक दिनीं जलधितटासी,
गोव्याच्या लगत, सहज बोलला तया

भेटाया जी येई मधुनि मधुनिया
त्या एका प्रौढा बाईसि दयाळा :
‘ काकू ! हे लोक मला जे लुई लुई
वदती तें मज न रुचे नांव कां बरें ? ’
बाई ती हांसुनिया तुष्ट बोलली
‘ बाळा ! मग नांव तुला कोणतें रुचे ?
शंकर तुज मी वदेन : रुचत नांव तें ? ’
ऐकतांचि त्या नामा कवण अजाणा
पूर्वस्मृति अस्फुटशा उमटुनी हृदीं
नेत्रीं त्या पोराच्या आंसवें उभीं—

राहियलीं ना कळतां : “ हाय रे खुळ्या !
इतुकें तें काय त्यांत ! तुजसि यापुढें
शंकरची मी वदेन ’ वदुनियां असें
ती साध्वी त्या गरीब बालकाप्रती
घे जवळी प्रेमानें : ‘ शंकरा ! परी
अंतुनिच्या देखत हें नांव आपलें
बोलुं नकोसी हो तें ! ’ ‘ कां तरी न तें ? ’
जिज्ञासे बालक तो. ‘ हा खुळ्या ! तुला
सांगतेंचि आतां घे गौप्य जें हृदीं
आजवरि म्यां पुरिलें ठेव कीं जशी :

बाळा तूं पहिलीची म्हणुनि जी स्मृती
कथिसि तुझी कैं कैं मज तींत हस्त जो
क्रूर तुला आईच्या पासुनी दुरी
हिसडुनि दे आणी दे पेटवूनि ते
आगीचे डोंब दुष्ट : दुष्ट हस्त तो—
हस्त अंतुनीचाची होय ह्या मुला !!
ह्यानेंची तव माता भ्रष्टवुनि बळें
भ्रष्टविलें तुजही तव धर्म भंगुनी.
हिंदु तुझी माता : तव हिंदुची पिता :
त्यांतुनिही ब्रह्मबीज ! परि पिता तुझा

आगीच्या त्याची ज्वाळांत घे उडी :
आणि तुझी माता आगींत पेटल्या
स्वांगासी विझवूं दे सागरीं बुडी !—
निरवूनी मजसि तुला सांगण्यासि हें
योग्य समय येतांची गुह्य कुलाचें.
त्यावरती अंतुनि तुज खिस्त विधीनें
सिंचुनि जल तें अभिधा देत लुई ही
आणि दास करुनि ठेवि तुज निजीं गृहीं
शिंपडितां जळ वाढे बीज जगीं तें !
शिंपडितां जळ हें परि बीज भाजतें !

म्हणुनि अमंगल ते संस्कार पुसोनी
मी मंगल संस्कारा तव मनावरी

आलें कीं आशैशव कारित कथोनी
तुज नाना रम्य कथा देवकुळाच्या
रामाच्या, सीतेच्या, गोकुळिच्या त्या
नंदनंदनाच्या ज्या परमपावना.
बाबा ! त्या देवकुळीं जन्म आपुला !
बाबा ! तो वंश तुझा : धर्म तो तुझा ! !
धर्म दुजे शिंपडिती जळ : परी तुझा
धर्म सिंचि अमृतासी ! तेंच पिईं जा ! !

पण बाळा हें सारें वृत्त गुप्तची
राख बरें, राख निखाऱ्यासि कीं जशी,
अनुकूल न जोंवरि ये काल तोंवरि.
असमयासि सत्कृति ही करि बळाचिया
बीजाच्या कृषि तशीच ती अपव्यया.
योग्य संधि साधुनि ती शीघ्रची स्वयें
दोघेही दास्यमुक्त होउं निर्भयें.'
परिसत तें उत्क्षोभक वृत्त गुप्तची
बाळाच्या प्रतिशब्दा प्रश्नशत उठे
परि अंतीं त्यांत अंतिमचि परिस्फुटे:

'काकू तरि तूंही कां दास्यपंजरीं
मजसमची निगृहिता ? तरि कशी ? कधीं ?
आई मम कैं भेटे ? सांग: सांगची :
'एक मुला.' वृद्ध पिढी निज अपूर्णशा

आशांसी पूर्ण करूं, आणि भोगिल्या
पीडांची फेड करूं, नव पिढीविना
कवणा सांगेल दुज्या दुःख आपलें !
ऐक तरी : हिंदू तूं, दुःख हिंदुचें :
साष्टीच्या लगत मूळ गांव मम असे.
वंश मराठी; देती बघुनि वराही

बाराव्या वर्षीं मज देशमुखांसी
नवतीचा भर येतां मजवरी ठरूं
रूप न दे कोणाची दृष्ट पलभरी.
गौरीच्या दिवसांमधिं एक दिनीं जों
हळदकुंकवासि अन्य योषितांमधें
मी आणी जाऊ मम एक समवया
होतों हंस हंसत जात मैत्रिणी—घरीं :
एकाएकींच पुर्तुगीज लांडगे
हरणीच्या त्या कळपावरति आमुच्या
तुटुनि पडुनि सुंदर त्या आठ वा दहा

नेति मुलींसी, जाऊबाइसी, मला.
त्या रात्रीं आम्हां दोघांसि दैव ज्या
एकाच्या एकत्रचि हस्तिं सोंपवी
त्या कामोद्दीपासी बाइ म्हणाल्या :
‘ तूं सुगौर ! मी लुब्धा; तुजहुनीहि ही !
परि रजान्त दिन आजी म्हणुनि न्हाउनी

संग करूं प्रीतीनें ये विहीर ही
दे जल तें आणोनी कामलुब्ध तो
जों विहिरीवरि जलार्थ राहिला उभा
तों धाडस करुनी आबाल्य धाडसी

जाऊ मम दे दैत्या धाडकनी त्या
विहिरींतचि ढकलूनि ! आणि मत्करा
धरुनि वनीं मजसह ती शिरत सत्वरें .
त्या रात्रीं छपत छपत जों न उजाडे
तो माझी जाउ महाधीट ती स्वयें
मज घेउनि ये ग्रामा परत आमुच्या.
आनंदें कल्पित अन्योन्य कीं कसें
अभिनंदन शौर्याचें आमच्या अशा
करितिल ते ग्रामवृद्ध, सासुसासरे,
प्रिय सखे, सखीहि, मुदित वानुवानुनी :

—आनंदें कल्पित तें जों न उजाडे
तों घरासि येऊनियां राहिलों उभ्या.
गाई बघतांच अम्हां हंबरल्या त्या
प्रतिपालित वासुरेंहि चाटुं लागलीं
मग उठुनी जन घरचे दारचे क्रमें
लागतांचि येऊं बाहेरि आम्ही ही
सुखदुःखोद्वेगें अतिमात्र भुकेल्या
प्रियकंठीं पडुनीयां मोकळें रडूं

गेलों सस्मेर वंदनासि कराया.
तों एकचि दूर ! दूर ! उसळला ध्वनी :

क्रूर कुण्या श्वापदासि पाहुनी जसे
आरोळा उठवित जन देति हुसकुनी
तेंवि, मुला, आम्हासी हाय आमचे
प्रियजनची देती हुसकूनि सर्वथा !
शपथेवरि कथिलें बहु अश्रुसिक्त म्यां
तें वारंवार वृत्त उभयशुद्धिचें
परि एकचि निर्दय निर्लज्ज ये ध्वनी
ग्रामांतुनि ‘ जा ! काळें तोंड करा ! जा ! ’
घेतांना परत आम्हि रान, परत त्या
गाई बहु हंबरल्या प्रेमभरानें,

वासुरेंहि चाटाया थांबलीं जरा,
—परि न गुराखी आम्हां थांब बोलला ! !
गेलों मग रानीं त्या निस्सहायशा
रात्रभरी रडलों अन्योन्य लगटुनी.
तेजस्वी जाऊ ती मग म्हणे मला
‘ आम्ही तरि रडणें कां ? तें पुरें करा.
लाज जरी हो बाई ! लांब मिशांसी
धरित्या त्या मेल्या पुरुषांसि ना गमे
तरि वाटो आम्हां तरि लाज कां अशी !
जाऊं या गोव्यासचि ! अप्सरांसही—

लाजविती ही तरुणा रूपसंपदा :
आर्जवित्या त्या प्रबला पुर्तुगिजांच्या
गेहींची होणारें चीज कीं तिचें
या मेल्या क्लीबांचया सोवळ्या घरीं
रडत नांदण्याहूनी ! हां उठा झणीं ! !'
'छे ! छे ! मी कुरवाळित बोललें तिला :
'बाई ! हें काय वदा ! म्लेंछ ते वनीं
आम्हांसी संगबळें करिति वा न वा
तो यावा कैसा विश्वास समाजा
आमुच्याचि कथनानें ? वंशहितार्थी—
व्यक्तीची त्याज्य ठरे; भ्रष्ट ती तरी.'
तो उसळुनि मध्येंचि सुंदरी पुन्हां
रागें फणफणली : 'वा भ्रष्ट कोण तें ?'
जाणसि तूं अस्पृष्टा सेज आपुली !
परि जरि ती असतीही स्पृष्ट बळानें
तरि कां तें भ्रष्टवितें कर्म आपणां ?
बाई ज्या अन्य सख्या काल पळविल्या
त्यावरती आस्कंदन कृतचि रिपूनें !
तरि त्यांसी भ्रष्ट म्हणुनि काय मानणें ?
ज्या ज्या स्त्रीप्रति अविंध पळवुनी बळें
आस्कंदी, ती ती स्त्री भ्रष्ट ना--परी
भ्रष्ट तिचा पतिच होय : जो न रक्षि ते ! !

१ आस्कंदन—बलात्कारभोग.

सिंहाची स्त्री कोल्हा पळविना कधीं
हे मेले कोल्ह्याहुनि भ्याड आपुल्या
अनुरक्ता भार्याही रक्षुं शकति ना,
तरि योषिद्धस्तीं भरितां न, आपुल्या
हस्तींची बांगड्यांसि भरति ते न कां !
मग आम्ही तरि घेतों खड्ग या करीं;
कोल्ह्यांसी ऐट मात्र कोण सिंहशी !
काय म्हणे दूषित कुल—गेह होतसे !

अर्धांगी अनुरक्ता दृष्टिसमोरी
नेतां पर जे जिवंत परतले घरीं
ते गृह ना दूषविती, नां समाजही !
परि पुरुषहि ज्या मारूं शकति ना तया
धर्मशत्रुसी बघुनी निजसतित्व जे
अक्षुण्णा स्वगृहासी परत आणिते
भ्रष्टवी गृहासि समाजासि सती ते ! !
अर्धांगी साध्वी, जरि परबलाकृता,
निज शेजे घेतां तिज परत ती घृणा :
आणि जरी ती तशीच धर्मशत्रुच्या

मंचकींच लोळे तरि तो कलंक ना ! !
थू : ऐशा शास्त्रावरि ! थू : जिण्यावरी '
निष्पाप क्रोधासी संथवित तिच्या
वदलें मी कुरवाळुनि: 'तें खरें; तरी

हो बाई जे राक्षस दुर्बळा अशा
निरुपद्रवशीलांहीं गांजुनी बळें
नेति हरुनि त्याच्या आक्रोशत्या स्त्रिया
मानुनियां धर्म तोचि : त्यांचिया तया
आसुरतेहुनि न बहिष्काररीति ही
हिंदूंची अक्षम्या वा अमानुषी.

सहनशीलता अतिशय सत्य करंटी :
काय उपद्रवद–शीलताहि गोमटी ?
मग मेल्या त्या नराधमासि शत्रु जे
धर्माचें, ज्ञातीचें आणि कुळाचें,
त्यांसि कसें वदणें वरणीय सुखानें !
निजजाति प्रियतमाचि जगतिं जिवांसी
निजजननी वेडी वांकुडिहि ती जशी.
त्याग किती हा ! परंतु जरि वधासही
स्वजन करी अपराधाविणही तरी
मरतांना त्या स्वजनांच्याचि मंगला

प्रार्थित कीं जावा हा देह सोडिला.
तरि भक्षुनि कंदमूल जें मिळेल तें
नेऊं ह्या आयुष्या ह्या वनामधें '
टपटपटप गाळीत ती आंसवें अरे
जाऊ मम वदली मज चुंबितां : " खरें ! "
थोड्याची दिवशीं ' सद्धर्म तिथेंही

हाय येइ नरमृगया करित परीरे !
ख्रिस्ताचे उपदेशक शस्त्र धरोनी
बागनेटच्या अग्रे बायबलासी
कोराया हृदयावरि ' हीदनांचिया '[1]—
जी पलटणपावन उभवीति : तीच ही !
आरोळा उठतांची हाय घेउनी,
दोघींही ग्रामासी धावलों, परी
दारेंही वेशीचीं उघडिना कुणी !
मग हाणित मारित करकच्च बांधिती
हिंदु सावजासह अन्यान्य अम्हांही
मार्गांची कामाग्निंत आपुल्या बळी
देउनि ते ' संत ' बळें देह आमचे
मग गोव्यांतील हाट मुख्य जो तिथें
नेती आम्हासि पृथक् बांध बांधुनी
दाव्यांनीं प्रत्यक्षचि पशु तसे, मुला !
भाजी हाटांत जशी लोक पडवळें
तैसे आम्हांसि विकूं तेथ लागले.
मूल नेत विकत कुणी, आइसि दुजा :
भावासी एक, पतिसि एक, तिज तिजा
दाव्यांनीं खेचितरे, त्या दयामया
छायेंतचि येशूच्या मंदिराचिया
सत्यधर्मविहितकर्म समजुनीच या !

१ हीदन–Heathen हें विधर्मी व विजातीयांस निंदाव्यंजक विशेषण ख्रिस्ती लोक देत. जसे मुसलमान हिंदूनां काफर म्हणतात तसे.

नेलें मज एकानें तीस रुपाया
अन्यानें जाऊनी ! हायरे हृदीं—

जाऊ ती जातां जाऊचि जीव हा
झाला मम—अंतरली पोर ती जधीं !
परि चिर ना तेजस्वी आग ती छपे
दुःखाच्या इंधनांत हृदयिं त्या तिच्या
उठली भडकूनि क्षणीं : जो तिला अणी
ने गुलाम करुनि एक पादरी घरीं
त्यासी ती ठार करी खुपसुनी सुरी !
बांधुनियां मग गाडिसि धांवत्या तिला
गोव्यांतुनि मार्गीं फरपटत ओढिली
तों ख्रिस्तीभक्तांची त्या स्थितींतही

निंदा ती अधिकचि कीं चिडुनियां करी.
तेव्हां त्या घायाळा रक्त ओकत्या
तरुणीसी ते तशीच टाकिती बळें
‘ सांतकाज ’—मधल्या त्या भयद भुयारीं
लेश वायु वा प्रकाश नव न सोडितां
सांतकाजच्या—तया ‘ पवित्रगृहा’च्या
मध्यें अन्यान्य हिंदुबंदि जे तयां
आज क्वचित् जेंवि तसें नित्यचीं तदा
दगडांवरि आपटुनी कीं धुणीं जशीं,
बडवुनियां कणसांसम, भयद भुयारीं

१ सांतकाजच्या धर्मछळाचें हें वर्णन पुर्तुगिजांच्या इतिहासास अक्षरशः धरून आहे.

नवजलान्न वायु तेजरिक्त कोंडुनी,
अंतीं जैं आणिति ह्या वधशिळेकडे :
तैं तिजही त्यामधेंचि आणिली तिथें.
मग जो जो क्लिष्टजीव खिस्तजला पी
तो सुटला:—परि होती त्यांमधें न ते !—
ते होती धर्मवीर उरति जे तिथें ! !
मग पाडुनि तिज खालें पादरी बसे
छातिमधें गुडघा रोवूनि तीवरी
आघाता आणि करित त्या हृदावरी
गर्जे " जेंतीव !—' ' भूत ' बोल कोण तूं

कवण कुपथ धर्म तुझा मरसि समजुनी ! ! "
कवळें तें वक्ष अरे ! भार ना सहूं
शिकलें जें दूधपित्या अजुनि मुलाचा !
त्यावक्षीं तो, रेडा अंबुजीं तसा;
चढुनि वदे ' जेंतीवा ! बोल रे झणीं
कवण कुपथ धर्म तुझा मरसि समजुनि ! '
' गोविंदा ! गोपाला ! ! हे दयामया !
कृष्ण कन्हय्या देवा कृष्ण कन्हय्या !—
नाद मुखांतुनि ये मधु सुंदरीचिया ! !
मग कापुनि हात तिचे जाळिले पुढें

अस्थि घणाखालीं चेंचूनि संधिचे
गुढघ्याचे, घोंट्याचे; ठेंच ठेचुनी

अंतीं मग गच्च कंठनाल दाबिला :
जों जाई गुदमरुनी जीव तडफडा ! ! !
ती मारी एकतरी पुर्तुगिज खरी :
परि ज्यांनीं एक पिसूंही न मारिली.
पुर्तुगिजांची प्रत्याघात करुनिया,
जे केवल हिंदुधर्म राखण्याचिया
दोषें अभियुक्त—तेहि मरति असेची ! !
अक्षरशः हाल हाल होत तसेची ! ! !

सांतकाजचे आले संत हे असे
अर्पित रक्तांत धुवुनि येशुच्या पदा
नरमांसाच्या नैवेद्यासि नव सदा !
माझी गति भिन्न होय. विकत ने मला,
जो गुलाम करुनी तो तरुण भावडा
पुर्तुगीज आपणची कीं गुलामरे
माझ्या नवरूपाचा शीघ्र होतसे
म्हणुनि मला तूं ख्रिस्ती हिंदु वा अमा
प्रश्नही न कवण करी तोंचि अकस्मात्
जाऊच्या वीरतेसी अद्भुता तया

परिसिगलें म्यां हाटीं शीघ्र मानसीं
माझ्याही करुनि तसें अंत जिवाचा
तेसाची करण्याची स्फूर्ति उदेली !
तैं माझ्या सेवेसी एक वृद्ध जी

स्त्री नियुक्त इंगितज्ञ ती वदे मळा
' ऐक मुली ! मी हिंदू. देह बाटला,
—परि मरती त्यांचाही भ्रष्ट देह तो
करतीची रिपु आधीं!—हृदय आणखी
भ्रष्ट कुणी करुं शके न. हृदय हें असे
जे मेले त्यांसमची हिंदु आपुलें—

मग मरतां कां सर्वचि हिंदु बळानें ?
कार्य मुली खलयुद्धीं होत छलानें !
जे मेले धन्याचि ते ! धर्म—ऋणातें
तात्काळचि फेडिति ते गणुनि पै न पै :
परि अधन्याचि हे ना उरति जे जिते
—जरि हृदयीं हे धर्मा पूजिती सदा
आणि जरी धर्मजया जीवना निजा
अर्पिति हे, ते जैसे मृत्युसी निजा.
धर्मऋणा,, तत्काल न तरिहि, पूर्णतः
फेडिंतीच हेही सव्याज पै न पै !—

प्रत्याघाता न शक्त वीर जो मरे
तो अन्यायासि वांझ करित त्या क्षणीं :
प्रत्याघातासि शक्त व्हावया उरे
तो अन्यायासि ठार मारितो रणीं
जाऊं तव मारुनियां जातिवैरि तो
व्यक्तिप्रतिकारधर्म जात करुनियां.

आणि पुनः पुनरपि या वीरतेमुळें
व्यक्तिप्रतिकारांच्या, हिंदुजनांची
आहे याहुनिहि घोरतर नसे दशा
जन सापा सहज भीति; ना तसे सशा.

जरि राष्ट्र--प्रतिकारची पूर्णपणें ह्या
निःपाता करुं शकेल राक्षसांचिया
तरि तूं हा राष्ट्रप्रतीकारधर्मची
मृत्युसी न भिउनी, परि सफल त्या करूं
आचरि ये असाशिल जरि सिद्ध मृत्युतें
पीडा त्या घोर सांतकाजच्या सहूं
सुसहहि ना सर्वत्रा लाभदहि सदा :
कीं खल जे करिती छल त्यांहुनीहि त्यां
छलकांसिच छल सोसूं लावण्या शके
ऐसाची धर्म मुळी नित्य यशस्वी. ’

मजसी तो शब्द शब्द वेदवाक्यसा
गमुनि तिचा झालें मी शपथबद्ध रे
धर्मजया तद्दर्शित जाउं पथेंची.
ती वदली ‘ ऐक तरी : देह विटाळे ?
तरि तूं तव हृदयमंदिरांत मूर्ति ती
श्रीरामस्मृतिची नेऊनि रक्षि जा :
रक्षियली श्रीशांतादेविची जशी
नेउनि तैं गव्हरांत विप्रवरीं त्या

जैं अविंध पूर्वी तत्क्षेत्र मंगिती !
आणि बळें ख्रिस्तविधी जे करूं पडे

तें स्वयेंचि करि जा, जा प्रार्थनेसही
चर्चांतुनि : सत्य सनातन असेल जें
तत्व वैदिकाचि तें; तें ऐक भक्तिनें :
जें धार्मिक ढोंग मात्र, रक्तपिपासू
सैतानध्वनि जो सुरांत ईश्वरी;—
तो तो तूं धिक्कारित विसर तिथेंचि !
आणि तुला तरुण मुलें आढळतीं जीं
भ्रष्ट हिंदुपितरांचीं गुप्त भेट त्या :
सांगत जा कोणाचे कोण ते तयां
सांगत जा शिकविति पाखंड तुम्हांला

सांगत जा राष्ट्रधर्म कवण आपला
सांगत जा रावण तो केवि मातला—
सांगत जा रामानें केंवि मारला.
जे भ्रष्टति बलविभीत ते न शत्रुता
हिंदूंची करिति पुरी : शत्रुता परी
भ्रष्टांची ही दुसरी करितसे पिढी
त्यावरीच अवलंबन करिति विधर्मी :
त्याप्रतीच फोडुनि, ठक ठकविणें अम्ही
कुशल यत्न ऐसे फळतातही बहू :
म्यांचि दहा तरुण तरी भ्रष्टकुळांचे

पाखंडी शिक्षेचें ढोंग उघडुनी
आणखी स्वधर्मभक्त बनवुनी पुन्हां
असतील प्रेषियले **सांवताकडे**
हिंदुत्वास्तव रणांत उघड झुंजण्या !
कूटाचे प्रमुख, मुली, आपुल्या तुम्हा–
आम्हांहुनि थोर थोर गुप्त हे इथें;
ते सांवत, घोरपडे, पेशवे तिथें :
त्या दिवसांपासूनी त्याच पथानें
आलें मी झटत यथाशक्ति शंकरा
तोंच महाराष्ट्रधर्मवीर दिग्जयी

ये बाजीराव स्वातंत्र्य–संगरा
कोंकणभू–सिंधु–मरी झुंजवूं उभ्या.
त्या युद्धीं कूटाचे प्रमुख आमुच्या
शत्रूच्या शिबिरांतिल वृत्त कळवुनी,
जनतेसी चेतवुनी, आणि पुरवुनी
हिंदूंच्या छावण्यासि तरुण सैनिका
गुप्तपणें ज्या आम्हीं शिकविलें इथें
—करिति शक्य ती सेवा छत्रपतीची.
त्या समयासचि माता लाडक्या तुझी
म्लेंच्छाचें बळपीडन असह होउनी

अर्पी तुज मत्करांत वदत 'मी मरे :
परि घ्यावी ह्या देवासुररणांगणीं

आमुचिया वंशाची हीच वर्गणी !'

त्या युद्धीं अखिल सिंधुतट अहिंदुच्या
हस्तांतुनि करिति मुक्त हिंदुवीर ते
कोस पांचशावरि ह्या पूर्तुगिजांच्या
करिं होतें हिंदुतीर : त्यांत आजला
कोस पांचही नुरती तत्करीं पुरे !
पाखंडीपीठांतुनि वेद पढविले.
भग्न क्षेत्रांसि पुन्हां कळस चढविले.

आणि पांच कोसहि हे परकरांमधें
राहते न गोव्याचे जरि उदंड तीं
तटतीं ना उत्तरेस राजकारणें !
घाव असा राष्ट्राच्या भरत ये जरी
देहाचा आज, तरी घाव हाय रे
आत्म्याचा अजुनी रक्ताळ तसाची !
तो आतां भरणें : जे भ्रष्ट रिपुबळें
त्यांसि शुद्ध करुनि पुन्हां, पाजुनी पुन्हां
अमृतासि धर्माच्या या सनातना :
पौराणिक अद्भुत आख्यान कवण कीं

तैसें त्या साध्वीचें कथन विस्मितें
चित्तें एकाग्रशा किशोर तो श्रवी
आणि पुसे अत्युत्सुक ' तरि मलाहि तूं
धाडुनि कां गुप्तपणें छत्रपतींच्या

छावणींत देशीना ? बंदुकींतला
बार कधीं माझा मृगयेंत चुकता ना,
वा घोड्यावरली ही मांड ढळेना.
वीर किशोराच्या त्या सहज सतेजा
धीट उतावळिसी पाहूनि कौतुकें
साध्वी ती वदनावरि हात फिरवुनी

आश्वासी ' सिंव्हाच्या छावणीं प्रती
छाव्या ! तुज देइनची धाडुनी बरें.—
शीघ्रचि जैं गोव्यावरि अंतिमचाची
करण्यास्तव आक्रम निघतील पेशवे.
परि कारस्थान न परिपक्व अजुनि तें
उत्तर—कर्नाट वेध सबळ होति जों
तोंवरती अनुसंधानार्थ त्याच कीं
परि दिशेसि अन्य एक कार्य कार्य तें
जाणसि तूं किति सज्जन मम धनी असे
पुर्तुगीज असुनिहि तो हिंदुजनांचा

छळ पाहुनि हळहळतो हिंदु तसाची
अर्ध्या वचनांत माझिया सदा वसे
दास असें मज वा तुज समजताचि नसे.
त्याच्याची आधारें शस्त्रकलेचें
शिक्षण तुम्हांस शके द्यावयास मी
जरि न गुप्त हेतु त्यांतला तया कळे.

तो आतां परत मातृभूमिसी निजा
भेटाया यूरोपीं जात आणखी
मीहि तयासह यावें म्हणुनि आग्रहा
अत्यंतिक करित असे; मजहि ते मनीं

यूरोपभ्रमण लाभकारकचि गमे
पुर्तुगिजादिक यूरोपीय बळ कसें :
सद्गुण ते दुर्गुण ते कोणते किती :
पातालामध्यें या पूर्तुगिजांची.
राज्यें कां कोलंबीयादि सत्यची :
गुप्त गृहाच्छिद्रें वा कोणतीं कशीं. :
तें प्रत्यक्षचि पाहुनि परत आपल्या
मातृभूसि यावें हें इष्टची असें;
चल तूंही मजसह तरि. शत्रुच्याचि कीं
आखाड्यामध्यें अज्ञात जें इथें. –

शीक पेंच ते ते तूं सर्व आणखी
शिकिव परत येउनि निज जातिबांधवा
कच–देवासुरयुद्धीं जेंवि तेधवां.
बाळा या युरोपासहाचि अखेरीं.
मल्लयुद्ध हिंदूंसी झगडणें असें
चल तूं तरि मजसंगें. प्रिय तुझ्या मुखा
पाहत भोगीन विदेशांत गृहसुखा.
शीघ्रचि मी अंतुनिच्या तुज करांतुनी

छावणींत देशीना ? बंदुकींतला
बार कधीं माझा मृगयेंत चुकता ना,
वा घोड्यावरली ही मांड ढळेना.
वीर किशोराच्या त्या सहज सतेजा
धीट उतावळिसी पाहूनि कौतुकें
साध्वी ती वदनावरि हात फिरवुनी

आश्वासी ' सिंव्हाच्या छावणीं प्रती
छाव्या ! तुज देइनची धाडुनी बरें.—
शीघ्रचि जैं गोव्यावरि अंतिमचाची
करण्यास्तव आक्रम निघतील पेशवे.
परि कारस्थान न परिपक्क अजुनि तें
उत्तर–कर्नाट वेध सबळ होति जों
तोंवरती अनुसंधानार्थ त्याच कीं
परि दिशेसि अन्य एक कार्य कार्य तें
जाणासि तूं किति सज्जन मम धनी असे
पुर्तुगीज असुनिहि तो हिंदुजनांचा

छळ पाहुनि हळहळतो हिंदु तसाची
अर्ध्या वचनांत माझिया सदा वसे
दास असें मज वा तुज समजताचि नसे.
त्याच्याची आधारें शस्त्रकलेचें
शिक्षण तुम्हांस शके द्यावयास मी
जार न गुप्त हेतु त्यांतला तया कळे.

तो आतां परत मातृभूमिसी निजा
भेटाया यूरोपीं जात आणखी
मीहि तयासह यावें म्हणुनि आग्रहा
अत्यंतिक करित असे; मजहि ते मनीं

यूरोपभ्रमण लाभकारकचि गमे
पुर्तुगिजादिक यूरोपीय बळ कसें :
सद्गुण ते दुर्गुण ते कोणते किती :
पातालामध्यें या पुर्तुगिजांची.
राज्यें कां कोलंबीयादि सत्यची :
गुप्त गृहाच्छिद्रें वा कोणतीं कशीं.:
तें प्रत्यक्षचि पाहुनि परत आपल्या
मातृभूसि यावें हें इष्टची असें;
चल तूंही मजसह तरि. शत्रुच्याचि कीं
आखाड्यामध्यें अज्ञात जें इथें. –

शीक पेंच ते ते तूं सर्व आणखी
शिकिव परत येउनि निज जातिबांधवा
कच–देवासुरयुद्धीं जेंवि तेधवां.
बाळा या युरोपासहाचि अखेरीं.
मल्लयुद्ध हिंदूसी झगडणें असें
चल तूं तरि मजसंगें. प्रिय तुझ्या मुखा
पाहत भोगीन विदेशांत गृहसुखा.
शीघ्रचि मी अंतुनिच्या तुज करांतुनी

विकत घेववीन धन्याकडुनि माझिया
मात्र तोंवरी न शब्द हृद्गतांतला

ओठाच्या वरि देणें येऊंच शंकरा !
 अल्पावधि नंतर मग सागरावरी
शंकर त्या साध्वीसह पर्यटणा ये
अर्णव तो ! अंबर तें ! विश्वशक्ति ज्या !
प्रत्यक्षचि त्यांमध्यें राहिला उभा
प्रथमाचि अणुबिंदुसा किशोर तो तिथें
प्रत्यन्हीं प्रातःसंध्येसि तो करी
अत्युदार संस्कार—स्तिमित—वंदना :
“ हे अनंत उच्च विरलनील अंबरा
हे अनंत खोल तरल नील सागरा !

अणु हा महतांसीं प्रणमीत तुम्हाला ! ! ”
नाना रमणीय कथा साध्विमुखानें
अंबुराशिमथनाच्या, सिंधुसेतुच्या
प्रभवाच्या, प्रळयाच्या, परिसतां मुदें
नाना आकाश वायु जल—गतिस्थिती
द्वीपपुंज रीतिभाति भूरि विभाषा
अवलोकित अनुभवीत तो किशोर ये.
तारूं ज्या सिंधुद्वारांसि[१] ये पथीं—
तेथींचें मूलवृत्त बहुत शोधुनी
हिंदुवसाहति कथांसि तेथल्या जुन्या

१ सिंधुद्वार—बंदर.

हिंदुगलबतामधल्या हिंदु नाविकां—
पासुनि अभिमानमुदित चित्त ऐकिलें.
ऐकियलें पुर्तुगीज सिंधुशौर्य तें
ऐकियलें कैसें वा हिंदभूमिचा
मार्ग देत दावुनिया हिंदु तिमय्या
अंत करूं इस्लामी क्रौर्य तहूलें.
खंड खंड पुर्तुगिजा कैंवि थरथरे
हेंही अवलोकियलें : हेंहि कीं कसें
यूरोपी स्पर्धा शैथिल्य आंतलें,
सत्तेच्या पुर्तुगिजांच्या क्षया करी

आणि कसे पूर्वेंतिल पाय उखडुनी
करित महाराष्ट्रीं आघात ती ढिली :
वसईचें आप्पांचें नांव ऐकुनी
अफ्रिकेचियाहि पुढें जनमुखांतुनी
तो किशोर अभिमानें फुलतसे मनीं
हिंदूचें सिंधुयानबळ कधीं असें
होईल दिग्व्यापी तें बहुत चिंतुनी
आक्रमुनी अफ्रिकीय भूशिराप्रती
अतलांतीं घे प्रवेश सिंधुयान तें
जात जात सायंकालासि एकदां

शेतासम एखाद्या रुंद लांब ये
एक भयंकर तिमि उसळूनि अकस्मात्

पाठलाग करित तडक मागुनी तया
उसळत ये जळ उचंबळूनि अंबरीं
शिखरासम एक तिमिंगिलहि सागरीं !
चंड जळचरेंहि भयें दूर पळालीं
कोस कोस बघुनि झुंज ती भयंकरा.
सिंधुयानही दृश्या भीषणा तया
पाहुनियां लव थबके. तैं किशोर तो
वदत अहा, काकू हे मत्स्य आपलें

जीवन नेतात तरी केंवि अशा ह्या
हिंसा प्रतिहिंसामय सागरामधें
हसली ती लव उदास, 'हा खुळ्या अरे !
मनुज जेंवि भूवरती ! न्यूनतर परी
जातिजातिमध्येंही जीवनार्थ वा
बळशक्तित्वार्थ कलह हाचि भूवरी !'
तों सहसाची बिगूल भीतिसूचना
वाजवीत खडबडुनी उडत नौवरी
पुर्तुगीज गलबतासि आंग्ल लुटारू
चांच्याचें गलबत झडपूनिया धरी

हाणमार, धरपकडी, बार, टक्करा
त्या घंटा, बिगुलें, अंधार, गलबला
आरोळ्या, कण्ह, रक्तस्राव, कत्तली :
तिमि सोडुनि भीत तिमिंगिळ पळे दुरी !

परि घटका दोघटका झुंज नृशंसा
प्राणघातकर होउनि पूर्तुगिजातिमि
आंग्ल तिमिंगिळ गिळीच, आणि आपल्या
लघुबेटा ने—धृतां गुलाम गणोनी !
जइ उजाडतां घेती लुट वांटुनी
म्हातारी व्यर्थ म्हणुनि मारिली तिशी

आणि एक चांच्यातिल मूर शिपाया
लूटीचा भाग म्हणुनि देति मुलाशी
दुर्दैवी पोर ! पोरकें जगामध्यें !
पुर्तुगिजांची होती प्रखर गुलामी;—
आशैशव पडत अंगवळणि ती तरी :
परि मोरोक्कोमधल्या क्रूर रानटी
ह्या गुलामगिरिंत पोर आज पडतसे
तेलांतुनि तळत्या आगींत कीं जसें.
इस्लामी बर्बरता पूर्तुगिजाही
म्हणवि शीघ्र बहुत बरें ! त्यांतही नुरे

काकूही त्याची त्या सांत्वना करूं.
त्या उदार साध्वीसी आठवूनियां
पोरानें त्या एकान्तांत रडावें :
माझी तिज आशा ती केवढी अणी
स्थिति झाली काय ! म्हणुनि नित्य झुरावें.
मोरोक्कोमध्यें त्या राक्षसा वरीं

पाठलाग करित तडक मागुनी तया
उसळत ये जळ उचंबळूनि अंबरीं
शिखरासम एक तिमिंगिलहि सागरीं !
चंड जळचरेंहि भयें दूर पळालीं
कोस कोस बघुनि झुंज ती भयंकरा.
सिंधुयानही दृश्या भीषणा तया
पाहुनियां लव थबके. तैं किशोर तो
वदत अहा, काकू हे मत्स्य आपलें

जीवन नेतात तरी कैंवि अशा ह्या
हिंसा प्रतिहिंसामय सागरामधें
हसली ती लव उदास, 'हा खुळ्या अरे !
मनुज जेंवि भूवरती ! न्यूनतर परी
जातिजातिमध्येंही जीवनार्थ वा
बळशक्तित्वार्थ कलह हाचि भूवरी !'
तों सहसाची बिगूळ भीतिसूचना
वाजवीत खडबडुनी उडत नौवरी
पुर्तुगीज गलबतासि आंग्ल लुटारू
चांच्याचें गलबत झडपूनिया धरी

हाणमार, धरपकडी, बार, टक्करा
त्या घंटा, बिगुलें, अंधार, गलबला
आरोळ्या, कण्ह, रक्तस्राव, कत्तली :
तिमि सोडुनि भीत तिमिंगिळ पळे दुरी !

परि घटका दोघटका झुंज नृशंसा
प्राणघातकर होउनि पूर्तुगिजातिमि
आंग्ल तिमिंगिळ गिळीच, आणि आपल्या
लघुबेटा ने—धृतां गुलाम गणोनी !
जइ उजाडतां घेती लुट वांटुनी
म्हातारी व्यर्थ म्हणुनि मारिली तिशी

आणि एक चांच्यातिल मूर शिपाया
लूटीचा भाग म्हणुनि देति मुलाशी
दुर्दैवी पोर ! पोरकें जगामध्यें !
पुर्तुगिजांची होती प्रखर गुलामी;—
आशैशव पडत अंगवळणि ती तरी :
परि मोरोक्कोमधल्या क्रूर रानटी
ह्या गुलामगिरिंत पोर आज पडतसे
तेलांतुनि तळत्या आगींत कीं जसें.
इस्लामी बर्बरता पूर्तुगिजाही
म्हणवि शीघ्र बहुत बरें ! त्यांतही नुरे

काकूही त्याची त्या सांत्वना करूं.
त्या उदार साध्वीसी आठवूनियां
पोरानें त्या एकान्तांत रडावें :
माझी तिज आशा ती केवढी अणी
स्थिति झाली काय ! म्हणुनि नित्य झुरावें.
मोरोक्कोमध्यें त्या राक्षसा वरीं

कुतऱ्यांच्या तुकड्यांतुनि अन्न त्या मिळे
दिवसासी पशुसंगें पशुसमानची
राबुनियां गोठ्यांतुनि रात्रिं तो पडे.
रागावुनि मूराची बायको तया

फेंकुनि दे नरका—मध्येंचि एकदा
शाप शिव्या मार तो मिळे पदोपदा.
तरिहि तो सजे न जरी जीव द्यावया
तरि आशा काकूच्या पूर्ण कराया !
एके दिनिं शेतांतुनि परततां मधें
एक गवाक्षांत दिसे त्या सुलक्षणा
हेमगौर पुर्तुगिजीसम वधू कुणी
लिंबासम तुळतुळीत कांति ती नवी
मुद्रा ती मोहक, ती तनुलता : तया
गोंव्यांताचि आहे मी काय पळ गमे

तों मंजुळ शुद्ध मराठीमधें पुसे
सस्मित ती त्यासी : कमनीय कुमारा !
काय तुझें नांव सांग—सांग ना मला !
आईचा शब्द हृदा करितना तशा
मधुर मातृभाषेचा शब्द करितसे
घोर विवासनिं हृदया गुदगुल्या जशा.
"शंकर" तो वदला. "वा गोड किती तें
नांव : किती तरि सांगू ! ये उद्या इथें

शपथ तुला : येच वरें!" घाइघाइनें
आंत जात परत पुन : काथियलें तिनें !

शाप शिन्या तुच्छतेंत सत्व गळुनिया
जात जयाचें अनुदिन हडहडीमधें
त्या गरीब पोरा तें बघुनि कीं जया
माझेंही नांव गोड लागतें असा
आत्मा ह्या जगतिं तरी एक असेची—
त्या गरीब पोरा तें बघतांच तें तदा
आनंदें आंसवांत न्हावविलें हो !
अंध:कारासि हृदांतील त्याचिया
मूर्ति तिची रात्रंदिन वीज कीं तशी
चमचमकुनिया वारंवार दीपवी—

अनुदिन मग जात पथें त्या किशोर तो
अनुदिन तिज बघत कधीं वदत अल्पसें
परिचय उभयांच्या प्रीतींत परिणमे
मग एके दिवशीं संकेत करुनियां
पत्र वरुनि ती टाकी एक त्या पथीं :
उचलुनि घे झटकन हा आणि संधिसी
साधुनियां वाची औत्सुक्यविवशासा.
काय ? तरी दासी ती ! ब्राह्मणी तिची
माता परलोकगता आणि पिता तो
पुर्तुगीज एक पुरुष राजकुलाचा ! !

चोरुनियां तिज पथांत स्पेनबंदरीं
डच गलबत एक नेत दास करुनियां
आणी ह्या मूरांच्या एक पुढाऱ्या
लक्षांवधि रुपयांसी देत विकुनिया !
माशासी मासे, मनुजासि मनुज ते
ख्रिस्त्यासी ख्रिस्ति ! कवण ही गिळागिळी !
कान पिळी धर्माचा जगातिं जो बळी !!
ब्राह्मणीस धरुनि करुनि जो गुलाम ने
तत्सुताई धृतदासी–कृतहि दुज्यानें.
मूराच्या सुटुनि घरांतूनि परी ती

जाऊं इच्छीत आज. आज सिद्धता
सर्व करी कौशल्यें आणखी जरी
हा किशोर येई निज संगतीं तरी
पळुनीयां जाइल ती कथियल्या पळीं !
ऐकुनि कीं गोव्यांतिल एक गुलामा
आणितसे ह्या ग्रामीं एक शिपाई
होत्यें मी शोधित त्या सहजि बघाया
तों दिससी तूं ! तुजसी विपल देखण्या
मी जगतें दिवसभरीं ! गोड किशोरा !
येशिल तूं तरि जाऊं सत्य सुटोनी

परि येशिल ना तरि तुजवीण मुक्तते—
हुनि मी हें सुखद दुष्टदास्यची गणी.

राहिन येथेंचि उभी विपल देखण्या
जातां तूं या पथें असा कधीं कधीं
मम कोमल लोभाचें बिंब त्या तुझ्या
उद्रीवा कमल लोचनांत देखण्या
शब्दमेघ ते द्रवुनी पत्रिकेंतले
स्वातीचे अर्थबिंदु टपकतांच तो
हृदयाच्या शिंपल्यांत झेलुनी धरी
आणि लिही तिज परतें "हे शुचिव्रते !

येतों मी तुजसंगें सांगशी तिथें
जीवनीय अंधःकारांत माझिया
मजसि दिसूं ज्या तुझिया स्निग्ध शीतला
हास्याच्या मंजु उजेडांत लागलें
त्या तुझिया मुक्त संगतींत एक जो
दिन जाइल तो जीवन सफलवुनी या
मज मरण्या सिद्ध करिल !–युगहि ना इथें.
एके दिनिं सहसाची गांव गलबलें
दास आणि दासी कीं दोन पळाले !
बहु शोधुनिही न मिळे. तैं कुणी वदे

उभयांही व्याघ्रानें सत्य फाडिलें :
मी हें प्रत्यक्ष बघे; मीहि तें बघे;
अन्यग्रामींहि साक्ष द्यावया निघे !
इकडे परि तो कुमार आणि कुमारी

आफ्रिकेंतल्या एक्या घोर अरण्यीं
निभृत कुटीमाजीं जाऊनि राहिलीं
मूरस्त्रीसह एका जी तयांप्रति
मूरवेष देउनि छपवूनि ठेविते
ही मूरा हेमगौर कन्यकेसि त्या.
होती पितृगेहींची पूर्वपरिचिता.

मार्गेही पोंचवुनी गौर असाची
स्वगृहीं स्पेनासि एक मिळविती धना.
मूरेनें त्याच मुळीं कन्यकेसि त्या
हुडकुनिया पळण्याच्या रचियलें कटा
प्रचुरधना–शेनें नव. त्या कुटीमधें
लिलि आणी शंकर एकत्र निवसतां
घोर अरण्यहि गुरुकुल एक होतसे
प्रीतीचें, भीतीचें आणि नीतिचें.

सत्यें हीं कांहीं आहेत सृष्टिचीं
जीं न पौरजीवनांत बुद्धिसी कदा

होणारीं पूर्ण गम्य. जीं पुरातना
कांतारांतर्गत, अस्पृष्टजनपदा
निबिडतेंताचि प्रत्यक्षत्व पावती.
जन्म–स्थानींच मूळ जीवसृष्टिच्या
जीवसृष्टिची स्वभावनग्नता दिसे.
सुखद कल्पना वितता ह्या हिरण्मया

पडद्यांमधिं नागरिकां मानवाचिया
सत्याचें उग्र रूप पिहितहो असे.
आफ्रिकीय घोर अरण्यांत सृष्टि त्या
नग्नपणें हिंडतसे : पूर्वि एकदा

रामाच्या काळीं वा भारतामधें
जेंवि दंडकारण्यादिक महावनीं :
मेंढ्यासी चरणांमधि झट्ट उचलुनी
आकाशीं उडती ते खातखातची
मांसाशन घोर गरुड घार गिधाडें
विहगां मारूनि विहग जीवती तिथें.
नक्र आणि सुसरी जबड्यांत गटकनी
ज्या गिळिती वासुरांसि जळ पितां पितां :
अजगर जे कवळींत न दोन जणांच्या
मावावे पुष्ट असे, लांब आणखी,

सीत्कारासह दुरोनि बदक कोंबडीं
आणि कुणी तर कुत्र्या कोंकरांसही
खेंचुनियां श्वासानें रज्जुनें तसें
गिळितातीं बसल्या बसल्याची भुकेसीं :
विषधर जे चावतांच थोर वृक्षही
कडकडुनी करकरोनि सुकुनि जळालें :
पन्नग ते उडते जे भक्ष्य निसटतां
ओघानें उडत उडत पाठ पुरविती
पन्नगारि जों ना त्या धरुनि अंबरीं
भिरकावित वा उंचुनि आपटूनियां—

भूमीसी हाडेंची खिळखिळीं करी :
मत्त महिष लाललाल नेत्र सहजसे
धक्यानें वृक्ष उन्मळूनि पाडितीं :
व्याघ्र पुच्छ आपटते पाहतांच ज्या.
महिष आणि वृषभ पाय गळुनि बैसती !
ऋक्ष आणि चित्ते रक्तार्द्रमुख सदा !
कपिहि दोन दोन पुरुष उंचिचे उभे :
पुच्छहीन हनुमान प्रबल, पाहतां
ज्यां यावी शंका वा नराचे ते उभे :
वानर वा वननर ज्या म्हणुनि बोलती :

त्यांतुनिही आफ्रिकीय गोरिले कपी
पूर्वपुरुष निःसंशय तेथल्या तरी
बार्बरीय मनुजांचे गमति जे मना.
उंच आणि आयत उड्डाण भीषणा,
ते कपी प्रचंडदेह ज्या भयंकरा
शाखासी आणि शिवा वर्ष वर्ष त्या
झुंजी घेतात मनुज झुंजती तशा
त्या बघतां रामायणवर्णनांतल्या
कपिवानरवीरांच्या अद्भुता कथा
वाटति ना पूर्ण निराधार काव्यशा :

कळप लांडग्यांचे, मातींत पुरोनी
कांहींसी आमुख, मग इतर दुरोनी
हरिणांच्या कळपा भुलवीत नेति; जों

ग्रंथ संग्रहालय,
नौपाडा

आयतींच पडतीं तोंडांत अकस्मात
हरणें तीं लपलेल्या लांडग्यांचिया :
मग मिळुनी सर्व तया फाडिती मृगा
रक्त पिती, मांस वसा खाति [illegible] !
मत्त मतंगज प्रचंड चालती असे
पर्वतची काय ! एक पाय ठेवुनी
चेंदितील नर जे—अळईस नर जसे.
आणि तसे गजहि मतंगजहि कांपती
चळचळ ज्या क्रकच क्रूराग्र नखींद्रां
सिंह असे शरभ असे रक्तपिपासू ! ! !
क्रूर अशा त्या वसतां घोर अरण्यीं
एक दिनीं दयितांचें तरुण युगुल तें
लिलि आणी शंकर संगेंचि सकाळीं
ये मृगया करित करित गिरिवरी कुण्या.
तरु अति विस्तीर्ण जुना एक जो पुढें
दावुनियां त्या शंकर बोलला लिली !
बघ बघ ह्या वृक्षाच्या खोल कोठरीं
तें पोळें माशांचें विषम विखारी.
एक जरि कडकडुनी चावली तरी
मरती तडफडुनी मत्त हिंस्त्र पशूही
तेथें मग मनुजांचा पाड तो किती.
जरि कोणा एकानें दुखविलें तयां
माशांचें सैन्य सर्व पाठ लागतें

गांवापर्यंत तया भीत नराच्या
आणि सूड घेति न चावूनि तयाची
परि गांवासहि त्याच्या कडकडूनियां ! ”
“ अग बाई ! ’ काटा येवोनि तनुवरी—

सुकुमारी ती बोले लगटुनी तया.
‘ अर्थानें एक्या या जगतिं मनुज हा
क्षुद्र किती किति दुर्बल जीव असे रे !
जरि त्यांनीं नैसर्गिक देह घेतला
तरि जीवो यत्र जीवनस्य जीवनं
त्या या अति निर्दय रानांत पुराणा
क्षणहि न त्या जीववेल ! मक्षिकाहि ह्या
शारीरिक सामन्यांत मारितिल तया !
सिंह, वाघ, हत्ती राहोत दुरीची
परि गायीच्याहि पुढें साधनाविना.

गायीहुनि गाय मनुज ! सामन्यामधें
शिंगाशीं तिचिया वारील जो असा
अवयव ना एकहि या मानवा स्वतां !
मूळ जई तो वनांत वन्य पशूंच्या
मध्यें पशुसाच एक वसत तैं अरे
देहबळें ना परंतु आत्मबळानें
शकला तो स्थापूं वर्चस्व आपलें ”
लिलि ! परंतु आत्मबळें तो जगूं शके
म्हणजे तरि काय लिलि ! बोधि तो वृकां
वेदांसह वेदान्ता वा मृगाजिनीं

सिंहासी शिकवी शमशांति समाधि
वा गृध्रा गीता वा सांख्य सुसरिसी ?
आत्मबळें केवि करी स्ववश तयांसी ?
आत्मबळें म्हणजेची बुद्धिबळानें
बुद्धिबळानें म्हणजे यंत्रबळानें
आणि यंत्रबळ हेंची देहबळ असे.
कीं जें जें यंत्र असे इंद्रियची तें
वृद्धिगत—शक्तिक्षम एक आमुचें
खाती पशुपक्षी जें त्वरित तयांचा
जठरवह्नि पचविल तें; मनुज परी तो

पचवू जें अपचनीय तेंहि झटे तैं
उखळ एक दाढ होय मुसळ दंत हा
आणि चूल आवेलाचि एक तयाच्या
जठरांतलि चूलीचे पाचनक्षमा.
सान्निध युद्धीं न टिकूं सिंह झुंजता
म्हणुनि बाहुदंडमिषें दीर्घ जाहलें
डुरकाळीं होय दुंदुभींत परिणता
चर्म कठिनतम होउनि वर्म होतसे
स्नायु होति तुर्य कंठनालिकेंतले
शृंगास्थी कुंतातुनि वाढ घेतसे.

मुष्टि शिळाखंडिं प्रक्षेप्य होउनी
तीरांतुनि, गोळ्यांतुनि बंदुकांतल्या
अतिमारक रूपांतर घेतसे झणीं.
सिंहासी नखरें, ना मानवा तशीं

म्हणुनि खड्ग तरवारी जंबिये सुऱ्या
वृद्धिंगत हीं नखोंचि आमचीं अशीं
नखरांच्या तीक्ष्णतेंत आत्मबल जईं
घे रूपांतर तैंची जीवनाचिया
घोर कलहिं या आरण्यक पुरातना
टिकला हा मनुज दीर्घ. नातरी तया

दुर्बलासि एखादा कीटही क्षणीं
दंशुनि देतांची मातीस मिळवुनि.
एतदर्थची जेव्हां भारताचिया
आरण्यक काळीं रानांत पाशवी
हिंसेच्या जबड्यांतचि आर्य निवसले
त्यांसि राजधर्माचे यज्ञविधींचे
तैं मृगया धर्म मुख्य अंग भासलें.
शरधनुष्यधारी ऋषिवर्य विचरले
वेदासम गणुनि धनुर्वेद पढविले.
परि पुढती श्वापदांसि हिंस्र नाशुनी

निष्कंटक देश होय जईं कृषीप्रति
पाणवठ्याचे सुंदर घांट बनोनी
जळ आणूं जातांना कन्यकेसची
होय नेइनासा जैं व्याघ्र अनुदिनीं
आणी नरमांसाशन राक्षसादिकीं
बालकांसि कवळ्या कीं कांकड्या तसें
भक्षियलें जाण्याचें भय न जैं उरे :
तेव्हां जनसंकुल निर्विघ्न निर्वनीं

शांतिसुखासीन नगर जानपदें तीं
मृगयेच्या महदुपकारांसि विसरलीं.

आणि नगरकूपांतिल जीवनांमध्यें
बिंबित रूपाची प्रतिबिंब सृष्टिचें
या अखिलाची समजूं लोक लागले.
रामायणकालपर्यंत भारतीं
यज्ञ आणि मृगया कां विहित मानिती
आणि आहिंसेचा अतिरेक कां तसा
बुद्धाच्या समयासचि उदय घेतसे
ते पुरातना ह्या अस्पृष्टजनपदा
घोर अरण्यामार्जी स्पष्ट होतसे—
जीव कसा जीवांचें जीवनचि असे

सृष्टीचें मूलरूप आणि मानवी
इतिहासाचें पहिलें पानही इथें
ह्या मूळा अकरलून निबिड वनींची
निर्लिखिता पत्रांवरि भूर्जतरूच्या
वाचण्यास मिळतें : ना उपवनांत तें
नगरजीवनीं विणुनी कल्पनांचिया
जाळ्यांसी मज्जातिल कीट नरांच्या
मानिति त्यांसीचि सृष्टि–तट अभेद्यसे
त्या तटांसि मूल सृष्टिच्या मुखांतल्या
आरण्यक वायूचा एथल्या असा

फूत्कारहि झाडुनिया दूर नेतसे. ”
तों सन्मुख एक महिष मत्त होउनी
महिषाच्या कळपांतिल आपल्या दुज्या
महिषावरि एका धांवूनि अशक्ता
धडकीसरशीच चिरी शिंग खुपसुनी :
तों त्याच्या डरकाळीहूनि कराला
डरकाळी अन्य उठे : ऐकतांच ते
महिष मत्त तो सहसा पाय गळोनी
भयविव्हल कोलांडे : मागुनी उडी
व्याघ्री घेऊनि तया नरडिला धरी.

हिसडा मारोनि कंठनाल फाटला
उचलावा पेला वरि तेंवि उचलुनी
आणि जरा आकुंचन करुनि निजतनु
गटगटगट रक्ता वाघीण पी तया
उष्ण कंठनालांतिल, दुध कीं कुणी
पेल्यांतिल पीत जसें पोट भरोनी.
मग हळूच डुरकत संतुष्ट हृदानें
पंजांनीं भक्ष्याचें मांस फाडुनी
घे मुखांत भरभरुनी आणि मागुतें
लांब लांब घेत उड्या जाय ती तिथें

वाट पाहती तीचीं तीं पिलें जिथें.
तोंची वेढूनि पिलें घेति तियेला.
पाहतांचि पोटच्या पिलांसि भुकेल्या
पान्हा तिज फुटला, ये हृदय भरोनी,

आणि शिथिल सर्व अंग करित घे स्वयें
कुशिस पडोनी ती त्यां दूध पाजण्या
लाडानें शेपटीस आपटित हळू.
चाटित रक्ताळ जिभेनेंचि त्या तयां
वा त्या अत्युग्र नखाग्रींचि मृदुमृदु
खाजवीत अंगें स्नेहार्द्र पिलांचीं.

नवरक्तें लवथवलें मांसखंड जें
महिषाचें धरुनि मुखीं आणिलें तिनें
तें पुढति विखरुनि दे, शिकविण्या अणी
खाऊं तें त्या पिलांसि आपल्या, स्वयें
चाटित ते रक्तलेश उगिच हुंगुनी.
त्या कृत्या नीरव साश्चर्य दावुनि
अंतिं वदे शंकर ‘ तें बघसि ना लिली
सृष्टीचें साग्र गौप्य ? बघ कशी तिथें
करुणाची क्रूरतेसि दूध पाजिते.
पाजुं पिलांसी मारी ठार मृगांशीं !

करुणेच्या साहाणेवरति धार या
क्रौर्याची पाजळली जातसे अशी !
ही व्याघ्री हिंस्त्रनखरदंत भीषणा
आणि दयादुग्धस्त्रववत्सलस्तना—
प्रकृतीची प्रतिमाची : एक चित्रची !
केवल ना हिंस्त्र, अहिंस्त्रहि न केवला,

करुणामय किंवा ती क्रौर्यमयाची
उभयविधा प्रकृति परी आणि उभय ह्या
वृत्तींचा फलविकास हें जगत् असे,
व्यक्ति असो यूथ असो राष्ट्र वा असो

या उभया वृत्तींच्या योग्य मिश्रणें
जीवनासि नेउ शके या जगांमधें
क्षात्र–तेज तें आणी ब्राह्म--तेज तें
उभयांसह लोक घे विवर्धना : जसें
पक्षांसह उभय विहग. मनु वदे असें."
इतुक्यांताचि ती मूरा हळुंच येउनी
वदली त्या ' हां लपा ! लपाचि लवकरी !
हीं दुरुनी येतीं जीं नग्न रानटी
तीं न माणसें, परंतु माणसांप्रति
तुम्हासम कवळ्या जे खाति कचकचा

ते हे नररक्तपी नृशंस नरपशु !
मग बंदुक भरुनी, घेवोनि लिलीतें,
धरुनि दबा बसला, तो तरुण तिथेंची
जों बर्बर ते तसेच जाति निघोनी :
आणी मग सत्वरची संकटांतुनी
ती मूरा त्या उभया वांचवुनीयां
देइ पुर्तुगालासी पोंचवुनीयां
पाहुनियां कन्यकेसि लाडक्या निजा

जनकातें तिचिया जो हर्ष जाहला
त्या भरांत तो तिचिया प्रियकरासही

आपुलेंचि मानुनियां ठेवि निजगृहीं,
लिलिचा तो अद्भुत वृत्तांत परिसुनी
राजगृहींही आमंत्रण तिला मिळे
मूरांच्या मधुनी निज कन्यका सुटे
म्हणुनि पुर्तुगाल सर्व मुदित जाहलें
परि असती हिंदु जरी लिलि ? जरी तिला
नेते पळवूनि मूर ? सुटुनि ती जरी
येति पुन्हां माहेरा ? होय हो तरी
हिंदूची हुसकुनि तिज परत धाडिते
त्याचि मुसलमानाच्या नांदण्या घरीं !

थोड्याचीं वर्षांहीं वारता पिता
लिलिचा, ती वित्तासह आपल्या करीं
पाणिदान त्या तरुणा आणि नंतरी
पाताळीं, यूरोपीं, भिन्नजनपदा
पाहत तीं दोघें, धर्मासि विभिन्ना
आलोचन करित, राष्ट्रराज्यबळांसी
प्रस्तुतच्या भिन्न भिन्न तुलित अंतरीं
पृथ्वीच्या पर्यटना येति करोनी,
आणी मग त्या ज्ञाना हिंदुजातिच्या
चरणिं पुरस्कार करूं; अनुभवाचिया

घंटेसी क्षुद्रा परि जागवित्या त्या
राष्ट्रदेविच्या देवाळयीं समर्पिण्या;
हिंदुस्वातंत्र्यरणीं आणखी स्वयें
बलिदाना निज आयुष्याचिया करूं;
लिलि आणी शंकर सोडोनि विदेशा
भारतासि येउं आरोहले तरी
आंग्लाची एक सहज, परि पुढें तया
कळलें कीं आंग्लसिंधुदस्यु जे कुणी
लुटिति मराठी नौका ते तिचे धनी.
हिंदमहासागरिं ती नौ प्रवेशतां

पकडी तिज एक महाराष्ट्ररणतरी
आणि झुंज आंग्ल मराठ्यांत मातली.
तैं असुनी आंग्लनौवरीहि शंकरें
पक्ष महाराष्ट्राचा घेतला झणीं :
कप्तानें तेव्हां त्यां स्तंभिं बांधुनी
तोंडावरि तोफांच्या करविलें उभे
तों पेटे आंग्ल तरी, जाळ भडकले !
स्तंभबद्ध परि त्याची बंदिच्याकडे
अहह कवण तरिही ये घुसत सुंदरी ?
आलिंगू आगींतहि नृवर नोवरी ?

'लिलि ? हां हो दूर लिलि ! कमलकोमले !
सत्य सत्य रतिरंगीं कमलकोमला

ज्वाळांच्या जैं हुताश परिरथीं चढे
स्वाहा तैं रणरंगीं वज्रकठोरा ! '
पडली त्या बंदीच्या सुंदरी गळा
अखिल मराठा तटस्थ विपल राहिला.
  क्रूर हातघाई मग होत एकची
जुळुनि अकस्मात् वेढिति वीर मराठे
इंग्रजी शिपें, फ्रिगेट, गलबतें स्वयें
निर्भय निःशंक तरांड्यासि तरांडी

अडकावणि देत मराठा चढूनि ये.
  तों वारे सोंसावति ! मेघ चिडोनी
गडगडाट तोफांसी बधिरपीत ये
झंजाचे चाबुक बसतांच सिंधुही
भडके बेछूट ! वीज कंप घे भयें !
  वीज कंप घे तेव्हां तिजासि दिसू ये
क्षुब्ध महासागरांचिया प्रचंड त्या
लहरींच्यावरि एका दीर्घ तुळइसी
लिलि आणी शंकर एकत्र लगटले
हत्तीनें कीं पिसाळ मत्त मस्तकीं

सोंडेनें जोडफूल जेंवि उडविलें
  त्या उभया एकत्रित पाहिलें जिनें
ऐसी ती शेवटची वीज ! तीवरी
घन अंधःकाराचें पटल जें पडे

त्यांत लिली जी सहसा निभृत जाहली
ती तशीच आजवरी ! आणि कथाही
त्यांची तेथेंच निभृत ! एक जें उरे
कथिणें तें इतुकेंची की : ' सहेतु तो
राजदूत वळुनि जेथ शुक्र बैसला
त्या दिशेस, संबोधुनि आणि त्यासची

वदला प्रस्फुटशब्दीं—' एकची उरे
कथिणें कीं होतें त्या शंकराचिया
जननीचें नांव रमा, नांव पित्याचें
माधव तें, आणि नांव मूळ गांवचें
भार्गव हें भार्गवींच नेइ अंतुनी
जननींसह दास बळें त्यास करोनी.
भाषण तें होतांना हळुंहळू हृदीं
शंकेची दारू जी अखिल जनांच्या
सांचत ये तीवरती शब्द अंतिचे
ठिणगीसम पडताती. ग्रामजन उठे

खडबडोनि एकसहा पुसत हें कसें ?
शुक्राचार्यासि कुणी वदति सत्य हा :
राजदूत कां असत्य गर्जती कुणी :
श्रीनिनामिबावांची शपथ घेउनी
शुक्र वदे उभय अम्ही सत्यची पहा !
होता जरि शुक्र हृदीं प्रथम चमकला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.

तरि सत्वर संभाळुनि तोल आपला
निःशंका मुद्रेनें " सत्य उभयही
होऊं शकतील कथा. अन्यपुरुषकि,
भार्गव हें नांव असे. तेंथिचा कुणी.

हा असेल मित्र, राजदूत !, आपुला
शंकर या नामें जो सागरीं बुडे. "
" दुर्दैवें तो न बुडे " दूत उत्तरें.
तइं रागावुनि वरती परि हृदांमध्यें
चांचरुनी शेवटचा डाव टाकण्या
गर्जत त्या शुक्र पुसे " तो कुठें असे ?
आणा त्या ! स्पष्ट कथा ! संत निनामी
बाबांची शपथ तुम्हां ! चुकतसा तुम्हीं
ईषत् हांसोनि उपेक्षा स्वरीं वदे
राजदूत " पुसतां मज तो कुठें वसे ?

ऐका तरि ! शंकर तो या स्थलीं असे !
हा येथें : माझ्यांतचि ! मित्र जिवाचा
माझा तो मीच होय ! तनय रमेचा ! "
गजबजली सर्व सभा ! एकची उडे
गोंधळ लोकांत परी गोंधळला ना
शुक्र ! गर्जतचि " छे ! हें कपट ! शेंकडो
जन बघती प्रत्यक्षाचि वृत्त जें, जया
ज्यासें प्रत्यक्ष भविष्यांत वर्णिलें,

महात्म्यीं क्षेत्रीया ऋषि जया प्रती
आणि वर्णिती;—श्रीमान् संतनिनामी

बाबांची सत्य सत्य ती चमत्कृती ! ”
देखत तो, गर्जत तो, कळत ना कुणा
गेला निसटूनि शुक्र त्या सभेंतुनी—
गांवांतुनि आणी त्या ! कीं दुजे दिनीं
राजमुख्य त्या धरणें धाडिती तंई
रामाच्या मंदिरांत ना दिसे कुणी !
शुक्र निघुनि गेला. ते लोकही क्रमें
विसरूनियां गेले तें वृत्त : परंतु
मंदिर तें, ती समाधि, आणि शेवटीं
अद्यापी पुरुनि उरे दंतकथा ती !—

धर्मकथा म्हणुनीया ! ! अजुनि पुराणीं
बाळासह बसुनि विमानांत सदेह
स्वर्गारोहण करिती कैंवि निनामी
बाबा तें गीत होय या जगीं असें
अट्टल, अतिधूर्त जरी तरि असत्यही
सत्याहुनि अधिक चिरंजीव होतसे ! !

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय 20246
मराठी ग्रंथ संग्रहालय 2759 3112 2082

REFBK-0020246